# व्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख १४ माहे नोव्हेंबर १९१० इ० [ अंक ४२



## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोनओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच असली पाहिजे.

सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच अठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.


## जहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंतर्फे दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्या जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।१९१० } एजंट
नं .

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँक छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरा येथील ऑफिसांत विकत मिळतील. ग्राहकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चें वजन २६ $\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव व्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव सदराखालीं सांपडेल.

मुंबई } G. A. Phillips.
आकोला ९-१० } एजंट.

## NOTICE.

D. Phatak oil-engine expert for Field oil engines (as supplied by Messrs Duncan Stratton and Co. of Bombay) be consulted as to the purchase condition and value of new and second-hand engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:– C/o N. G. Ketkar Esq.
Pleader,
Amraoti.

No. Dh. 8 1

## ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण उर्फ बाबा गर्देकृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेंत भूमितीच्या धर्तीवर लिहिला आहे. या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्वें मनामध्यें चांगलीं ठसून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें वर्म तेव्हांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४९, स्वदेशी मोहरेदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक, किंमत १॥ टपाल हांसल निराळें. पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें–

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी, पो० कुंडल

२ म्यानेजर, श्री[illegible]प्रकाश प्रेस, [illegible]गांव.

नो० नं० ण ३०

## जाहिरात

वर्षफल—प्रत्येक महिन्याचे फलासह लाभालाभ सुखदुःख कळवूं. फी. ३ रुपये वर्ग २ चे २ रुपये. खर्च ८= जन्म काल पाठवावा.

पत्ता----

श्री अन्नपूर्णा ज्योतिषालय–[illegible]
पो. शहादा. प. खानदेश.

नो० नं० ण ३१

## नोटीस

बेशमी नुरमहंमद वा महंमद यासीन रा० एदलाबाद ता० भुसावळ यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा धाकटा भाऊ शेखजी हा उनाड असून तो अज्ञान आहे. त्याच्याशीं कोणत्याहि प्रकारें माझ्या लेखी परवानगी वांचून देवघेव तुह्मी करूं नये अशाबद्दल म्या तुह्मास अजमासें दीडवर्षा मागें नोटीस दिली आहे. तो घरचा स्वतंत्र नाहीं. त्याची व माझी स्थावरजंगम इस्टेटींत अद्याप वाटणी झाली नसल्याचें तुह्मांस माहीत असतांही तुह्मी अंदाजा तीनवार झाले एक कर्जरोखा रुपये अजमासें २०० दोनशांचा करून घेतल्याचें समजतें. ही देवघेव मला मुळींच कबूल नाहीं. त्याची जबाबदारी मजवर किंवा आमच्या स्थावरजंगम इस्टेटीवर कोणत्याहि प्रकारें नाहीं कळावें ता. ९-११-१०.

सही

शेखरहीम वा महमद आशरफ द. खु.
रा० विस्वा चांदूर.

नो० नं० ण ३२

## नोटीस आणि जाहिरात.

मुनावी मर्द महमद असलम राहणार हातरूण ता० बाळापूर आणि इतर लोक यांना:—

लालवी मर्द शेख गफूर राहणार हातरूण ता० बाळापूर इजकडून कळविण्यांत येते कीं मुनावी ही माझी सासू असून थोडे दिवसापासून तिचा व माझा बेबनाव आल्यामुळ ती माझे अन्नवस्त्राची काळजी न ठेवितां जें एक शेत मौजे मोरझाडी ता० बाळापूर येथील अंदाज आकार रुपये ६०-चें माझे आज्यानें दिलेलें तिचे नांवें आहे तें सांप्रत व तिचे पश्चात माझे उपयोगी पडूं नये ह्मणून ती अनेक लोकांचे शिकवणी व नादीं लागून कोणास गहाण खरेदी किंवा बक्षिस अथवा अन्य रीतीनें देण्याचे विचारांत आहे. यासाठीं मुनावी इस या द्वारें कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्यापासून तिनें माझे अन्नवस्त्राची व्यवस्था लावावी व सर्व लोकांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं मुनावी इचे पासून सदर्हू शेत कोणी कोणतेही रीतीनें घेऊं नये व संबंध ठेऊं नये या विरुद्ध कोणाचें वर्तन झाल्यास तें रद्द समजलें जाऊन त्याबद्दल जी कायदेशीर तजवीज करावी लागेल ती केली जाईल व त्याबद्दलच्या खर्चाची जोखीम त्यांना सोसावी लागेल. तारीख ७-११-१०

सहीची निशाणी लालवी
मर्द शेख गफूर हिचा
आंगठा असे.

नो० नं० ण ३३

## संभाषण

( चिफ कमिशनर ना. राजश्री क्रॉडॅक साहेब यांचें उमरावती येथील संभाषण )

**सभ्यगृहस्थहो,** माझा या वेळीं येथें येण्याचा मुख्य उद्देश हा होता कीं, एक सभा भरवून तींत बहुमान मिळालेल्या लोकांना त्यांच्या उत्तम कामगीरी बद्दल बक्षिस ह्मणून आलिशान व्हाइसरॉय साहेबांनीं दिलेल्या पदव्यांचीं पदकें व सनदा द्याव्या, परंतु या संधीचा फायदा घेऊन मी, ज्यांना बादशहां कडून पदकें ( किंगमेडल्स ) मिळालीं आहेत, अशा पोलिस अधिकाऱ्यांनाही येथें येऊन आपलीं पदकें मजजवळून घेण्याकरीतां बोलाविलें आहे. म्युनिसिपल कमिटी व डिस्ट्रीक्ट बोर्ड यांच्या मानपत्रांस उत्तर देण्यापूर्वीं मी या बहुमान मिळालेल्या गृहस्थां संबंधी चार शब्द बोलूं इच्छितों.

बादशहाचें पदक ( किंगमेडल )– जें पोलिसच्या कामांत व्यक्त झालेल्या कांहींतरी उत्तम गुणांबद्दलच मिळत असतें–संपादन केलेल्या दोन पोलिस अधिकाऱ्यांपैकीं, खानबहादूर शेरअली, ह्यांनीं ४७ वर्षें नोकरी करून आतां पेन्शन घेतलें आहे. या अवधींत त्यांनीं फक्त ८ महिन्यांचीच रजा घेतली. ते प्रथम पोलिस खात्यांतील सर्वांत खालच्या दर्जावर लागून डेप्युटी सुपरिंटेंडेंटच्या हुद्या पर्यंत चढले; व मला या बद्दल फार आनंद वाटतो कीं, मी त्यांना विशेष प्रकारचें पेंशन देण्या विषयीं हिंदुस्थान सरकार व सेक्रेटरी ऑफ स्टेटची मंजुरी आणवून त्यांच्या कामगिरीची कदर करूं शकतों. मि. आर्मस्ट्रॉंग यांची कारकीर्द अद्याप मध्यमावस्थेंतच आहे; तथापि त्यांच्या आजपर्यंतच्या उत्कृष्ट कामगिरीची अशी उत्तम प्रकारें कदर झालेली पाहून माझ्या मताप्रमाणें त्यांनाही संतोष वाटला पाहिजे. मी आतांच त्यांना सांगितल्या प्रमाणें, मला असा भरंवसा आहे कीं, या पूर्वीं त्यांनीं जसें चांगलें काम केलें आहे तसेंच तें पुढेंहि करण्यास त्यांना यामुळें उत्तेजन येईल.

सभ्य[illegible] अधिकाऱ्यांना हें जें [illegible]लें आहे त्यावरून [illegible] सभेंत ज्या गोष्टीवर [illegible] ती गोष्ट माझ्या [illegible] राहते. ही गोष्ट [illegible]कडे नेहमीं दुर्लक्ष [illegible]हि हिच्याकडे दुर्लक्ष [illegible] ही होय कीं, उ[illegible], या वस्तुतः एकच [illegible]ऱ्यांच्या कारकीर्दीव[illegible]या कर्तव्यकर्मांत [illegible]भाव झाला पाहिजे, [illegible]. हें कर्तव्यकर्म [illegible] व दुर्ज[illegible] प्रमाणेंच जर सर्व पोलिस अधिकारी [illegible] पलीं कामें करितील तर त्यापासून सरकार[illegible] जितका फायदा होईल तितकाच लोकांचाहि होईल. खानबहादुरांच्या दीर्घ कारकिर्दीस विशेष महत्व असून त्यांनीं पोलिस खात्यास एक उज्वल व अलौकिक उदाहरण घालून दिलें आहे व तें उदाहरण असें आहे कीं, त्यापासून केवळ पोलिसखात्याचाच नव्हे तर जनतेचा सुद्धां अपरिमित फायदा होण्यासारखा आहे.

सभ्यगृहस्थहो, पोलिसावर गैरवर्तणूक व अपयशाचा आरोप केलेला आपण कधीं कधीं ऐकतों. परंतु लोकांच्या सहकारित्वाचा अभाव अशा गैरवर्तणुकीस व अपयशास कितपत कारणीभूत होत असतो, याचा तुह्मी कधीं क्षणभर विचार केला आहे काय ? लोकांनीं मदत केल्याशिवाय कोणताही पोलिस अधिकारी यशस्वी होऊं शकणार नाहीं. माहिती असलेल्या लोकांनीं मौन धारण केल्यामुळें, किंवा त्यांनीं अर्धी खरी व अर्धी खोटी, अशी माहिती दिल्यामुळें, किंवा ते सपशेल खोटें बोलल्यामुळें, चौकशी निष्फळ झाली असल्याचें तुह्मी कितीदां तरी ऐकलें असेल. अशा प्रकारचें खरें न बोलणें किंवा असलें मौन यांचा उगम गुन्ह्याबद्दलच्या सहानुभूतीपासून जर होत असेल तर तीं स्वतःच शिक्षेस पात्र आहेत, परंतु केवळ त्रास चुकविण्या करितांच जर त्यांचें अवलंबन करण्यांत आलें असेल तर तो अपराध असूं किंवा नसूं शकेल, परंतु ही फारच वाईट प्रकारची समाजसेवा होय, व असली जनसेवा ज्याच्या हातून घडते तो वाईट नागरीक होय. सभ्यगृहस्थहो,

पोलिस फार अप्रिय आहे, असें जें विधान करण्यांत येतें त्यावर माझा विश्वास नाहीं. पुष्कळ प्रसंगीं एखादें पोलिसठाणें उठविण्या संबंधी प्रश्न उपस्थित झाला असतां जेव्हां जेव्हां मी गांवचे लोक आसपासचे गांवकरी यांचीं खाजगी रीतीनें मतें घेतलीं तेव्हां तेव्हां मला जो कांहीं अनुभव आला त्यावरून मी असें ह्मणूं शकतों कीं, प्रत्येक वेळीं ठाणें उठविण्याच्या योजने विरुद्ध सर्वच निषेधच प्रदर्शित करण्यांत आला आहे. सभ्यगृहस्थहो, पोलिस अधिकाऱ्यांशीं त्यांच्या कामांत मिळून मिसळून काम करणें, हें जर प्रत्येक नागरिकाचें एकपट कर्तव्य असेल तर गांव कामगारांचें दुप्पट आहे; व जो गांव कामगार आपला उत्साह गुन्हे हुडकून काढून त्यांना प्रतिबंध करण्याचे कामीं पोलिसांना मदत करण्यांत सर्वस्वीं खर्चीं घालीत नाहीं तो आपल्या कामास अगदींच नालायक आहे. सभ्यगृहस्थहो, बहुतेक सर्व लोकां प्रमाणें पोलीसांतहि दोष व व्यंगें आहेत, हें मी जाणून आहे. परंतु या देशांतील लोकांनीं सध्यापेक्षां पुष्कळपटीनें ज्यास्त सहकारित्वानें काम केलें तर हे दोष व व्यंगें बरींच कमी होतील. सभ्यगृहस्थहो, गांवकामगार व लोक यांच्या कडून अधिक चांगल्या प्रमाणांवर मदत मिळाल्यावर पोलिस खात्यांकडून होणाऱ्या उत्तम कामागिरी पासून किती फायदा होण्यासारखा असतो, याचें तुमच्या जिल्ह्यांतीलच एक उदाहरण तुमच्या समोर आहे. तसेंच गेल्या दोन वर्षांत याच जिल्ह्यांत घडून आलेल्या सुधारणेचें उदाहरणही तुमच्या दृष्टीसमोर आहे. करितां मी अशी आशा करितों कीं, पोलिसला दोष लावूं पाहणारा व ते चांगल्यापेक्षां वाईटच करितात, असें [illegible]पूर्वक विधान करणारा जर कोणी येथें असेल तर तो लोकांच्या सहकारित्वा संबंधानें मी आज जें कांहीं बोललों आहे तें लक्षांत ठेवील.

सभ्यगृहस्थहो, मी आतां पदव्या मिळालेल्या इतर गृहस्थांकडे वळतों. तुह्मांस हें दिसून येईल कीं, एकंदर ७ मानकऱ्यांपैकीं रावबहादुर श्री निवासलू नायडु, एक्स्ट्रा डेप्युटी कान्सरवेटर ऑफ फारेस्टस, हे एकच कायते सरकारी नौकर आहेत. रावबहादुर मजकुरांनीं जंगलखात्यांत बरींच वर्षें उत्तम प्रकारें नौकरी केली आहे. त्यांनीं आपल्या खात्याच्या हितसंबंधाविषयीं अत्यंत आसक्ति व्यक्त केली आहे. तरीहि पण आसक्ति व लोककल्याणासंबंधी निःसीम कळकळ, यांचा संयोग जुळवून आणावा हेंहि त्यांस अवगत आहे.

दुसरे मानकरी, दर्यापूरचे भगवंतराव शंकरराव देशमूख, हे होत. ते एका प्रमुख देशमूख घराण्याचे वंशज आहेत. ते आज २९ वर्षांपासून स्पेशल म्याजिस्ट्रेटचें काम करीत आहेत, व या नात्यानें त्यांनीं फार चांगलें काम केलें आहे. हे देशमूख लोक ह्मटले ह्मणजे ज्यांच्यावर पूर्वीं मुलकी राज्यकारभाराचा बराच ताण बसत असे ते पुरातन परगणा अधिकारी होत; हे प्रत्यक्ष सार्वजनिक स्वरूपाच्या कामांत सरकारांस राजनिष्ठापूर्वक हातभार लावूं शकतात. व हें सांगण्यास मला आनंद वाटतो कीं, ते तसें करीतही असतात.

तिसरे गृहस्थ, एलिचपुरचे गणेश नागेश सहस्रबुद्धे, हे होत. ते आज ७ वर्षांपासून ऑनररी म्याजिस्ट्रेट व ९ वर्षांपासून एलिचपुर क्यांप म्युनिसीपालिटीचे व्हाइस चेअरमन आहेत. एलिचपूर शहराची भरभराट, व स्थानिक स्वराज्याचे हितसंबंधाचें रक्षण, व त्याचें कल्याण करण्यासाठीं त्यांनीं फारच परिश्रमपूर्वक व उत्तम प्रकारें काम केलें आहे.

रावसाहेब यशवंत वामन दिघे हे वाशिमचे वकील आहेत. ते आज पुष्कळ वर्षांपासून म्युनिसिपालिटीचे व्हाइसचेअरमन असून तेथील वकीलांत अग्रगण्य आहेत. व त्या भागांत इतका अनर्थ करून सोडणाऱ्या दुष्ट चळवळींशीं ते प्रारंभापासूनच झगडत आहेत.

आकोल्याचे खानसाहेब अमानखां सलिमखा हे वऱ्हाडांतील मुसलमानांच्या पुढाऱ्यांपैकीं एक आहेत. ते आकोला म्युनिसिपालिटीचे चेअरमन व बेंच म्याजिस्ट्रेट असून त्यांनीं प्लेगच्या देवी टोंचण्याच्या कामीं विशेष चांगले परीश्रम केले आहेत. ते नेहमीं सरकारची [illegible] राजनिष्ठापूर्वक उचलून धरित आले आहेत.

मलकापुरचे खानसाहेब खाजा फयाजुद्दीन, हे मुसलमानांच्या शिक्षणाचे उत्साही पुरस्कर्ते आहेत. त्यांनीं त्या कामाकरितां जागा दिली असून एक हास्टेल आपल्या खर्चानें चालवित आहेत. तेहि सरकारचे राजनिष्ठ पक्षपाती आहेत.

या यादींतील शेवटचे गृहस्थ, डाक्टर त्रिंबक वामन जोशी हे होत. हे उमरावती येथील खाजगी डॉक्टर असून त्यांनीं अत्यंत खाजगी नात्यानें सुद्धां मनुष्य जनसेवा कशी करूं शकतो, हें तुह्मास दाखविलें आहे. त्यांनीं सरकारी नोकरीच पत्करली पाहिजे, किंवा बोर्डाचे किंवा म्युनिसिपालिटीचे मेंबर झाले पाहिजे, असें नाहीं. तरी पण त्यांना लोकहिता-र्थ उपयुक्त कामें करण्या करितां मुबलक क्षेत्र मोकळें आहे. डाक्टर जोशी व या ठिकाणचे इतर खाजगी डाक्टर, यांनीं केलेल्या चांगल्या कामगिरीचें जाहीरपणें अभिनंदन करण्याची मला ही संधी मिळाली, या बद्दल मला फार आनंद वाटतो. उमरावती येथील लोक आतां पहिल्यानेंच प्लेगच्या देवी टोंचून घेण्यासाठीं आपण होऊन पुढें सरसावले आहेत, याचें बहुतेक सर्व श्रेय माझ्या मतें त्यांचे परीश्रय व देवी टोंचण्यासंबंधानें त्यांनीं घालून दिलेलें उत्कृष्ट उदाहरण या कडेच आहे.

सभ्यगृहस्थहो, आतां ज्या गृहस्थांना पदवीदान करण्यांत आलें आहे त्यांच्या कामगिरीवरून सार्वजनीक हितसंबंधाच्या बाबतींत उत्तम व प्रत्यक्ष काम करण्यास इंग्रजी राज्यांत किती विस्तृत वाव आहे, हें दिसून येईल. आपल्या मानवबंधुचें कल्याण करण्यासाठीं मनुष्यानें राज-कारणीय झाले पाहिजे, असें नाहीं. वाचालते पासूनहि उपयोग होतो यांत संशय नाहीं; परंतु वाचालते वांचून कितीही कनिष्ट दर्जाच्या लोकांच्या हातून घडलेल्या चांगल्या व प्रत्यक्ष क्रिये पासून पुष्कळ फायदा होतो, परंतु क्रियाशून्य वाचालते पासून मोठमोठ्यांच्या हातून सुद्धां कांहींच कार्यभाग होत नाहीं.

सभ्यगृहस्थहो, मी आतां म्युनिसिपालिटीनें व डिस्ट्रीक्ट बोर्डानें मला ही जीं मानपत्रें मेहेरबानगीनें अर्पण केलीं आहेत त्याकडे वळतों. या मानपत्राचा मी अत्यंत संतोष व समाधानपूर्वक स्वीकार केला आहे. त्यांत बादशहाचे गादी संबंधानें तुह्मी प्रदर्शित केलेली राजनिष्ठा अत्यंत मनःपूर्वक आहे, हें मी कबूल करितों. परलोकवासी बादशहाच्या पूज्य नांवाचें कांहीं तरी स्मारक करण्यासंबंधानें तुह्मी त्यांत व्यक्त केलेली इच्छा, त्यांनीं हातीं धरलेला राजदंड न्यायाचा व सद्धर्माचा होता अशी तुमची खात्री झाली असल्याची द्योतक आहे, असें मी समजतों. याशिवाय त्यांत माझ्या स्वतःसंबंधीं व अर्थातच माझ्या मार्फत माझ्या हाताखालीं तुमच्या कल्याणार्थ झटणाऱ्या अधिकाऱ्यांसंबंधीं प्रशंसावर उद्गार काढले आहेत, या कारणास्तवही मी त्यांचा स्वीकार करतों. परंतु केवळ याच कारणामुळें हीं मानपत्रें वाचून व ऐकून मला संतोष झाला आहे असें नाहीं, तर ज्यांच्या डोक्यांत आपल्या भवितव्यते संबंधीं मूर्खपणाच्या कल्पना भरल्या होत्या ते ताळ्यावर आले आहेत, ज्या कित्येकांचीं मनें गोंधळून जाऊन द्विधा झालीं होतीं त्यांच्या शंका दूर झाल्या आहेत, व जे निरंतर संतुष्ट राहिले असून ज्यांचा सरकारची उपकारबुद्धी व जनहितपरायणता यांवरील विश्वास अखंड राहिला, त्यांचा संतोष, राजनिष्ठा व विश्वास द्रुढमूल झाला आहे. या गोष्टी त्यांवरून व्यक्त होत आहेत ह्मणून मी त्यांचा फारच आनंदानें स्वीकार करितों. जर कांहीं उलट्या मेंदूच्या लोकाचा अवशेष अद्यापि अस्तित्वांत असेल, तर त्यांना मला याशिवाय कांहींएक सांगावयाचें नाहीं कीं, त्यांना जी कांहीं शांतता व स्वस्थता भोगावयास सांपडेल ती ते ज्या मानानें ती टिकूं देतील त्यावर अवलंबून आहे. म्युनिसिपल कमेटीचे सभ्यगृहस्थहो, तुह्मी दिलेल्या मानपत्रांचा मी यांही कारणास्तव स्वीकार करितों कीं, त्यावरून शिक्षण, स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याची सुधारणा यांचे पासून प्रत्यक्ष फायदे किती आहेत याची तुह्माला जागृति असल्याचें व्यक्त होतें. तुमची अशी उत्कट इच्छा दिसते कीं, शिक्षणाचा प्रसार करावा व संभोवतालच्या घाणेरड्या परिस्थितीपासून उद्भवणारे हाल व आजार नाहींसे करावे, व डिस्ट्रिक्ट कौंसिलचे सभासद हो, यासंबंधानें तुह्मालाही उद्देशून मी ह्मणतों कीं, तुमचीही अशी इच्छा आहे कीं, दळणवळणाचीं साधनें व सोई देशांतील व्यापाराच्या व भरभराटीच्या वाढीस बऱ्याच कारणीभूत होत असल्यामुळें तीं वृद्धिंगत करावीं हे सर्व उद्देश प्रशंसनीय असून त्यांकडे सरकारनें मागें पुष्कळ लक्ष पुरविलें आहे. आतां कदाचित् कित्येकांच्या इच्छेप्रमाणें भरभराट व्हावी तितकी जलद झाली नसेल. यांस कांहीं अंशीं कारण पैशाची तूट, हें होय, तथापि याचें मूळ केवळ पैशाच्या तूटींतच आहे, असें नव्हे, तर असल्या सुधारणासंबंधीं कल्पनांचा लोकांच्या ठायीं पूर्ण अभाव, व नागरिकांत साजेलशा व खाजगी रीतीनें केलेल्या प्रयत्नांची उणीव, यांतहि अंशतः आहे. सभ्यगृहस्थहो, तुमचा प्रांत फार लहान आहे, तरी पण तो संपन्न आहे. मी हें मोकळ्या मनानें कबूल करितों कीं पुष्कळ बाबतींत व विशेषकरून द्रव्य व शिक्षण, या दृष्टीनें तुह्मी आपल्या शेजारच्या मध्यप्रांतापेक्षां फार पुढें गेला आहांत. तरीपण कांहीं बाबतींत तुह्मी त्या प्रांताच्या फार मागेंही आहां, उदाहरणार्थ, शिक्षणसंस्था व दवाखाने, या संबंधानें मागें तुह्मी बहुतेक अंशीं सरकारच्याच पैशावर अवलंबून राहिला असून स्वतः फारच कमी झीज सोसली. या शहरांतच तुमच्या हास्पिटलमध्यें लोकोपकाराचें काम विस्तृत प्रमाणावर झालें आहे, अशी बढाई मारतां येणार नाहीं, व वऱ्हाडांतील जिल्ह्याच्या व तुमच्यापेक्षां १० पटीनें कमी संपन्न असलेल्या मध्यप्रांतांतील जिल्ह्यांच्या दवाखान्याच्या वर्गणीच्या यादींची तुलना करून पाहिली असतां तुमच्या याद्या फारच भिकार आहेत. मागें कांहीं बाबतींत ( मी असें ह्मणत नाहीं कीं सर्वच बाबतींत ) तुह्मी स्वतःच उल्लेख केलेल्या निकडीच्या गरजा भागविण्यासाठीं अवश्य असलेल्या योग्य करांनासुद्धां प्रतिकार करण्यांत आल्यामुळें वऱ्हाडांतील म्युनिसिपालट्यांची व्यवस्था विस्कळित झाली. व पुष्कळ ठिकाणीं कर वसूल करण्याच्या कामीं अत्यंत ढिलाई झाल्यामुळेंहि ती बिघडली. तथापि सभ्य गृहस्थहो, मी हें कबुल करतों कीं, हे पूर्वींचे दोष तुमचे तुह्मालाच कळूं लागले आहेत. व आपल्या पायांवर उभे राहतां येण्यासाठीं आपण आजपर्यंत जें कांहीं केलें आहे त्याहून ज्यास्त करणें इष्ट आहे अशी जाणीव तुह्मास झाली आहे. तुमच्या मानपत्रांत पाण्याचा पुरवठा वाढविण्याविषयींच्या योजनेच्या अवश्यकतेसंबंधानें उल्लेख केलेला दिसून येतो. या योजनांचा सध्यांचा सरासरी अंदाज ९ लक्ष रुपये आहे असें मला वाटतें, व या रकमेनें तुमच्या हृदयांत कांहींशी धडकी भरली आहेसें दिसतें. तथापि तुह्मी बसविलेल्या करांचें प्रमाण अद्यापि त्यांच्या अंतिम मर्यादेपर्यंत जाऊन पोंचलें नाहीं, किंवा कर्जासंबंधानें तुह्मास जे अधिकार आहेत त्यांचें मुळींच अतिक्रमणही झालेलें नाहीं. मध्यप्रांतांतील यापेक्षां किती तरी पटीनें लहान ठिकाणींसुद्धां पाण्याच्या योजना तयार करण्यांत आल्या असून कित्येक बाबतींत तर त्या खाजगी लोकांकडून अतिशय उदार देणग्या मिळाल्या ह्मणूनच अंमलांत येऊं शकल्या. ही बाब अशी आहे कीं, निम खाजगी लोकांना आपली उदारता दाखविण्यास पुष्कळ वाव आहे. माझी आठवण जर बरोबर असेल तर हे उमरावती शहर मागें इतक्या मोठ्या रकमेच्या खंडणीसाठीं पुढाऱ्यांना मिळालें होतें कीं, त्या रकमेंत तुह्मी कितीतरी पाण्याच्या पुरवठ्याच्या व मोरीकामाच्या योजना अमलांत आणूं शकला असतां. सभ्यगृहस्थहो, आज बरेच वर्षांपासून आपल्या मोठमोठ्या शहरांना स्वच्छता सुधारण्यासाठीं स्थानिक फंडांतून इंपिरियल व प्रॉव्हिंशियल फंडांतून मदत मिळावी, या गोष्टीचें निरंतर प्रतिपादन करणाऱ्या पैकीं मी एक आहे. परंतु एखादी म्युनिसिपालिटी जर मजकडे पुष्कळ खर्चाच्या व फायदेशीर योजना आणील, परंतु आपल्या पायांवर उभी न राहतां प्रॉव्हिंशियल फंडांतून फुकट देणगी मागेल, तर तिचें मागणें निष्फळ होईल. परंतु उलटपक्षीं जर तुह्मी मजकडे एखादी योजना आणाल व स्वतःच्या उत्पन्नांतून जें कांहीं करणें शक्य आहे तें तुह्मी करीत असून तुह्मी शक्त्युनुसार मेहनत केली असूनसुद्धां असें कांहीं काम राहिलें असेल कीं ज्याचा खर्च झेंपणें तुमच्या शक्तीबाहेर आहे, व तसेंच त्या योजनेचें एकंदर स्वरूप तिजपासून होणाऱ्या फायद्याच्या मानानें अवाढव्य नाहीं, हें जर तुह्मी माझ्या नजरेस आणून द्याल तर मला पूर्ण खात्री आहे कीं सरकार आपल्या शक्त्यनुसार करतां

तुह्मी आणखी अशा एका गोष्टीचा उल्लेख केला आहे कीं, जिच्या संबंधानें मी तुह्मास पुनः आश्वासन देऊं शकतों. म्युनिसिपालिट्यांतील घरांच्या जागाचें भाडें सरकारनें आपणांकडे घेतल्या संबंधानें तुमचा उल्लेख आहे. याविषयीं तुमची इच्छा काय आहे, हें मी अगोदरच ताडलें आहे. कांहीं दिवसांपूर्वी अशा जमिनीसंबंधानें मध्यप्रांतांत प्रचलित असलेली पद्धति वऱ्हाडास लागू करण्यासंबंधानें आह्मी हिंदुस्थानसरकारांस अर्ज केला होता, व तसें करण्याविषयीं मंजुरीहि आली आहे. या पद्धती प्रमाणें तुह्माला जमिनीच्या व्यवस्थेचा खर्च आपल्या शिरावर घ्यावा लागेल, व त्या भाड्याबद्दल मोबदला ह्मणून तुह्माला एकंदर चारपंचमांश हिस्सा मिळेल.

डिस्ट्रीक्ट बोर्डाचे सभ्यगृहस्थहो, व्हिलेज सॅनिटेशन आक्ट वऱ्हाडास लागू झाल्यानें तुमच्या जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्याची बरीच महत्वाची प्रगति होणार आहे. एकतर त्या योगानें तुह्मी अशा खर्चापासून सुटाल कीं ज्याचा भार तुमच्यावर कधींही पडावयास नको होता. लहान शहरांत व मोठमोठ्या खेड्यांत मोऱ्या बांधणें व कंदील लावणें, या विषयींचा खर्च खेड्यापाड्यांतून वसूल केल्या जाणाऱ्या करावर लादणें कधींही योग्य होणार नाहीं तरी पण त्या कामा करितां आजपर्यंत इतका पैसा खर्च झाला आहे कीं, त्यांत खेडेगांवच्या लोकांच्या किती तरी सोई करतां आल्या असत्या. ही योजना तुह्मास बरीच फायदेशीर होऊन तिच्या योगानें लहान लहान स्थानिक कमिट्या अस्तित्वांत येऊन त्या त्यांनीं स्वतःच वसूल केलेल्या पैशांतून तुमच्या देखरेखी खालीं आपल्या कामाची व्यवस्था करितील. याच उद्देशावर तुमच्या मानपत्रांतहि विशेष जोर दिला आहे हें मी जाणून आहे.

सभ्यगृहस्थहो, वऱ्हाडच्या कानाकोपऱ्यांतून शिक्षणाचा प्रसार करण्याची जर तुमची इच्छा असेल, जर तुह्मी आपल्या शाळांची संख्या वाढूं इच्छित असाल, व आपल्या शिक्षकांना सध्यां पेक्षां चांगला पगार देऊं इच्छित असाल तर तुह्मास आपल्या प्राप्तीचीं साधनें वाढविण्याची कांहीं तरी व्यवस्था केली पाहिजे. तुह्मास केवळ सरकारच्या पैशावरच अवलंबून राहतां येणार नाहीं. असली व्यवस्था करतां येणें शक्य आहे, या विषयीं मला पूर्ण खात्री आहे, करितां आपल्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्याची व ज्यांनीं या विभागाच्या कल्याणार्थ अतोनात परिश्रम केले आहेत त्या कमिशनर साहेबांची सल्ला घेऊन त्यांच्या साह्यानें मी सुचविलेल्या मार्गानें आपल्या प्राप्तीच्या साधनांत कितपत भर घालतां येणें शक्य आहे हें पाहण्याविषयीं मी तुह्मास निमंत्रण देतों.

सभ्यगृहस्थहो, तुह्मी आपल्या मानपत्रांत काहींसें असें ध्वनित केलें आहे कीं, मनाच्या हक्काच्या अभावीं कर बसविणें तुह्मास पसंत नाहीं, व मी ही आपल्या उत्तरांत व्यक्त केलें आहे कीं, कराच्या अभावीं मताचा हक्क देणें मला मुळींच पसंत नाहीं. वस्तुतः माझी अशी ठाम समजूत आहे कीं, एखाद्या संस्थेंत कार्यक्षम व उपयोगी जर व्हावयाचें असेल तर तिनें आपल्या उत्पन्नाच्या कांहीं भागा संबंधानें तरी जिम्मेदार असलें पाहिजे; होणें शक्य नाहीं.

तुह्मी सल्लागार मंडळें, जिल्ह्याच्या व विभागाच्या सल्लागार कमिट्या व त्यांही पेक्षां उच्च दर्जाच्या कौन्सिलांत प्रतिनिधी पाठविणें, इत्यादि आणखी कांहीं गोष्टींचा उल्लेख केला आहे. सध्यांच्या स्थानिक संस्था, स्थानिक अधिकाऱ्यांना सल्ला देणें व महत्वाच्या बाबीसंबंधानें सरकारचें धोरण काय आहे, या विषयीं त्यांच्या कडून माहिती मिळविणें, या कामाकरितां सर्वोत्कृष्ट साधनें आहेत, असें मी समजतों. किरकोळ कौन्सिलाच्या संख्येंत भर घालण्यास मी विशेष अनुकूल आहे, असें मला मोकळ्या मनानें ह्मणतां येणार नाहीं; व मला वाटतें कीं तुह्माला अगोदरच मिळालेल्या म्युनिसिपल कमिट्या व डिस्ट्रीक्ट बोर्डें ही या दोन्ही कामा करितां सध्यां उत्कृष्ट साधनें आहेत; कारण तुह्मी हें विसरतां कामा नये कीं कोणत्याही प्रकारची नवीन योजना अंमलांत आणण्या पूर्वी कमिशनरास व जिल्ह्यांतील अधिकाऱ्यास या स्थानिक कमिट्यांची नेहमींच्या ठरीव पद्धतीनें सल्ला घेतां येऊन शिवाय ठिकठिकाणच्या वजनदार लोकांचीं मतें घेण्याची ही पुष्कळ संधी मिळते; व येथील व मध्यप्रांतांतील माझ्या स्वतःच्या अनुभवावरून माझी पूर्ण खात्री आहे कीं, व्यवस्थेमध्यें कोणत्याही प्रकारची महत्वाची सुधारणा करण्याविषयीं सूचना करण्या पूर्वी लोकांचीं मतें काय आहेत, हें मुळींच न पाहणारा कोणीही अधिकारी नाहीं. सभ्यगृहस्थहो, तुमच्या आशा व महत्वाकांक्षाच्या मी मुळींच विरुद्ध नाहीं मग त्या प्रांतिक सल्लागार मंडळांत प्रतिनीधि पाठविण्या संबंधीं असो, किंवा स्थानिक संस्था किंवा लहान लहान कमिट्यांनीं जे हक्क देण्याविषयीं तुह्मी जोरानें मागणी केली आहे ते मिळण्यासंबंधीं असो. परंतु असले अधिकार देण्यापूर्वी कांहीं शर्ती पूर्ण झाल्या पाहिजेत. या विशेष जबाबदाऱ्या आपल्या अंगावर घेण्या पूर्वी स्वावलंबन, सहकारित्व, सूज्ञपणा, आत्मविश्वास व कार्यक्षमत्व इत्यादि गुणांचें पाणी तुमच्या अंगांत खेळत आहे, हें तुह्मास सिद्ध केलें पाहिजे. ज्या जबाबदाऱ्या विषयीं तुह्मी मागणी केली आहे त्या मिळाल्या नंतर हे गुण ज्यास्त दृग्गोचर होतील, हें मी पूर्ण जाणून आहे. परंतु त्यांच्या अस्तित्वाचीं स्पष्ट व बिनचूक चिन्हें तुमच्या अंगीं असलीं पाहिजेत. तीन वर्षांपूर्वी येथें जे प्रकार प्रमुखत्वानें घडून आले त्यापासून कांहींएक फायदा होण्याची आशा दिसून येत नव्हती. ते आतां नष्ट प्राय झाले आहेत. व मी ते तुमच्या बरोबरच विसरून जाण्यास तयार आहे. माझें स्वतःचें मत असें आहे कीं, एकंदर परिस्थिति अत्यंत आशाजनक आहे व प्रगति व जनतेचे अधिकाऱ्यांशीं सहकारीत्व, यांच्या नवीन युगाचा वऱ्हाडांत उदय होत आहे, असें माझें मन मला सांगत आहे.

म्युनिसिपल कमिटी व डिस्ट्रिक्ट बोर्डाचे सभासदहो, तुमचीं स्नेहपूर्ण मानपत्रें व त्या बरोबरच तुह्मी मला अर्पण केलेल्या मुल्यवान नक्षी कामांच्या जिनसां बद्दल मी तुमचे मनःपूर्वक आभार मानून आपलें भाषण संपवितों, व तुह्मास आश्वासन देतों कीं, माझ्या येथें येण्याचें स्मारक या दृष्टीनें मी त्यांची नेहमीं चहा करीत राहीन.

वऱ्हाडसमाचार.

कार्तिक शु॥ १२ शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

## लॉर्ड मोर्ले यांची कारकीर्द.

लॉर्ड मोर्ले यांनीं हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरीची जागा सोडून लॉर्ड प्रेसिडेंट ऑफ दि कौन्सिलची जागा पतकरली ही अकल्पित बातमी ऐकून हिंदुस्थानांतल्या सर्व मतांच्या लोकांस सखेदाश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. लॉर्ड मोर्ले हे नुसते मिस्तर मोर्ले होते तेव्हांपासून त्यांच्या विषयीं हिंदुस्थानच्या सुशिक्षितांच्या मनांत आदर वागत आहे. जॉन स्टुअर्ट मिल्लसारख्या कट्ट्या उदार मतवाद्याचे पट्टशिष्य, आणि हिंदुस्थानचा कैवार घेऊन पार्लमेंटांत वाग्युद्ध करणाऱ्या बर्क सारख्या वीराचे चरित्रकार, ह्मणून त्यांचे लेख सुशिक्षितांत अत्यंत प्रिय झालेले होते त्यानंतर ग्ल्याडस्टन साहेबांचे उजवे हात, आणि कान्सर्वेटिव्ह पक्षाचे निर्भीड टीकाकार ह्मणून त्यांच्या लोकप्रियतेंत अधिकच भर पडली होती. असे उदार मताच मुत्सद्दी हिंदुस्थानचे राजकीय सूत्रधार ह्मणून आपणांस लाभावे अशी हिंदुस्थानांतल्या मनुष्यमात्राची इच्छा होती. कर्मधर्मसंयोगानें व ईश्वरी कृपेनें ती इच्छा पूर्ण झाली. १९०६ सालीं पार्लमेंटाची निवड होऊन लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला, तेव्हां मोर्ले साहेब हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी झाले. आज जवळ जवळ पांच वर्षें हिंदुस्थानचीं राजकीय सूत्रें यानीं चालविलीं. या पंचवार्षिक कारकीर्दीचा आढावा काढूं लागलों ह्मणजे आरंभीं मन गोंधळल्यासारखें होतें, आणि ज्यानें आयर्लंडांतल्या लोकांना स्वराज्य देण्या साठीं ग्ल्याडस्टन साहेबांच्या बरोबरीनें पार्लमेंटांत झटापटी केल्या, ज्यानें मिल्लबर्क प्रभृतीच्या उदारमतांचे पाठ साऱ्या जगाला मार्मिक रीतीन शिकविले व 'सच्चा जॉन' 'प्रामाणिक जॉन' असें सर्वांकडून ह्मणविले, ते मोर्ले साहेब आणि बंगालची फाळणी ही राजकीय दृष्टया घोड्यापेक्षां चूक झाली असली तरी ती गोष्ट ठाम ठरलेली आहे—वज्रलेप झालेला अन्याय आहे—तो आतां दूर करावयाचा नाहीं हें ठरलेलें आहे असें ह्मणणारे, प्राच्य देशांना पाश्चात्य संस्था कधीं मानावयाच्या नाहींत, त्यांना स्वातंत्र्य उपयोगाचें नाहीं, तेथें दडपशाहीच पाहिजे असें कंठरवानें सांगून न्यायाच्या कोर्टांत चौकशी केल्यावांचून शिकल्यासवरलेल्या पुढाऱ्यास हद्दपार करण्याची मंजुरी देणारे, मुद्रणस्वातंत्र्याच्या व वाक्स्वातंत्र्याच्या नाड्या आखडणारे मोर्ले साहेब एकच कीं भिन्न अशी प्रामाणिकपणाची शंका मनांत उद्भवते. पण हिरा मालिन झाला तरी त्याची तेजस्विता नाहींशी होत नसते. त्याप्रमाणें अधिकाऱ्यांच्या एकतर्फी रिपोर्टामुळें ह्मणा, किंवा इंडिया कौन्सिलांतल्या सल्लागार मंडळाच्या शिकवणीनें मन कलुषित होऊन ह्मणा, जरी मोर्ले साहेबांनीं आपल्या पूर्वीच्या लौकिकाशीं विसंवादि कृत्यांना मंजुरी दिली असली, तथापि त्यांची कौन्सिल सुधारणेची योजना त्यांच्या कीर्तींत चिरकालीन भर टाकणारी झाली हें सर्व पक्षांच्या लोकांस कबूल केलें पाहिजे. हिंदुस्थानचे लोक कितीही सुशिक्षित व कितीही कर्तृत्ववान् असले तरी त्यांना कलेक्टरच्या दर्जावर कधीं नेमावयाचें नाहीं त्यांना गव्हर्नर व गव्हर्नर जनरल यांच्या शेजारीं एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांत जागा मिळून एक दोन खात्यांच्या व्यवस्थेची पूर्ण जबाबदारी त्यांचेकडे सोंपविण्यांत यावी, आणि ही सगळी गोष्ट अवघ्या पांच वर्षांच्या अवधींत इंडिया कौंसिलात सर डेन्हिडब्बार, सर डब्ल्यू लीवार्नर, प्रभृति हिंदुस्थानच्या महत्वाकांक्षेच्या कट्टया शत्रूंच्या देखत घडून यावी हें आश्चर्य आहे, आणि हें घडवून येण्याला जर कोणी कारण असेल तर तें मोर्ले साहेबांच्या मनाची खंबीरता, हिंदुस्थानला न्यायानें वागविण्या विषयींची त्यांची आतुरता, आणि त्यांचें मानसिक औदार्य होय यांत तिळमात्र शंका नाहीं. लॉर्ड मोर्ले साहेबांच्या हातून त्यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं ज्या चुका झाल्या त्या झाल्या नसत्या तर त्यांचें नांव हिंदुस्थानच्या गेल्या दीडशें वर्षांच्या इतिहासांत लॉर्ड कार्नवालिस, सर विल्यम बेंटिंक किंवा लॉर्ड क्यानिंग यांच्या ही वर लागलें असतें. त्या चुकांचें परिमार्जन सदर कारकीर्दीच्या उत्तरार्धांत होऊन त्यांच्या शुभ्र कीर्तिचंद्राला लागलेलें ग्रहण सुटलें, आणि मुत्सद्दीपणाच्या कुटिलत्वामुळें दडपला गेलेला जॉनचा सच्चेपणा अखेरीस हिंदुस्थानच्या लोकांच्या प्रत्ययास पूर्णपणें आला. जॉन मोर्ले यांच्या मागून त्यांची गादी चालविण्यास पूर्णपणें लायक मुत्सद्दी मिळणें कठीण आहे. 'आह्मी आमच्यांतलें रत्न हिंदुस्थानाला दिलें आहे' असें इंग्रज लोक ह्मणत आले. त्याचा खरा अर्थ सुधारणेची योजना बाहेर पडेपर्यंत आह्मांस पूर्णपणें कळला नव्हता; पण आतां त्याची सार्थता प्रत्ययास येत आहे. मोर्ले साहेबांच्या मागून येणारे लॉर्ड क्रयू स्वतः कांहीं नवीन वळण न घालून देवोत, पण पूर्वीचें वळण तरी कायम राखोत ह्मणजे झालें.

## चिनी पार्लमेंट

प्राच्य देशांना पाश्चात्य राजकीय संस्था कांहीं उपयोगाच्या नाहीत असें प्रतिपादणारे तज्ज्ञ मुत्सद्दी आपली शिक्केकट्यार खालीं ठेवण्याला, आणि चीन सारख्या अत्यंत प्राचीन आणि प्राच्यांतल्या प्राच्य देशाच्या हाडांत पार्लमेंट सारख्या पूर्णपणें पाश्चात्य आणि स्वतंत्र राजकीय संस्थेचा जीव संचरण्याला एक गांठ पडावी हा अपूर्व योग छटला पाहिजे. चिनी लोकांच्या चालीरीती, त्यांच्या रूढ समजुती, त्याची पात्रता, वगैरे गोष्टींसंबंधानें चीनचा बादशहा किंवा त्यांचें प्रधानमंडळ यांचे पेक्षां लॉर्ड मोर्ले साहेबासारख्याला ज्यास्त माहिती असण्याचा यत्किंचितही संभव नाहीं. चीनच्या बादशहाला व त्याच्या प्रधानांना आपल्या राज्याच्या कल्याणाविषयीं, किंवा संस्थांच्या चिरस्थायित्वाविषयीं मोर्ले साहेबापेक्षां अधिक कळकळ खास असणारच. असें असतां पार्लमेंटची संस्था देण्याइतकी पात्रता चिनी लोकांत आली आहे असें ते ह्मणतात, व पार्लमेंट संस्था स्थापित करण्याचा उद्देश जाहिर करतात, आणि मोर्लेसाहेब प्राच्य देशांत पाश्चात्य संस्था चालवितां यावयाच्या नाहींत हा मंत्र घोकीत बसतात! तेव्हां यांत धृष्टता कोणत्या बाजूला आहे हें सहज कळण्यासारखें आहे. जपान, इराण, तुर्कस्थान, आणि आतां सर्वांत पुराणमताभिमानी असा चीन देश या सर्वांच्या इतिहासांत गेल्या

दहापांच वर्षांत घडून आलेल्या क्रांतीचें धोरण कोणीकडे आहे हें पाहिलें तर सगळ्या एशिया खंडांत नव्या जीवनाचा संचार झाला आहे ही गोष्ट कबूल करावी लागते. यापुढें तरी या नवजीवनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं असें पाश्चात्यांना लवकरच वाटूं लागेल असा सुमार दिसतो.

## गेल्या सालचें मराठी वाङ्मय.

मुंबईचें मराठी ग्रंथसंग्रहालय ही एक अत्यंत उपयुक्त संस्था आज बारा वर्षें मराठी वाङ्मयाच्या संग्रहार्थ मनापासून झटत आहे. या संस्थेचा गेल्या सालचा वृतांत नुकताच बाहेर पडला आहे त्यावरून या वर्षांत मराठी भाषेंत किती बऱ्यावाईट पुस्तकांची भर पडली तें काढतां येतें. अध्यात्मविषयांत रा. राजवाडे यांच्या ज्ञानेश्वरीच्या चिंधड्या बडोद्याचे रा. चिपळूणकर यांनीं उडविलेल्या श्रुतच आहेत. रा० बाबा गर्दे यांची 'ब्रह्मसिद्धान्तमाला' मात्र अपूर्व आहे. अधिकारयुक्त रचना आहे. बाकीचीं तीनचार निवळ भाषांतरें आहेत. इतिहासांत डे० व्ह० ट्रा० सोसायटीनें प्रसिद्ध केलेली श्री. सवाई माधवराव यांची रोजनिशी भा. २ आहे. याशिवाय रा. केळकरकृत आयर्लंडचा इतिहास सध्याच्या क्रांतिकारक वेळीं वाचण्यालायक आहे. कवितारूप ग्रंथांत आभिनव काव्यमाला, वनवासी फूल, मुरली विलाप, बापाचे अश्रु, वगैरे छोटेखानी काव्यें आहेत. मोठेंसें एक सुद्धां काव्य नसावें ही खेदाची गोष्ट आहे. कादंबऱ्यांत कालिकामूर्ति ( ब्रांझ स्टॅच्यूचें रूपांतर ) ही बरी आहे. अनंग मोहिनी हें एक साधेंच कथानक पण चांगल्या प्रकारें बंगाली भाषेंत सजविलेलें मराठींत आणलेलें आहे. कथामकरंद हा काउंट टाल्स्टॉयच्या गोष्टींचा संग्रह आहे. रूपांतर कुशलतेनें केलें आहे. भद्रंभद्र सारखा पाचकळपणा मराठी भाषेंत कमी येईल तेवढा बरा. कोशांत रा. वासदेवराव आपटे यांचें मराठी भाषेचें संप्रदायाचें पुस्तक आहे. एकदोन गणित व ज्योतिषविषयक क्षुद्र पुस्तकें आहेत. चारित्रविषयक पुस्तकांत उमाजी नाईक, स्वामी रामतीर्थ, माधवराव रानडे व मरहूम जॅक्सन साहेब यांचीं चरित्रें आहेत हीं सगळीं वाचनीय आहेत. धर्मविषयक असे तीनच ग्रंथ आहेत. पैकीं एक मनुस्मृतीचें व एक ऋग्वेद संहितेचें अशीं दोन भाषांतरें आहेत. तिसरें 'पंचपरमेष्ठी गुण' हें आमच्या अवलोकनांत आलेलें नाहीं. नाटकांत 'विवाहविभ्राट' हें एका बंगाली पुस्तकाचें भाषांतर आहे. या पुस्तकाचे भाषांतरावाचून मराठी भाषेचें दारिन्द्य दूर व्हावयाचें नाहीं अशी प्रकाशकाची समजूत होण्यास वास्तविक कांहीं कारण नव्हतें. भाऊबंदकी, श्रीमती, उषा वगैरे नाटकें प्रसिद्धच आहेत. प्रणयविकसन व संगीत प्रणयानंद या रा. अजगांवकराच्या दोन कृती पैकीं पहिलें तरुणी शिक्षण नाटिकेचें भावंड आहे. तें रा. अजगांवकरांनीं लिहिलें नसतें तर त्यांच्या दुसऱ्या कृतीचा चांगुलपणा विरोधानें इतका स्पष्टपणें कदाचित् दिसला नसता. निबंधग्रंथांत 'विधिसंस्था' हें स्पेन्सरच्या ग्रंथाचें भाषांतर आहे. 'आर्य लोकांचें मूलस्थान' हें पुस्तक होऊन पुष्कळ वर्षें झालीं. गेल्या सालच्या यादींत तें येण्याचें कारण नव्हतें. 'सांप्रतच्या लेखकांचें कर्तव्य' हें रा. ओकासारख्या कसलेल्या वृद्ध लेखकानें लिहिलें आहे. ह्मणून त्याला मान द्यावयाचा. बाकी पुस्तकांत कांहीं अर्थ नाहीं. रा. केळकर यांना मनुस्मृतींत सगळी घाण दिसली ती त्यांनीं 'त्रिविधज्ञान विस्तारां'तून प्रथम ओकली, आणि आतां पुस्तकरूपी मडक्यांत भरून टेविली आहे. तिला उकिरडा हेंच स्थान योग्य आहे. प्रवासवर्णनांत 'कैलासमानससरोवर' व 'वेरूळचीं लेणीं' हीं दोन्हीं चांगलीं आहेत. मथुरावर्णन बरें आहे. भाषाविषयक ग्रंथांत 'ज्ञानेश्वरीचें व्याकरण' विचार करण्या सारखें आहे. मराठी शद्वसिद्धि व निबंधलखन आणि अनुवाद हीं विद्यार्थ्यांनीं वाचण्यालायक आहेत. शास्त्रीयविषयक ग्रंथांत व्यायामशास्त्र, रेशीम, मणबत्या, हिंदुस्थानांतील सर्प, हिंदुस्थानी संगीत पद्धति व शारीर आणि वैद्यकशास्त्र हे ग्रंथ संग्राह्य आहेत; विविध पुस्तकांत 'सुदाम्याचे पोहे' विनोदयुक्त व जोरदार अशा दोन्ही प्रकारच्या भाषेचे नमुने पुढें मांडणारें आहे.

या पुस्तकांपैकीं बऱ्याच पुस्तकांवर विस्तृत टीकापर लेख आमच्या पत्रांत येऊन गेले आहेत.

## कर्मयोगिन् वरील खटला

कर्मयोगिन् पत्राच्या मुद्रकावरील खटल्यांत कलकत्ता हायकोर्टाचे जज्ज न्या. फ्लेचर व होमवुड यांनीं दिलेला निकाल नुसता समाधानकारकच नाहीं, तर सरकार व प्रजा या दोघांनाही पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. या पत्रांतल्या ज्या लेखासंबंधानें सरकारि अधिकाऱ्यांचा आक्षेप होता, ते लेख अशा स्वरूपाचे होते कीं ते न्यायाच्या वरिष्ठ कोर्टांत शिक्षेस पात्र ठरले असते तर सरकारच्या राजनीतीसंबंधानें प्रजेनें नुसती असंमति प्रदर्शित करणें, किंवा प्रजेनें किती मर्यादेपर्यंत महत्वाकांक्षा बाळगावी याचें नुसतें दिग्दर्शन करणें सुद्धां धोक्याचें होऊन बसलें असतें, व टीकाकारांना स्पष्टवक्तेपणा व मर्यादित स्वातंत्र्य यांना रजा देऊन सरकारी अधिकाऱ्यांचें स्तुतिपाठकत्व पतकरण्या खेरीज दुसरें काम उरलें नसतें. ब्रिटिश अंमलाखालीं असलेल्या हिंदी प्रजेला अशी स्थिति प्राप्त होणें हें सरकारला व प्रजेला उभयतांनाही भूषणावह झालें नसतें. ही अनिष्टापत्ति वरील न्यायमुर्तींच्या योग्य निकालामुळें टळली याबद्दल सरकार व प्रजा दोघेही न्यायमूर्तींचे आभारी राहतील. वर्तमानपत्रांत सरकारी अधिकाऱ्यांच्या धोरणाविषयीं नापसंती दाखविणें, किंवा अशा धोरणाला मदत करूं नका ह्मणून प्रजेस सांगणें गुन्हा होत नाहीं हें न्यायमूर्तींनीं ठरविलें आहे, तें रास्त आहे. नापसंती ह्मणजे द्वेष किंवा तिरस्कार असा अर्थ करण्याकडे पोलिसांची प्रवृत्ति झालेली केव्हां केव्हां दृष्टीस पडते. तिला या निकालानें आळा पडून विचार व उच्चार यांचें स्वातंत्र्य योग्य मर्यादेंत आतां अबाधित राहील. कर्मयोगिन् पत्राचीं मतें व त्याचें धोरण दोन्ही आह्मांस पसंत नव्हतीं. लॉर्ड मोर्ले साहेबांनीं कौंसिलासंबंधीं ज्या सुधारणा केल्या त्याचें महत्व कमी करून दाखविण्याचा त्या पत्राच्या लेखकाचा यत्न आमच्या मतें स्पृहणीय नव्हता. तथापि तो केवळ मतभेदाचा प्रश्न होता. मोर्ले साहेबांच्या हातून हिंदुस्थानाला याहून अधिक हक्क मिळाले असते तरी ते आह्मांस पाहिजेच होते. पण ते सगळे मिळाले नाहींत ह्मणून रुसून जे मिळाले आहेत त्यांची वाजवी योग्यता न समजतां ते फेंकून देणें हा आमच्या मतें आततायीपणा नसला तरी मूर्खपणा खास आहे. जे हक्क मिळाले आहेत त्यांचें पूर्ण फळ पदरांत पाडून घ्या, आणि ज्यास्ती मिळविण्याचा हट्ट धरा, हाच कायदेशीर व शहाणपणाचा मार्ग स्वीकारला आहे व नेमस्त पक्षानें हाच मार्ग स्वीकारला आहे. याच्यां उलट उपदेश करणारे जे आहेत त्यांच्याविषयीं अर्थात् आह्मांस सहानुभूति नाहीं; पण मूर्खपणा आणि राजद्रोह यांच्यांत फार मोठी खिंड आहे ही गोष्ट कर्मयोगिन् पत्रावरील खटल्याच्या निकालानें पोलिसाच्या डफ्तरावर बिंबेल तर बरेंच कार्य होईल असें आह्मांस वाटतें. यापासून लेखकानाही बोध घेतां येईल, आणि लेखनस्वातंत्र्य हिंदुस्थानांत किती मर्यादित आहे, व टीकाकारांच्या मार्गांपैकीं किती भाग निष्कंटक व किती धोक्याचा आहे तें ही त्यांना कळून येईल. हिंदुस्थानांतल्या संपादकांचें कर्तव्य हल्लींच्या काळांत फार नाजूक झालें आहे. टेबलावर बाटल्या टेवून त्यांवर कसरत करणारा डोंबारी ज्याप्रमाणें आपलें लवचिक अंग पाहिजे तेथें वळवून, आणि आपला तोल संभाळून कसरत करतो त्याप्रमाणें सध्यां संपादकाला आपली लेखणी लवचीक ठेवून बुद्धिविषयक कसरतीचा खेळ करावा लागत आहे. ही स्थिति ह्मणजे कायमची होऊन बसेल असें नाहीं. असें तरवारीच्या धारेखालीं वर्षानुवर्ष काम करीत राहणें कोणालाही आवडणार नाहीं. खुद्द सरकारी अधिकाऱ्याना सुद्धां कळकळीची सहानुभूति किंवा संमति अग्राह्य वाटून ते थोडासा सैलपणा स्वीकारतील. पण त्यांचा सैलपणा ह्मणजे संपादकांना आपली लेखणी स्वैर सोडण्याची सनद असें मात्र होऊं नये ह्मणजे झालें. प्रजेला तिच्या इभ्रतीप्रमाणें सन्मानानें व विश्वासानें वागविणें हें असें सरकारचें कर्तव्य आहे त्याच प्रमाणें सरकारविषयीं ही सद्धेतुपूर्वक, आदरपूर्वक, आणि त्यांच्या विषयीं प्रेम ठेवून योग्य शद्वांनीं आपलें मनोगत व्यक्त करणें हें अलीकडच्या देशमुखांचें कर्तव्य करणाऱ्या वर्तमानपत्रकर्त्यांचें काम आहे हें विसरतां कामा नये.

## वाहवा रे योगसाधन!

सहा महिन्यां पूर्वीं बाबू अरविंद घोष यांच्यावर वारंट निघाल्याची बातमी वर्तमानपत्रांत येण्याला व त्यांनीं यः-पलायन केलें असें प्रसिद्ध होण्याला जशी एक गांठ पडली होती, तशी आतां कर्मयोगिन् पत्राचा प्रकाशक निर्दोष ठरल्याची व बाबूसाहेबांना आपण अमके ठिकाणीं योगसाधन करीत आहों असें जाहिर करण्याची एकच वेळ घडली हें एक मोठें आश्चर्य आहे. अथवा आश्चर्य कसलें? मनुष्याच्या शीलाची व धैर्याची परीक्षा त्याच्या संकटाच्या काळीं होत असते. जेव्हां वातावरण निर्भय होतें, तेव्हां बाबूंचा देशाभिमान, वक्तृत्व, आणि जोरदार लेख यांना ऊत आला होता, आणि जहाल पक्षाचे पुढारी होण्यांत त्यांना भूषण वाटत होतें. वारंट सुटतांच आपल्या नेतृत्वाखालीं संकटांत असलेल्या जहाल पक्षाविषयींची ममता टाकून बाबू योगसाधनासाठीं गुपचिप निघून गेले. योगसाधन आणि तेंही ब्रिटिश हद्दींत नव्हे—फ्रेंच हद्दींत पांडिचरी येथें. बरें योगसाधनांत निमग्न झाल्यावर इकडे लोकांनीं केलेल्या निंदास्तुतीची पर्वा त्यांनीं कां करावी? पण नाहीं. इकडचा मायापाश सुटला नाहीं. कर्मयोगिन् पत्राचा प्रकाशक निर्दोषी ठरल्याची तार वाचतांच बाबू अरविंद पुनः मद्रासच्या 'हिंदु' पत्रांत प्रगट होतात! कर्मयोगिन् पत्रांतले आक्षिप्त लेख मि. घोष यांचे असल्यामुळें ते कायदेशीर टीकेखालीं येतात असें कळल्यावर निर्भयपणें उजळ माथ्यानें वावरण्यास काय हरकत आहे? अरविन्द बाबूंचें हें योगसाधन अजब आहे यांत शंका नाहीं.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान— पाऊस दोन इंचांवर झाला आणि सर्व लक्षणें पर्जन्यकालाचा द्वितीय प्रारंभ सूचवूं लागलीं. खरीपाच्या उभ्या पीकांस थोडा बहुत धक्का पोचला आहे. हवेंतील चिलबिचलीमुळें दुरूणीं व रोग हीं बळावलीं, पण पुनः ऋतुमान लवकरच नित्याच्या हिंवाळ्याच्या स्वरूपाला येईल असा रंग दिसतो.

स्वागत— रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे विलायतेहून परत मंडाले कडून उमरावतीस सुखरूप येऊन पोहोंचले हें कळविण्यास फार आल्हाद वाटतो. वऱ्हाड प्रांताचे हे विद्वन्मणी पाश्चात्य अनुभव व पौर्वात्य अनुभव यांचें एकीकरण करितांना राजकर्ते व प्रजाजन यांची मनें प्रस्तुतच्या सुधारणेच्या कार्यभूमीवर अधिकाधीक संयुक्त करण्याची कला लोकां पुढें मांडतील असा आह्मांस भरंवसा आहे.

अभिनंदन— रा. रा. अब्दूल मुझफर सय्यद असगर हुसेन, इलिचपूर हे वऱ्हाडचे १ले बारिस्टर होऊन आले ह्मणून त्यांच्या यशश्रीचें कौतुक करून अभिनंदन करण्या साठीं येथें गेल्या ३० वे तारखेस सार्वजनिक जलसा झाला. हे तरुण गृहस्थ आपल्या सुनीतीनें व पराक्रमानें लौकिकास चांगले चढोत असें आह्मी मनापासून इच्छितों.

धन्यवाद— खान साहेब अमानखा सालिमखान सौदागर, आनररी म्याजिस्ट्रेट व मुनासिपल व्हाइस चेअरमन यांनीं प्लेगाच्या वेळी प्रवृत्त करण्याच्या कामीं दिलेल्या मदतीला प्राधान्य देऊन सरकारांनीं 'खानसाहेब' हा किताब दिला ह्मणून येथील नागरिकांनीं त्या मान्य व्यक्तीला व सरकारला जाहिर सभेंत गेल्या भाऊबीजेला ओंवाळून मोठा गौरव केला. 'मान्यान् मानय' ही भर्तृहरीची नीति आमच्या नागरिकांस समजण्याला दोन रावबहादूर व एक रावसाहेब त्या त्या पुज्य स्थानाला येऊन पुढाकार घेई पर्यंतचा दीर्घकाल लागला तरी देखील गुणज्ञता ही सर्वत्र आदरणीय होय.

**नांगराची शर्यत**— मेजर फ्रीडन साहेब डिपुटी कामिशनर यांच्या अध्यक्षते खालीं एक पूर्व सभा काल सकाळीं भरली होती आणि तेथें नांगरांचें सप्रयोग प्रदर्शन येथील 'कृषिप्रयोगालयांत येत्या जानेवारींत भरविण्याचा संकल्प ठरविण्यांत आला. या कार्यासाठीं ४५० रुपये वर्गणी त्याच बैठकींत जमली. शेती खात्याचे डायरेक्टर मे. लो साहेब यांनीं ५० रुपये आगाऊच पाठविले आहेत.

रा. रा रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस कंटनालिकागत अर्धांगाच्या विकृतीनें गेल्या ३० वे तारखेला बाळापुरास देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. पेन्शनीला लागणारीं पुरीं वर्षें भरून काढण्या साठीं ते सध्यां फर्लो रजेवर होते आणि त्यांची देहयात्रा इतकी लवकर संपेल असें कोणास वाटलें देखील नव्हतें! हे वऱ्हाडचे २रे बी. ए. हे आपल्या कर्तबगारीनेंच इतक्या हुद्यावर चढले आणि ते स्वभावानें प्रेमळ असून आपल्या कामांत चोख व निस्पृह असत. त्यांच्या मागें त्यांचे तिघेही चिरंजीव आपल्या वडिलांचा लौकिक वाढवितील अशी आह्मांस उमेद आहे.

## जाहिर नोटीस.

नोटीस बेशमी कीसन वल्द चिंधु गारपगारी रा. जानोरी तालुके खामगांव यांस—

मी खालीं सही करणारी गंगा मर्द कीसन गारपगारीन रा. व पोष्ट आंजनीखुर्द इजकडून कळविण्यांत येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असल्यानें तुह्मी आकोला सुदर्शनपत्र रविवार तारीख ९।१०।१० ई॥ चा अंक २९ यांत माझा बाप तुकाराम गारपगारी रा. आंजनीखुर्द यांस मला आणून घालण्या बद्दल जाहीर नोटीस दिली ती अगदीं खोटी आहे. तुमच्याशीं माझें लग्न ७।८ वर्षां पूर्वींच झालें. लग्नांत पंचा समक्ष फक्त अगदीं हीन रुपें वजन तोळे ३२ व सोनें ३॥ मासे इतक्यांच्या चिजा तुह्मी माझे अंगावर घातल्या होत्या. याशिवाय कांहीं एक नव्हतें. आपल्या जातीरिवाजा प्रमाणें मुळपाटी करून मला घरीं घेऊन जाण्याचें जातीचे पंचानें तुह्मांस ह्मटलें परंतु तुह्मी तसें केलें नाहीं ह्मणून माझे बापानें आप होऊन मला तुमचे घरीं लग्न झाल्या सालींच नेलें तर तुह्मी लागलीच मला वापस केलें मो अगदीं अज्ञान दशेंत असताना कसें तरी लाजितीकाजितीनें माझे बापानें मला वागाविलें. परंतु त्याची फारच गरीबी असल्यामुळें मला फार पासमार होऊं लागले. तें सहन न झाल्यानें त्यास न कळत मी माझे आंगावरील एकंदर चिजा मोडून विशेष तंगीनें १ वर्षभर माझा स्वतःचा चारितार्थ केला. पुढें कर्ज कोणीच देईना ह्मणून आपल्या जातवाल्यास असा करार केला कीं, पांच वर्षांचे आंत तुमची व्याज मुद्दलसुद्धां सर्व रक्कम एकदम दिल्याखेरीज मी माझे नवऱ्याचे घरींसुद्धां नांदण्यास जाणार नाहीं. अशा शर्तीवर सालीना ५० रुपये खर्चा करितां काढीत जाऊन आजपावेतों तुमचें नांव राखलें. मी शहाणी झाल्यासहि चार वर्षें होत आलीं आहेत. इतक्या अवधींत फक्त गुदस्तसालीं तुह्मी प्रथम आले तर वरील कर्जदारी आदा करून मला घेउन चला ह्मणून मी पाठीस लागल्या वरून मला थाप दिली कीं, आठ दिवसांत पैसे घेऊन येतों व तुला घेऊन जातो त्यावर नुस्तेच आले आणि परभारें थोडे दिवस लोकांची नोकरी करून तोही पैसा काय केला माहीत नाहीं, मात्र आह्मास कांहीं दिलें नाहीं. यावरून तुह्मी बाहेरख्याली कामांत कमाइचे सर्व पैशांची अशाच वाताहत लाविता अशी पूर्णखात्री झाली व याचमुळें तुह्मास माझी गरज नाहीं असें दिसतें. फक्त लोकांचे ल्हेस्तव एकदां माझे बापास वाटे लावितां काय ह्मणून विचारलें त्या वेळेस येथील कारभारी पाटीलही हजर होते त्यांचे समक्ष बोलले कीं, पूर्वींची तर लबाडी केली पण आतां आठ दिवसांचे आंत सर्व रक्कम घेऊन येतों व तुला घेऊन जातों असें ह्मणून चालते झालात तों आजवर येथें आले नाहीं. फक्त चालू महिन्यांत वरील नोटीसीनें माझे बापास धमकी दिली परंतु ती व्यर्थ आहे. कारण वरही दागीनें मीं स्वतः मोडले ह्मणून कळविलें आहे त्याबद्दल एक पैचा सुद्धां माझा बाप तुमचा लागणदार नाहीं. आणि माझी तुह्मी हेळसांड केल्यामुळें मजबद्दल ही जबाबदार नाहीं. फिर्याद जरी कराल तरी व्यर्थ खर्चांत बुडाल कारण दयाळू सरकार ज्याचा न्याय त्यास यथायोग्य देतात. असो आतां माझा करार भरल्यामुळें जातीवालेसुद्धां एक कवडी देखील देत नाहींत. व मागील रक्कम एकदम वसूल करण्या करितां माझे मागें फार सक्त तगदा चालूं आहे ह्मणून लाचारदर्जें सदरहू जाहीर नोटीसीनें अखेरचे वेळीं कळविते कीं, ही नोटीस जाहीर झाले तारखे पासून आठ दिवसांचे आंत पांच वर्षांचे खर्चा बद्दल २५० अडीचशें रुपये आणि त्या रकमेचें व्याज आज तारखे पावेतों दरमहा दर शेंकडा २ रुपये हिशेबानें जें होईल तें आणि ह्या नोटीसाचा खर्च ही सर्व रक्कम नगदी रोख येथें घेऊन येऊन माझे हातानीं ज्याची त्यास आदा करून त्यांच्या पावत्या योग्य कायदेशीर मिळवाव्यात शिवाय आज पासून मजकडून अथवा माझे आप्त वगैरे कडून तुझे जित्रास धक्का पोंचणार नाहीं अथवा त्रास देणार नाहीं. त्रास दिल्यामुळें ज्या तारखे पासून तुझे इच्छित ठिकाणीं राहशील तेथून दरमहा सहा रुपये प्रमाणें मजकडून अथवा माझे पश्चात माझे स्वसंपादन आणि वडीलोपार्जितचे इस्टेटींतून वसूल करून खाण्याचा तुला अखत्यार आहे. असा योग्य कायदेशीर लेख तुझा तुमचे खर्चानें माझे बापास मजबद्दल करून दिला पाहिजे. सदरहु मुदतींत अशी तंतोतंत व्यवस्था करून मला घेऊन गेल्यास मी नांदण्यास तयार आहे. न केल्यास हीच फारकत समजून लागलीच मी दुसरा नवरा करीन आणि कर्जातून मोकळी होईन. मग नवरेपणाबद्दल अथवा खर्चाबद्दल अथवा दागीन्यां बद्दल मी किंवा माझा बाप आणि मी केलेला नवीन नवरा यांपैकीं कोणावरही तुमचा हक्कसंबंध बोजा चालणार नाहीं. कळावें तारीख १ ९।११।१० ई॥ दस्तुर विठ्ठल लालसिंह छत्री रा. आंजनीखुर्द.

सही

गंगा मर्द किसन गारपगारीन रा. व. पोष्ट आंजनीखुर्द ता. मेहकर जि. बुलडाणा इचे हातची नि० खु०

नो० नं० ण १९

---

## नोटीस

१ रा० हरीलालसा वल्द सीतलसा पुराड व २ रा० शामलाल ओंकारसा पुराड दोघे राहणार मलकापूर जि० बुलडाणा यांस-

खालीं सही करणार नोटीस देतो कीं मी घरून धाकाच्या मारानें ८-१५ दिवस गांवोगांव फिरत असतां तुह्मी मजजवळून एक गहाणखत अजमासें दीड महिना झाला दोन हजार रुपयांचें पोकळ लिहून मी अविभक्त कुटुंबांतील इसम असतांही तेवढ्यापुरती पैशाची लालूच दाखवून घेतलें. मी अज्ञान असून माझें पारवय आहे. मी घरचा स्वतंत्र नाहीं. मला माझ्या वाडवडिलांच्या सल्या वांचून कांहीं एक देवघेव करतां येत नाहीं. तुह्मी मला फुसलावून माझ्या वडिलार्जित इस्टेटी पैकीं माझा सहावा हिस्सा आमची वाटणी वगैरे झाली नसतां लिहून घेतला असा विश्वासघात केला. हा व्यवहार मला मुळींच कबूल नाहीं व मीं करून दिलेला रोखा बातल आहे. तो म्यां पोरकट बुद्धीनें रागांत केला असल्यानें मान्य नाहीं व त्याची जबाबदारी माझ्या वडिलार्जित इस्टेटीवर कोणत्याही प्रकारें येऊं शकत नाहीं. या नोटिशीचा खर्च, तुह्मावर पडेल. कळावें. ता० ९-११-१० इ०

सही

शेखजी वा॥ महंमद अशरफ राहणार बिस्वा चांदूर ता० मलकापूर दस्तुर खुद.

नो. नं. २० ण

---

## नोटीस

नोटीस बेशमी— खालीं सही करणार हिजकडून नोटीस देण्यांत येतें कीं बहेरनाथ वा॥ भुजंगनाथ मुक्काम रुधानें ता० जळगांव पोष्ट तामगांव जि० आकोला यांसः—

सांदखेडाहून बजाबाई मर्द गोरखनाथ हिजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमचे लहाने भावाची बायको आहे व मी तुमचा वडिलाचा मान राखत आहे. बरेच दिवस झाले मी व तुमचे भाऊ गोरखनाथ आह्मी भमयता सिंदखेड मुक्कामीं राहण्यास आलों. आज अंदाज १० वर्षें होत आलीं. तुमचे भाऊ ८ महिने झाले मयत झाले आहे तर आपण सिंदखेड मु० एक दिवस येऊन माझा मुलगा नामें जयवंगीनाथ यास तुह्मी दुकान लावून देतों या हेतूनें तुह्मी माझ्या जवळून घेऊन गेले. तुमच्या मनाचा कल काय होता तो समजला नाहीं. शेताची रकम मागण्याचे हेतुनें व माझ्या मुलास नेण्याचे हेतूनें मी आली होती. कारण दीपवाळी जवळ आली होती ह्मणून तुमचे ... वडीलानें असून तुह्मी कांहीं एक विचार न करितां मोनाजी एव्हारे यांचा सल्ला घेऊन मला मारहाण करून वाटे लावल व माझे पोरास वरात कोंडून टाकिलें. मी तुमची बाहेरी खरी मारले याजबद्दल कांहीं नाहीं व मुलास ठेविलें याजबद्दलही कांहीं मनांत नव्हतें. परंतु तुह्मी कपट बुद्धीनें मारलें व पोरास फितूर दिला आतां तुमची नियत बिघडल्या सारखी झाली ह्मणून नोटीस देण्यांत आली. तुमचे नांवानें शेता ह्मणजे तुह्मी वडील भाऊ होते ह्मणून तुमचे नांवानें राहिली. त्याचा तुह्मी हिस्सा मयताचे मार्गे बराबर दिला पाहिजे व वर मयताचे हातच्या राहिलेल्या जिंदगीचा हिस्सा करणें. या गोष्टीचे साक्षी करितां तुमचे गांवचे पांडेबुवा यास नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत आणण्याची तजवीज करावी. तसें न केल्यास रीती प्रमाणें कोर्ट मार्फत तजवीज करूं. या नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. सदर्हू मुलगा कोणी नोकर ठेऊं नये. व त्यास कर्ज वगैरे देऊं नये दिल्यास कोणी जबाबदार नाहीं. कळावें. ता. ४-११-१० इ०

सही

बजाई मर्द गोरखनाथ मु० सिंदखेड हल्लीं मु० आकोला. तर्फे गणपत कडताजी नाथ आकोला.

नो. नं ण २१

---

## नोटीस

नोटीस बेशमी सीताराम सुयभान मैत वारस पुत्र रामचंद्र सीताराम अज्ञान पा० क० आई मुक्ताबाई मर्द सीताराम ठाकरे, बळीराम सुर्यभान ठाकरे, व गंगाराम रायभान ठाकरे रा. आकोली जहागीर ता. आकोट जिल्हा आकोला यांनाः—

नोटीस देणार यशवदा मर्द मारुती कोल्हे रा० आकोट सुरू सन १३२० फसली कारणें नोटीस देते ऐसाजे माझी आई अहील्याबाई मर्द लखुजी चांभारे कुणबी ही तुमचे जवळ राहत असे, तिनें माझे बापाची स्थावरजंगम इस्टेट वाटणीपत्रकाप्रमाणें वाटून घेतली असून ती सर्व जिंदगीसह तुमचे जवळ राहत होती, अलिकडे ४।५ महिन्यां पूर्वी ती प्लेगनें तुमचे येथें मरण पावली. ती तुमचे जवळ मरण पावल्यानें सर्व स्थावरजंगम जिंदगी तुमचेपाशीं अनामत राहिली. ती रोख रु० ९००, भांडींकुंडीं व सोन्याचांदींचे दागीने अजमासें ८०० रुपयांचे शिवाय, गौलखेड ता० आकोट येथील शेताचा स्वामित्वाचा हक्क, याशिवाय तिचें नांवाचें घेण्याचें कागद तुह्मास अधिकार नसतां तुमचे नांवें बदलेले दस्तऐवज वगैरे सर्व कागदपत्र व वरील जिनगी हे सर्व १५ दिवसांचें आंत मजला देऊन माझी पावती घ्यावी. मैतास मजवांचून दुसरे कोणी वारस नाहीं. व सर्व इस्टेट माझे बापाची आहे. जर मुदतींत सर्व इस्टेट मजला देणार नाहीं तर योग्य कोर्टांत सर्व इस्टेट मिळण्याबद्दल दावा करावा लागेल. त्याचा खर्च तुमचे वर पडेल. करितां नोटीसीनें कळविलें आहे. या नोटीसीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. ही नोटीस दिली ता० ३१-१०-१० ई.

सही

यशवदा मर्द मारुती कोल्हे रा० आकोट, निशाणी हातची बांगडी असे. दस्तुर कडतोबा विठोबा मु॥ आकोट ता. ४-११-१०

नो० नं० ण २२

---

## नोटीस

१ रा. हरीलालसा वल्द सीतलसा पुराड व २ रा. शामलाल ओंकारसा पुराड रा. दोघे मलकापूर जि. बुलडाणा यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा धाकटा भाऊ शेखजीमहमद अशरफ वस्ती बिस्वाचांदूर यानें अजमासें दीड महिना झाला आमच्या सामाइक इस्टेटी पैकीं त्याचा सहावा हिस्सा पोरबुद्धीनें तुह्मास २००० दोन हजार रुपयांस गहाण लिहून दिला. तो व मी त्याचा वडील बंधु, असे आह्मी एकत्र आहोंत. त्याची व आमची वाटणीहि अद्याप झाली नाहीं. त्यास घरांत माझा धाक शाळेंत जाण्याचा व सद्वर्तनानें राहण्याचा असल्यामुळें तो पळून गेला. तो तसाच ८।१५ दिवस बाहेर राहिला. असें पाहून तुह्मी त्याजकडून पैशाअडक्याची लालूच दाखवून त्याचा हिस्सा दोन हजारांचा हजारांचा गहाणाचा कागद करून लिहून घेतला. त्यांत फक्त रोख रु० ३०० दिल्याचें समजतें. तरी तुह्मास अशी देवघेव तो अविभक्त कुटुंबांतील असल्यानें आमच्या सर्वांच्या संमती वांचून करता येत नाहीं. तो व्यवहार मला कबूल नाहीं. ता रद्द असे. व याबद्दल आह्मी व आमची स्थावरजंगम इस्टेट कोणत्याहि प्रकारें जबाबदार नाहीं. या नोटीसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. ता० ९-११-१०.

सही

शेखरहीम वल्द महमदअशरफ द. खु. रा. बिस्वाचांदूर ता० मलकापूर.

नो० नं० ण २३

## नोटीस.

नोटीस बेशमी— पुंनी मर्द महादू जात साहाळी राहणार मौंजे काजळेश्वर ता० आकोले यांस:--

नोटीस देणार सूर्यभान वल्लद मानासिंग पाटील राहणार मौंजे काजळेश्वर तालुके आकोलें याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं मजपासून रुपये ९० व्याजीं घेऊन गेलीस ते रुपये परत देण्याचा करार तूं मजशीं जो केला त्याची मुदत नजीक आली आहे. रुपये देत नाहींस असें असून तूं मजला वर्तमानपत्रांतून तारीख ६-१०-१९१० इ० रोजीं नोटीस केलीस त्यांत मजकूर असा आहे कीं रुपये व्याजासुद्धां देत असतां घेत नाहीं हा मजकूर अगदीं खोटा आहे. दस्तैवज मजला मुळींच तूं लिहून दिलेला नाहींस. रुपये तसेंच व्याजीं घेऊन गेलीस. मी हमेशाचे विश्वासावर रुपये दिले. याकरितां या नोटीशीनें कळविण्यांत येत आहे कीं ही नोटीस पावतांच आमचे रुपये ९० व त्याचें व्याज त्यसें चार पंचासमक्ष मजला द्यावें. आणि पावती घ्यावी. तसें न केल्यास मग मात्र आतां कांहीं सबब न ऐकतां तुझ्या वर कोर्टांत फिर्याद करून हुकूमनामा मिळवीन. कळावें. तारीख ३० माहे आक्टोबर सन १९१० इ.

सही

सूर्यभान मानासिंग पाटील राहणार

काजळेश्वर द० खु०

नो० नं० ण ११

## नोटीस

रा० रा० महादेव बुलाखी व बाळकृष्ण बुलाखी व लक्ष्मण बुलाखी सोनार व अण्णाजी रामचंद्र सोनार सर्वत्र राहणार जळगांव ता० मजकूर जि० बुलढाणें यांसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं आमचे वडील बंधु पुरणलाल यांनीं तुमच्या येथें रुपये ११३० अकराशें तीस हे रामचंद्र बुलाखी सोनार यांच्याजवळ अनामत धरवर ठेवली होती. ती अनामत रक्कम आह्मी तुह्मास दोन चार वेळां परत मागितली असतांही तुह्मी दिली नाहीं. करितां ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचे आंत तुह्मी आमची वरील अनामत रक्कम आमच्या स्वाधीन करून आमची पावती घ्यावी. सदर्हू प्रमाणें न झाल्यास लगायत मित्ती पासून दरमहा दर शेंकडा १ एक रुपया प्रमाणें वरील रकमेस व्याज भरून द्यावें लागेल. व आह्मांस दिवाणी कोर्टांत दावा करून व्याज व मुद्दल भरून घेणें भाग पडेल. कळावें. तारीख २-११-१९१० इ०

सही

दर्शनलाल मातादीन कलाल राहणार

जळगांव द० खु०

नो. नं. ण १२

## नोटिशीचें उत्तर.

सुभद्री मर्द विठोबा आपा वाणी रा० पेठ बाळापूर इजला:-

नारायण आपा खंडापा तर्फे वकील हणमंत रावजी खानझोडे रा० आकोला याजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं, ता० ३१-१०-१९१० चे आकोले वऱ्हाडसमाचार पत्राचे पुरवणींत तुह्मी आमचे पक्षकारास नोटीस दिली ती पावली. तुमचा नवरा मेल्यानंतर तुह्मी आपणास स्वैरगतीनें वागतां यावें ह्मणून आमचें घर सोडून आपले खुषीनें निघून गेलांत. आह्मी तुह्मास काढून दिलें नाहीं. जर आह्मी तुह्मास आमचे घरांतून काढून दिलें असतें तर तुह्मी आजपावेतों दाद फिर्याद करण्यास कधींही चुकला नसता. तुमचे बापाचेकडेस असलेलें कर्ज वसूल करण्याकरितां आह्मी त्याचेवर खामगांवचे दिवाणी कोर्टांत फिर्याद केली सबब तुह्मी ही खोटी नोटीस आह्मास दिली. हें आह्मी पूर्ण समजून आहोंत. तुमची अद्यापि खुषी असल्यास तुह्मी आमचेकडेस यावें. आह्मी तुह्मास पोसण्यास तयार आहोंत. अथवा तुमची खुषी असल्यास तुह्मास निराळें घर राहण्यास देऊन तुमचे एकट्या पुरतें खाण्यास देण्यास तयार आहों, अथवा तुमचे योग्यतेप्रमाणें व आपले वार्णासेरास अनुरूप दरसाल रु० ९० खर्चास देण्यास तयार आहोंत. तुह्मी आपले नोटिशीत लिहितां कीं तुह्मी खाण्यादिण्याकरितां रुपये १००० हजार दुसऱ्याचें कर्ज काढलें ही गोष्ट अगदींच खोटी असून केवळ दडावणीची आहे. तुमचा हेतू केवळ आपले आईबापाचें हित करण्याचा आहे. ही गोष्ट तुमचे हल्लींचे वर्तनावरून स्पष्ट दिसते. आह्मी वर लिहिलेप्रमाणें जो विचार तुह्मास पसंत असेल तो आह्मास नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत कळवावा ह्मणजे त्याप्रमाणें आह्मी तुमची व्यवस्था करून देण्यास तयार व रजी आहोंत. तुह्मी आमचे उत्तरास न जुमानतां कोर्टदरबार केल्यास तुमचे व आमचे इज्जतींत खलेल येईल व त्या भानगडीचा खर्च देण्यास आह्मी पात्र राहणार नाहीं. ही नोटीस दिली सही. तारीख ९-११-१० इसवी.

H. R. Khanzode, Pleader
for Narayen Appa Khandapa
of Balapur.

नो. नं. ण १३

## नोटीस.

रा. रा. केशवभट बिन भगवानभट जोशी राहीत यांस:—

खालीं सही करणार यांजकडून जाहिरनोटीस देण्यांत येतें कीं, आपण आजमास ३ वर्षांपूर्वी नवीन डागिना करण्याचे इरादानें मोबदला रुपये ठेवून सोन्याचा ( बाकीचा ) डाग घेऊन गेले त्यांस आज बरेच दिवस झाले. आपले रुपये त्याच वर्षी देऊन आपण आज पर्यंत दिला नाहीं. पण उलट त्याजवर दुसऱ्याजवळ गाहाण ठेवून व्याज कमावत आले तरी आह्मीं लक्ष पुरविलें नाहीं. दुसरें तुमचे आईनें व तुह्मीही ४।५ वेळां शपथा घालून देण्याचें कबूल केले प्रमाणें आह्मी मंडळीसह आलों असतां आपण सायंकाळीं आमचे स्वाधीनाहि केला. परंतु आह्मी जेऊन निजलों असतां रात्रीं झोपेंत खिशांतून काढून घेतला. दुसरे दिवशीं त्याची भवती न भवती होऊन आखेर जाते वेळेस मोठ्या मुश्कीलीवर सर्वांसमक्ष चूक कबूल करून मी स्वत: मुलाचे शपथेवर घेऊन येण्याचें कबूल केलें तरी अजून न आलेमुळें आपणांस पोष्टांतून साम्र रजिष्टर केलें. परंतु तें आपण परत केलें त्यांतिल सर्व मजकूर येथें देतां आला नाहीं सबब संक्षेपानें हें जाहीर केलें आहे. त्याशिवाय आमचा छपरपलंगही आपण पंचवीस रुपयांस विकत घेऊन ते रुपयेही अजून दिले नाहींत. तरी त्यावरचे व डागिन्यांवर कमावलेले व्याजासह रुपये १९ दिवसांत डागिन्यासह घेऊन न आल्यास विश्वासघातानें गुन्हा करून फसविलेबद्दल फिर्याद केली जाईल. आमचे प्रमाणेंच गोविंद भट्टजीचेही लग्नांत व नंतर ३—४ जिनसा नेल्याबद्दल समजलें आहे तरी आपणा संभावितांस हें योग्य नाहीं. पुढें याबद्दल कांहीं तोसिस लागल्यास आह्मी जबाबदार नाहीं. क. ही विनंती.

सही

रामकृष्ण यशवंत देशपांडे.

नो. नं. ण १४

## नोटीस

नोटीस बेशगी सुपडाला झालरचंदसा शेट गुजराथी राहणार बाळापूर पेठ यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं, वस्ती मौंजे मांडवी बुजरूक तालुकें बाळापूर येथील शेत सर्वे-नंबर २१ एकर २० गुंठे ३७ आकार रुपये ४२ यांचें खातें रामू वल्लद मारोती गावंडे कुणबी याचे नांवें असून तें शेत त्यांनें मजला तारीख १०—१—१० इसवीपासून चार वर्षें भाडेपट्यानें दिलें आहे. तें शेत मी तुह्मास तारीख १९-६-१० इसवीपासून तितकींच वर्षें भाडेपट्यानें देऊन तुमच्या ताब्यात दिलें आहे. तें आज पावेतों तुमच्या ताब्यांत असून तुमची चार पिकें पूर्ण झाल्यावांचून मजकडून तर अडथळा येणार नाहींच. आणि दुसरा कोणीही तुह्मास अडथळा करील तर तुह्मा त्याच्या ताब्यांत शेत देऊं नये. यंदा कदाचित घाल तर त्याचा जबाबदार मी नसून माझे चार पिकांचे रुपये मी तुमच्याजवळून रीतीप्रमाणें तजवीज करून भरून घेईन.

सहा

कन्हैयालाल बापूलाल मास्तर

राहणार बाळापूर पेठ

तालुके मजकूर जिल्हा

आकोलें.

नो. नं. ण १५

## नोटीसीचें उत्तर.

नोटीस पंचमसिंग वल्लद रूपचंद टाकोणकार राहणार शेळद ता० बाळापूर यांस:--

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी तारीख ९।१०।१० च्या आकोला सुदर्शन पत्रांतून दिलेली नोटीस पावली. त्यांत लिहिलेला मजकूर सर्व खोटा आहे. वडिलार्जित जिनगीची वाटणी रूपचंद हे जिवंत असतांना त्यांनींच आपल्या हातानें करून दिली व त्या वेळेपासून आपआपल्या हिश्या प्रमाणें शेती आज पावेतों वहात आलों. तसेंच वडिलार्जित कर्ज कांहीं एक नाहीं. तुह्मीच कर्ज काढून तुह्मी आपले हिश्याची जिनगी गहाण टाकलीत व सोडवून घेतलीत. तीच पुन्हां तुह्मी गहाण टाकली तुमचे हिश्यास आह्मी मुळींच हरकत केली नाहीं. तुह्मी लोकांच्या नादीं लागून वाटेल तशी खोटी नोटीस दिलीत हें तुह्मांस शोभत नाहीं. कळावें. ता० ३०-१०-१० इ०

सही

अजबसिंग रूपचंद टकारी

राहणार कान्हेरी द० खु०

नो नं ण १६

## नोटीस

रा० परशराम वल्लद फकिरा तेली वस्ती पिंपळगांवकाळे ता० जळगांव यांस:—-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौंजे पिंपळगांवकाळे. येथें माझी जागा धाब्याची असून त्यांत हल्लीं मी पुष्कळ दिवसांपासून राहत असून व ती जागा माझे हिश्यास आल्यावरून ताबाही माझाच आहे व सदर्हू जागा वडिलोपार्जितची असून पुष्कळ दिवसांपासून वाटण्या झाल्या आहेत असें असतां माझ्याशीं दुसऱ्यांनीं तंटाबखेडा करावा या उद्देशानें तुह्मी माझे सखे चुलते असतां लोकांनीं माझ्याशीं तंटा करावा हा तुमचा हेतू असल्यामुळें तुह्मी मौंजे मजकूरचा माळी सूर्यभान पाटील याजपासून पांच रुपये इसार घेऊन त्यास मलाही जागा खरेदी करून देण्याचा तुमचा उद्देश दिसत आहे याकरितां तुह्मास नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं तुह्मी जर सदर्हू जागेचें खरेदीखत करून दिलें तर तें रद्द समजलें जाईल व घेणारानींही फसूं नये याजकरितां नोटिशीनें सूचना केली आहे. कळावें. ता० ३०-१०-१९१० इ०

सही

कानु वा॥ रामु तेली पिंपळगांव

निशाणी खुद्द.

दस्तुर गोपाळ येकोबा.

नो. नं. ण १७

## जाहिर नोटीस.

सर्वत्र शेट, सावकार व इतर लोक यांस:—

खालीं सही करणारा कडून नोटीस देण्यांत येतें कीं कसबे विस्वा चांदूर ता० मलकापूर येथील माझी वडिलार्जित स्थावरजंगम मालमत्ता यापुढें मला कोणी विचारल्या शिवाय गहाण, बक्षीस, पट्यानें किंवा खरेदी लिहून घेऊं नये. माझा धाकटा भाऊ शेखजी हा उनाड लोकांच्या नादीं लागला आहे. तो व मी असे एकत्र आहोंत. तो पोरवयाचा असून हूड आहे. तो अविचारानें आमच्या वाडवडिलार्जित स्थावरजंगम इस्टेटीची अफरातफर करीत असतो असें मला दिसून आलें. सबब जाहिर करण्यांत येतें कीं त्याच्याशीं कोणीही माझ्या लेखी परवानगी वांचून वरील इस्टेटी संबंधीं कोणताही व्यवहार करूं नये. केल्यास त्याबद्दल मी किंवा आमची इस्टेट जबाबदार नाहीं. कोणी फसूं नये सबब हें प्रसिद्ध केलें आहे. कळावें. तारीख ९-११-१० इ०

सही

शेख रहीम वा॥ महमद आशरफ

रा० विस्वा चांदूर ता० मलकापूर,

दस्तुर खुद्द.

नो. नं. १८ ण

व स.

ॐ

## सत्यमेव जयते.

सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रिय मराठे ह्यांनी वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकारितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धाती भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, कावृत, शामिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायाश्चि-त्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, नन्हाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्ण कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वस्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्माची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधी ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकाची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशीचळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भिमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र. व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारख आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत. अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरात छापलेल्या गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविलीं असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

### सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या सुगंधाति वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधीत विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेदविधीचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रूपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७९ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

## विलक्षण नयन रुक्कुठार.

**विलक्षण नयन रुक्कुठार** – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार–**खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल** इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जाग्रणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणें कारितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल आमचेकडे शाळोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

## विनंती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या सुधारलेल्या लोखंडी नांगरांचा खप फारच झपाट्यानें वाढल्या-कारणानें व विशेषेंकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमची आऊतें फारच खपल्यामुळें आह्मी आमचा बेळगांव येथील शेतकीचीं आऊतें करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्यभागीं ह्मणजे सातारा जिल्ह्यांत **कुंडलरोड** रेल्वे स्टेशनानजिक **किर्लोस्कर वाडीस** नेला आहे. सबब आपल्यास येवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं आऊतें लागतील तीं खालीं लिहिलेल्या **पत्त्यावर** मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,

**किर्लोस्कर बंधु,**

किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,

नो. नं. ड ६६ जिल्हा सातारा

सु धा सिं धु सु धा सिं धु

## जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशाहोत, तेंव्हां सुद्धा

### सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षां पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. घऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी ( काळरा ) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे हुळाव, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाटली -॥- आणे. सर्व औषधें विकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे

मांगविण्याचा पत्ताः—

धेवराल शर्मा माळक

सुख संचारक कंपनी मथुरा

## जाहिरात

ऑईल एंजिन, पंप, दळण्याचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वेटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहिती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक.

मेसर्स डेक्कन स्टेशन कंपनींतील ऑईल एंजिन एक्सपर्ट (फौंडींग),

नो. नं. ड ८० उमरावती.

गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमः श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्तगुड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत काहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा " नायफळार्कमधु " यंत्र सामानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड वमुवासिक आहे. हा मधु खातं; गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी कामस्थिती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश स[illegible]गतो. मननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. शरीरापिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रंग, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्ताकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येते.

या औषधास पथ्य नाहीं कामाविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १८१४, तीन बाटल्यांस २८१०, दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

सूचनाः—कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरूं होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं आमचें येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घ्यावें.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन मार्जी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें बारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

### मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

### अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी असेल तर शरीरांत नानप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पहिले या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मी वगैरे मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, सठ पाय त्वरांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जनाट परमा, मुष्ठीमैथूननें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनेल. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतीचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनूपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें वडस. साहर, फुल, मुरव्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरीत बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः--कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ १। भार बाटलीस रु० २

४ दंतबलवर्धक पुडः-दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः-औषध लावतांच उतरतें पुड्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः-औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः--आजपर्यंत आमचे औषधांनें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गांठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा गुणाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ट० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डा सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचो निदान चिकीत्सा कळवूं.

### अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक ज्याहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्यांचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावा आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिर्ले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हव कीं ज्यांचा कारखाना आज सतत १५।२० वर्षे अव्याहत सुरू असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधांनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून ह्या सार्वजानिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटपटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधुस व ग्राहकांस हतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातीशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल. नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ताः—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.



ORIENTAL GOVERNMENT

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

### FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This, the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur


हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख २१ माहे नोव्हेंबर १९१० इ० [ अंक ४३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचना:– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचें १ लें जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Philips.
आकोला ९।९।०९ { एजंट
नं ७३

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{2}{3}$ तोळे असतें. साधारण भाव दर्‍हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१.९.१० { एजंट.

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq.
Pleader
No. N. Dh. 81 Amraoti.

## नांगरांचा शर्यत.

मेहेरबान तहशिलदार साहेब, तालुके आकोले हे ता. १३ नवेंबर १९१० रोजीं आकोले येथें टाऊनहालांत मेहेरबान मेजर फ्रीडन डेपुटी कमीशनर साहेब बहादुर याच्या अध्यक्षते खालीं नांगरांच्या शर्यती भरविण्यासंबंधानें सभा भरली, तींत झालेल्या भाषणांचा व ठरावांचा सारांश छापून त्याच्या प्रती आमचेकडे पाठवीत आहे. त्या तालुक्यांत वाटण्याची कृपा करावी.

शर्यतींत जे नांगर सामील होतील त्यांच्या माणसांच्या व बैलांच्या खावटीसंबंधानें कार्यकारी कमेटीस व्यवस्था करितां येणार नाहीं. ज्या गांवाचा नांगर शर्यतीसाठीं येईल त्या गांवाच्या पाटलानेंच खावटीचा बंदोबस्त केला पाहिजे. नांगर पाठवितांना बैलांसाठीं चारा व सरकी आणि माणसांसाठीं जेवणाचा सर्व सरंजाम व भांडीं कुंडीं हीं नांगराबरोबरच पाटलानें पाठवावीं. मात्र नांगराच्या माणसांचा व बैलांच्या मुक्काम आकोल्यास जितके दिवस होईल तितक्या दिवसांचा खावटीचा योग्य खर्च कार्यकारी कमेटीकडून पाटलास अदा करण्यांत येईल.

शर्यतीसाठीं नांगर पाठविणें तो शर्यतीच्या आदले दिवशीं आकोल्यास पोंचेल अशा बेतानें पाठवावा. म्हणजे कोणत्या जमीनींत कोणता नांगर चालवयाचा त्याची जागा शर्यतीच्या आदले दिवशींच ठरवून कायम करितां येईल. शर्यतीच्या दिवशीं घोटाळा होणार नाहीं.

शर्यतीस नांगर पाठवायाचे ते चांगले शृंगारून पाठवावे. शर्यतीचें काम झाल्यावर, मोठ्या थाटामाटानें वाजतगाजत सर्व नांगर गांवांत ( आकोल्यास ) आणून टाउनहालांत किंवा श्रीराम थिएटरांत शर्यत जिंकणारास बक्षीसें दिलीं जातील.

शर्यतींत सामील व्हावयाचें असेल त्यांनीं कृपाकरून आपलीं नांवें त्वकर पाठवावीं म्हणून आपल्याकडून त्यांस लिहून कळविण्यांत यावें.

तारीख १३ च्या सभेस पुष्कळ लोक आले नाहींत. तथापि शर्यतीचे समारंभास येण्यास व शर्यतीचे खर्चासाठीं वर्गणी देण्यास ते चुकणार नाहींत अशी मला उमेद आहे.

शर्यतीचा दिवस जानेवारी महिन्यांतील कोणता तरी ठरेल. तो ठरल्या बरोबर आपणाला कळवीन.

आकोला } द वि० भागवत
ता० १३।११।१० { कार्यकारी कमेटीचे
सेक्रेटरी.

नांगरा नांगरांची शर्यत भरविण्या संबंधानें पूर्वीं निमंत्रणपत्रक काढिलें होतें, त्या प्रमाणें रविवार ता० १३ नोवेंबर १९१० रोजीं आकोलें येथें टाउनहालांत शेतकऱ्यांची व इतर गृहस्थांची सभा भरली. सभेचे अध्यक्षस्थानीं मेहेरबान मेजर फ्रीडन डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांची योजना झाली. सभेस हजर असलेल्या लोकांची यादी आणि सभेंत झालेल्या कामांचा सारांश हीं खालीं दिलीं आहेत. सबडिव्हिजनल ऑफिसर मे० सोराबजी साहेब; आकोल्याचे तहशिलदार रा. रा. नारायणराव गुप्ते; राव बहादूर देवराव विनायक; रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनि; रा. रा. बळवंत नरसिंह मुधोळकर, आनररी मॅजिस्ट्रेट; खान साहेब आमानखान, ऑनररी मॅजिस्ट्रेट; रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनि, आकोलें म्युनसिपालिटीचे व्हाइस चेरमन; राव साहेब केशव गोविंद दामले, गव्हरमेंट प्लीडर आणि आकोले डिस्ट्रिक्ट बोर्डाचे व्हाइस चेरमन; रा. मिर्झा आबासबेग; राव बहादूर दत्तात्रय विष्णु भागवत; रा. रा. अनंत विष्णु खरे; रा. रा. गोपाळ रामराव, शेट सावतराम रामप्रसादचे मुनीम; रा. रा. देवीरामजी नाझर, रा. रा. बापुराव हरसिंग, बाशिटाकळी; रा. रा. शिवराम सखाराम, महान; रा. रा. व्यंकटराव आनंदराव, कापशी; रा. रा. इंदु विठोबा, मोरगांव; रा. रा. पांडु शामजी, राजंद; रा. रा. भिकाजी परशराम, मोड; रा. रा. गोविंद चिमणाजी, पाटखेड; रा. रा. शामराव सदाशिव, माटखेड; रा. रा. मारुती रामजी, भेरद; रा. शिवराम उदेभान लोहगड; रा. रा. इंद्रभान आत्माराम, निंभोरें; रा रा. बाजीराव बळवंतराव, कुरणखेड; रा. रा. व्यंकटराव विठोबा, कुरणखेड; रा. रा. पुंजाजी उतराजी, टिटवें; रा. रा. इंदुरंग बापुजी, राजंदे; रा. रा. जगदेव भुताजी, हातोडी; रा. रा. शामराव रावजी खांझोडे अकोलें; वगैरे मंडळी सभेस हजर होती.

प्रथमतः मे० मेजर फ्रीडन साहेब बहादूर यांस अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल जमलेल्या मंडळी तर्फे विनंती करण्यांत आली. ती मान्य करून अध्यक्षस्थानीं ते विराजमान झाल्यावर रा. रा. अनंत विष्णु खरे, हायकोर्ट वकील; आणि रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनि शाळाखात्याचे माजी न्इस्पेक्टर यांचीं व इतर गृहस्थांचीं भाषणें झालीं त्यांचा सारांश खालीं दिला आहे. ते म्हणाले –

शर्यती आपल्या हिंदुस्थानांत ऋग्वेद काळांत ही होया. घोड्यांच्या शर्यती लवीत; व रथांच्या शर्यती लावीत. रथांच्य शर्यतींत ज्यांना जय मिळे, त्यांना मोठ्य घराण्यांतल्या कन्या वरीत. रथी व महारथी प्रसिद्ध असत. तेव्हां हल्लीं ज्य नांगरांच्या शर्यती आम्ही काढणार आहों त्या पाश्चात्यांच्या शर्यतींचें केवळ अनुकरण करून काढतों आहों असें नाहीं, तर आपल्या पूर्वजांच्या एका आवडत्या प्रचाराचा उद्धार करूं इच्छित आहों.

हा प्रचार आपल्या देशांत अलीकडे बराच लोपला. पण पाश्चात्य देशांत त्याचा उत्कर्षच होत आहे. हा प्रचार तिकडे केवळ पोका करितां नव्हे, तर शेती आणि पाळीव जनावरें, पक्षी इत्यादि यांत सुधारणा व्हावी या उद्देशानें लोक पाळीत आहेत. तिकडे किती तरी प्रकारच्या शर्यती होतात! घोड्यांच्या, गाड्यांच्या, बायसिकलच्या, मोटारच्या, एरोप्लेनच्या [ विमानांच्या ] नावांच्या नांगरांच्या अशा अनेक जातींच्या शर्यती होतात. तसेंच विद्यार्थीगणांतच नव्हे तर मोठमोठ्या पुरुषांत फुटबॉल, क्रिकेट, टेनिस, गोल्फ, पोलो या खेळांत व बोटी व नावा हाकणें या व इतर उद्योगांत त्यांच्या शर्यती दरवर्षास होतात.

जेथें केवळ शर्यतीचें काम भागत नाहीं तेथें प्रदर्शनें भरवितात. यांत सुंदर फुलें, रसिक व मोठीं फळें, शाकभाज्या, उत्तम बियाणीं, उत्तम धान्यें, वनस्पति, जनावरें, पक्षी वगैरे यांचा एकत्र संग्रह करून त्या त्या वर्गांतील पहिल्या व दुसऱ्या प्रतीच्या नमुन्यांस मोठमोठीं बक्षिसें देतात; व असें वर्षानुवर्षे चालत राहिल्यानें शेतींत, बागाइतींत व इतर धंद्यांत पुष्कळ सुधारणा झाली आहे शेतीचे नांगर, आऊतें, खतें यांचीं हीं प्रदर्शनें अशाच हेतूनें केलीं जातात. या प्रदर्शनांत नांगर वगैरे प्रत्यक्ष चालवून दाखवून शेतकरी बक्षिसें मिळवितात.

दोनशें वर्षांपूर्वीं विलायतेंत घोडे चांगले नसत. ते स्पेन मधून आणावे लागत. परंतु विलायतेमध्यें घोड्यांच्या शर्यती लावूं लागल्या पासून उत्तम घोड्यांची पैदास होऊं लागली आहे. असाच प्रकार युरोपांतील इतर देशांत व अमेरिकेंत गाई, बैल, डुकरें, कोंबडीं, खबुतरें इत्यादिकांच्या शर्यती लावून त्यांची उत्तम उत्तम वीण तयार होत आहे.

दोन सालांपूर्वीं नागपुरास प्रदर्शन झालें. त्यांत विलायती नांगर, हिंदुस्थानांतले प्रांताप्रांतांचे नांगर वगैरे ठेविले होते. परंतु काम करण्यास कोणता नांगर हलका कोणत्या जमीनीस कोणता नांगर उत्तम हें प्रत्यक्ष पाहिल्या वांचून कसें कळणार? कांहीं लोक विलायती नांगराची प्रशंसा करितात. कांहीं देशीच बरा म्हणतात. या गोष्टीचा निर्णय शर्यत लावल्यावांचून सहज रीतीनें लावणें कठीण आहे.

एकाच शेतांत एकाच वेळीं विलायती व देशी नांगरांच्या शर्यती लाविल्या आणि कोणता नांगर किंवा कोणती नांगरण्याची रीत उत्तम काम देते असें जर प्रत्यक्ष शेतकऱ्यांस शेतकऱ्यांच्याच हातानें दाखविलें तर ते आपोआप चांगल्याची निवड करितील. आपला नांगर वाईट असेल तर तो टाकून दुसरा तऱ्हेचा नांगर घेतील; आपली नांगरण्याची तऱ्हा वाईट असली तर ती सोडून देऊन चांगली उचलतील असा भरंवसा आहे.

शेतकऱ्यांना काय-इतरांना काय-आपल्या देशांतील जुनें सोडावेंसें वाटत नाहीं. तें चांगलेंच आहे असा समज करून घेऊन त्यास तें चिकटून बसतात. म्हणून इतर प्रांतांतील किंवा इतर देशांतील चांगला प्रकार त्यास प्रत्यक्ष दाखविला पाहिजे आणि तो फायदेशीर आहे असें त्यांच्या अनुभवास आणून दिले पाहिजे. तरच ते नवीन चांगला प्रकार घेण्यास तयार होतील; त्यांच्या मध्यें ईर्षा उत्पन्न

होईल, व आपल्या कामांत सुधारणा करून पाश्चात्य देशांतील लोकांशीं कालेकरून बरोबरी करूं शकतील. अशी मोठी आशा धरून, शेतीच्या सुधारणेचें जें एक मोठें अंग—ह्मणजे नांगर—त्यांच्या शर्यती प्रथमारंभीं लावून पहाव्या—आरंभ आपल्या तालुक्यांतच किंवा आपल्या तालुक्यांत व बाळापूर तालुक्यांतच करावा-- मग इतर तालुक्यांत—मग जिल्ह्यांत व प्रांतांत शर्यती लावाव्या असा हेतु आहे.

हें काम लोकांच्या हिमतीवर आरंभिलें आहे. लोकांनींच हें काम चालविलें पाहिजे.

शेतीच्या एका अंगांत यश मिळालें, ह्मणजे दुसरीं अंगें हळू हळू घेतां येतील. मोठी इमारत बांधावयाची आहे. तेव्हां ती बांधण्याला काळ, मेहनत, पैसा पुष्कळ लागणार आहे. आज त्या इमारतीच्या पायाचा दगड बसविणें इतक्या सारखेंच आहे. तो दगड आपले अध्यक्ष मेजर ग्लेडन मोठ्या खुषीनें बसवितील ते या शर्यतीचे "पेट्रन" (पुरस्कर्ते) झाले आहेत व त्यांनीं या कामा करितां देणगी दिली असून, लागेल ती मदत देण्यास ते तयार आहेत ही आनंदाची व उत्तेजनकारक गोष्ट आहे. मे० लो साहेब व शेट सावतराम रामप्रसाद यांनीं शर्यतीचे खर्चासाठीं मोठ्या देणग्या दिल्या आहेत.

नांगरा नांगरांच्या शर्यती लावावयाच्या त्यांत तालुक्यांतील चांगल्या चांगल्या शेतकऱ्यांनीं पुढें येऊन आपली कर्तबगारी आणि सरंजाम हीं लोकांच्या निदर्शनास आणून दिलीं पाहिजेत. कोणा नांगराचें काम कसें झालें, त्याला बक्षीस द्यावें किंवा नाहीं हें ठरवितेवेळीं त्या नांगराचें वजन, बैलांच्या जोड्यांची कुवत, व धुरेकरी आणि जोड्यावाल्यांची हातोटी व एकंदर थाट हीं लक्षांत घेतलीं जातील. केवळ सर्वांत जास्त जमीन नांगरली एवढ्यावरच बक्षीस दिलें जाणार नाहीं. बक्षिसें पुष्कळ ठेविलीं आहेत. तेव्हां पहिला नंबर येईल त्यासच केवळ बक्षीस मिळेल असें नाहीं. दहा पर्यंत ज्यांचा नंबर येईल त्यास हीं बक्षीस मिळेल. ह्मणून आपली बैलाची जोडी हालकी आहे, आपलें काम थोडें होईल. आपण शर्यतींत कशाला जावें" अशी भीति किंवा शंका कोणी धरूं नये. मोठी व जोरदार जोडी पुष्कळ काम देते; हालकी कमी देते हें लक्षांत ठेवून, काम किती झालें एवढाच हिशेब न पाहतां; काम करण्याची तऱ्हा व चातुर्य आणि झालेलें काम हीं सर्व पाहून पंच बक्षिसें ठरवितील. ज्याचा नांगर चांगला आहे, किंवा ज्याची काम करण्याची हातोटी व चातुर्य अधिक आहेत, किंवा बैलाचा वगैरे ज्याचा सरंजाम उत्तम आहे अशा सर्वांनीं शर्यतींत सामील व्हावें. नांगराचा खरें चाईटपणा, काम करण्याची शैली, हातोटी व चातुर्य कामाचें कमी अधिकपण, आणि सरंजामाचा उत्तमपणा या व अशा प्रत्येक गोष्टीस मार्क [ गुण ] ठेविले जातील हें सर्वांनीं ध्यानात ठेवावें.

या प्रमाणें भाषणें झाल्यावर दहा बक्षिसांबद्दल १० कडीं द्यावयाचीं असें ठरून त्या प्रत्येकांची किंमत किती असावी याबद्दल ठराव झाला. प्रत्येक कड्यावर बक्षिसाचा नंबर आणि शर्यत जिंकणाराचें नांव हीं खोदलीं जातील. शर्यत जिंकली नाहीं तरी शर्यतींत सामील होणाऱ्या सर्व लोकांस पागोटीं दिलीं जातील असाही ठराव झाला.

शर्यती संबंधीं बंदोबस्त ठेवण्याकरितां खालील गृहस्थांची कमेटी नेमण्यांत आली.

१ रा. रा. नारायणराव गुप्ते,
तहशिल्दार आकोलें.
२ रावसाहेब केशव गोविंद दामले,
व्हाइस चेरमन डिस्ट्रिक्ट बोर्ड आकोलें.
३ रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनि,
व्हाइस चेरमन आकोलें म्युनिसीपालिटी.
४ रा. रा. भिकाजी परशराम, भोड.
५ ,, ,, बापुराव हरसिंग, बार्शीटाकळी.
६ ,, ,, पांडुरंग बापुजी, राजंदे.
७ ,, ,, इंद्रभान आत्माराम, निंभोरें.
८ ,, ,, भय्यालाल डुबे, सुपरिंटेन्डंट
गव्हरमेंट फार्म आकोलें.
९ रावबहादुर दत्तात्रय विष्णु भागवत,
सेक्रेटरी.

टीपः—- [ रावबहादुर दत्तात्रय विष्णु भागवत हे कमेटीचे सेक्रेटरीचें काम करतील.] शर्यतीच्या संबंधानें पत्रव्यवहार करावयाचा तो रा. ब. द. वि. भागवत यांच्याशीं करावा.

ज्या गृहस्थांस शर्यतींत आपला नांगर पाठवयाचा असेल त्यांनीं रावबहादुर दत्तात्रय विष्णु भागवत यांस किंवा रा. रा. नारायणराव गुप्ते, तहशिलदार आकोलें, यांस आपला हेतू पत्रद्वारें कळवावा.

शर्यत करणारांचें काम पाहून कोणास कोणतीं बक्षिसें द्यावयाचीं याचा निर्णय करण्यासाठीं खालील गृहस्थांस पंच नेमिले आहेत.

(१) मेहेरबान सी. ई. लो, आय. सी. एस्; सी. आय. इ. डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर सेंट्रल प्रॉव्हिन्सेस व वऱ्हाड.
(२) मेहेरबान क्लोस्टन साहेब, असिस्टंट डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर सेंट्रल प्रॉव्हिन्सेस व वऱ्हाड.
(३) मेहेरबान मेजर ग्लेडन, डेप्युटि कमिशनर साहेब आकोलें.
(४) रा. रा. भय्यालाल डुबे, सुपरिंटेंडंट गव्हरमेंट फार्म आकोलें.
(५) मेहेरबान फक्रुद्दीन साहेब, जहागिरदार, महान.
(६) रा. रा. बापूराव हरसिंग, बार्शीटाकळी.
(७) ,, ,, मारुती रामजी, भोरद.
(८) ,, ,, भिकाजी परशराम, भोड.
(९) मेहेरबान स्टॅनले अगर मेहेरबान रांजर्स यांच्या पैकीं एकजण ( अमेरिकन ख्रिश्चन आणि मिशनरी अलायन्स मिशन).

मेहेरबान लो साहेब, डायरेक्टर ऑफ आग्रिकल्चर आणि मेहेरबान मेजर ग्लेडन, डेपुटी कमिशनर साहेब बहादुर यांनीं शर्यती साठीं देणग्या दिल्या इतकेंच नव्हीं तर हरतऱ्हेनें मदत करण्याचा पत्कर घेऊन उत्तेजन दिलें याबद्दल कृतज्ञतापूर्वक सभेकडून त्यांचे आभार मानण्यांत आले.

जानेवारी १९११ मध्यें एका दिवशीं आकोल्याच्या आसपास सरकारी फार्ममध्यें किंवा इतर सोईकर शेतांत शर्यत लावण्याचें सभेनें ठरविलें.

टीप.— कोणत्या शेतांत व कोणत्या दिवशीं शर्यती लावावयाच्या या बद्दल नक्की विचार मागाहून ठरविला जाईल.

या प्रमाणें सभेचें काम झालें.

द. वि. भागवत.
कार्यकारी कमेटीचे सेक्रेटरी.

---

## इतस्ततः संचार.

[ या सदरा खालीं निरनिराळ्या विषयांवर त्रोटक विचारांचे लहान लहान उतारे या पुढें येत जातील. ज्यांना कामाचे गर्दीमुळें लांबलचक लेख वाचण्यास वेळ नसेल त्यांना हे छोटेखानी वेंचे बरेच उपयुक्त वाटतील:—संपादक. )

मुंबईचे गव्हर्नर सरजॉर्ज क्लार्क यांनीं पुण्याच्या पोलिसांना उपदेश करतांना सांगितलें कीं 'लोकांचें रक्षण करणें हें पोलिसांचें कर्तव्य आहे, आणि लोकांचा पोलिसांवर विश्वासही पाहिजे आहे, खरें आहे; पण सध्यां पोलिसांविषयीं जो अविश्वास अथवा भीति लोकांच्या मनांत भरली आहे ती आली कोठून याची मीमांसा कोण करील ?

पूर्व बंगाल आणि आसाम या प्रांतांतील मुसलमानांच्या शिक्षणासाठीं लोकांवर नवा कर बसवावा अशी डाक्का येथें भरलेल्या मुसलमान कान्फरन्सनें सरकारास सूचना केली आहे. यापेक्षां एक सार्वजनिक फंड केला असता तर ?

सध्याचे बादशहा पांचवे जॉर्ज यांचा राज्यारोहणोत्सव दरबार ता० १ जानेवारी १९१२ रोजीं व्हावयाचा तो मागच्या दोन कारकिर्दींतल्या सारखा दिल्लीस न होतां कलकत्यास व्हावा, ह्मणजे अराजक चळवळी करणाऱ्या नेभळ्या बंगाली लोकांना इंग्रजसरकारचें बळ केवढें आहे याचा कांहीं अंदाज होईल असें एका इंग्रजी पत्रकर्त्यानें ह्मटलें आहे. मूठभर अराजकांना चिरडून टाकण्याला येवढा खटाटोप कशाला ? ज्याला डोळे आहेत त्याला इंग्रजांचें बळ दिसतेंच आहे.

आजपर्यंत नव्या तऱ्हेचें विमानोड्डाण युरोपांत चाललें असे. आतां लवकरच मुंबईस होण्याचें ठरलें आहे.

धर्मस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य हे सगळे या सुधारलेल्या युगांतले शब्द आहेत. तसा नेपथ्यस्वातंत्र्य हा रंगभूमीवरील पारिभाषिक शब्द आहे. बाकीचीं स्वातंत्र्यें मर्यादित आहेत. ह्मणजे स्वातंत्र्य खरें, पण तें उच्छृंखलतेचें समानार्थक नव्हे. नेपथ्यस्वातंत्र्याचें तसें नाहीं. तें अगदीं अमर्यादित आहे. परवा पुण्यास नाट्यकलाप्रवर्तक मंडळीनें नवा लीलावती नाटकाचा प्रयोग केला. नाटकाचे कथानक रजपूतस्थानांतलें, भाषा मराठी, पोषाख बायकांचे गुजराथी, पुरुषांचे काठेवाडी; त्यांतल्यात्यांत एकाचा इंग्रजींतल्या हॅम्लेटा सारखा, आणखी एकाचा कानडी किंवा बर्मन तें ओळखतां येत नाहीं. खरें कास्मॉपॉलिटन नाटक तें हें !

'मुमुक्षु' पत्रांत 'खडे तात्त्विक बोल' लिहिणारे ह्मणतात कीं विष्णुसहस्रनामाचा अर्थ न करतां खुशाल पाठ करीत चला. कारण तुह्मांला त्याचा अर्थ न कळला तरी ईश्वराला कळतो. मुमुक्षुपत्राचे अंक आफ्रिकेंत हाटेंटाट लोकांच्या हातीं पडतील अशी तजवीज कोणी करील काय ? त्यांना जरी त्यांतील लेखांचा अर्थ कळला नहीं, किंवा मराठी जाणणाऱ्या इतरांनाही कळला नाहीं, तरी लेखकाला कळला आहेच. तेव्हां हाटेंटाट मोक्षाला जाणारच ! खासें तर्कट !

कलकत्यास राखीबंधनाच्या दिवशीं पोलिसांचा कडक बंदोबस्त होता; पहाटेपासून युरोपियन पोलिस अधिकारी घोड्यावरून फिरत होते. राखीबंधनाचा दिवस ह्मणजे स्नेहवृद्धीचा दिवस. त्या दिवशीं नाहीं तर अन्य कोणत्या दिवशीं शांततेचा भंग व्हावयाचा ? लोकांच्या किंवा पोलिसांच्या कोणाच्या तरी उलट्या मात्रल्या असल्या पाहिजेत ! एरव्हीं दृष्टींत इतका फरक पडणार नाहीं.

बादशहा पांचवे जॉर्ज यांच्या राज्यारोहणाच्या समारंभासाठीं विलायतेस जाऊं इच्छिणाऱ्या हिंदुसाठीं सोवळ्याच्या आगबोटी मुंबईहून सोडाण्याची तजवीज तेजपाळ शेटजीच्या खटपटीनें करण्यांत आली आहे. बोटीवर हिंदु आचारी ठेवण्यांत येतील. कॅप्टन, खलाशी, वगैरे हिंदुच असणार आहेत कीं काय याचा खुलासा जाहिरातींत नहीं, व पुढेंही देणार नाहीं. जिज्ञासूंनी पत्र पाठविण्यांत व्यर्थ कालक्षेप करूं नये असें एकजण लिहितो.

कलकत्यास 'देवालय' नांवाची एक विचित्र संस्था आहे. या संस्थे मार्फत व्याख्यानें होतात. त्यांत ख्रिस्ती मिशनरी, ब्राम्हो, सनातनधर्मी, आर्यसमाजिस्ट, सगळ्या मतांचे लोक व्याख्यानें देतात. त्याच्या जवळ पोलिसचें ठाणें आहे कीं नाहीं तें कळलें नाहीं.

'इतिहाससंग्रहा' च्या जून महिन्याच्या अंकांत पुढील गमतीची हकीकत आहे. १८ व्या शतकांत मुंबईत रामाजी कामत नांवाचे एक सारस्वत ब्राह्मण होऊन गेले. हे मोठे धर्मनिष्ठ व उदार होते. यांनींच मुंबईचें वालुकेश्वराचें मंदिर बांधिलें. याचें इंग्रज कंपनीचे दरबारीं इतकें वजन त्या काळीं होतें कीं कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं एके काळीं त्याला एतद्देशीय सैन्याचें आधिपत्यही दिलें होतें. पण पुढें दिवस पालटले. कान्होजी आंग्र्याची गडबड सुरू झाली, तेव्हां मुंबईचा गव्हर्नर बून याचे कान कोणी भरले व रामाजी कामत हा राजद्रोही आहे, तो आंग्रे यांना मिळून आहे असें खोट्या पुराव्यानें सिद्ध करून दाखविलें. त्यावरून एका कमिटीपुढें राजद्रोहाच्या आरोपावर त्याची चौकशी झाली. आरोप शाबीत ठरला; आरोपीला जन्मठेपेची शिक्षा झाली, व त्याची मोठी इस्टेट जप्त होऊन जमिनी वगैरे लिलावानें विकण्यांत आल्या. रामा कामत शेवटीं ८ वर्षांनीं तुरुंगातच मेला. या खटल्यांत झालेला निकाल न्यायाचा नव्हता असें पुढें दिसून आलें. पुराव्यांत आलेलीं पत्रें बनावट होतीं हें जगजाहिर झालें. या गोष्टीवरून त्या काळच्या न्यायाचें स्वरूप दिसतें. हा रामाजी कामत नागपूरच्या चिटणीस घराण्याचा मूळ पुरुष असें 'इंदुप्रकाश' नें ह्मटलें आहे तें खरें नाहीं. नागपूरचे चिटणीस चांद्रसेनीय कायस्थ प्रभु आहेत, सारस्वत ब्राह्मण नाहींत अर्थात् रामाजी कामत त्यांचा मूळ पुरुष असणें शक्य नाहीं.

---

महिन्या दीड महिन्यापूर्वी कलकत्यांत अशी भुमका उठली कीं विड्याच्या पानावर एक प्रकारची कीड उत्पन्न झाली, व जो कोणी विडा खातो तो मरतो. पान खाऊन मेलेल्या लोकांची संख्या वाढतच आहे, अशी जिकडे तिकडे अफवा पसरल्यानें लोकांना दहशत पडली, व त्यांचीं मनें अस्वस्थ झालीं. तेव्हां बंगाल सरकारनें या अफवेंत किती खरेपणा आहे, याचा शोध लावण्याकरितां डाक्टरांचें एक कमिशन बसविलें त्या कमिशननें विड्यांच्या पानांची बारीक तपासणी केली, पान खाऊन मेलेल्या म्हटलेल्या इसमांच्या मृत्यूचीं कारणें शोधून काढिलीं, आणि असें आपलें मत कळविलें

होतीं. तेव्हां ही हूल–अफवा–भुमका कोणी मुद्दाम लोकांत अस्वस्थता उत्पन्न करण्याकरितां उठविली असावी, किंवा एकादी वेडगळ समजूत होऊन तो तसें बोलला, व लोक त्याप्रमाणेंच बोलूं लागले, अशांतला हा प्रकार असावा, असें दिसतें. बंगाल सरकारनें कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध केल्यानंतर लोकांचीं मनें स्वस्थ झालीं. ही अफवा बंगाल्यांतून इतर प्रांतांत तोंडातोंडीं पसरत आहे, व वऱ्हाडांतल्या कांहीं सरकारी कामकारांच्या कानांवर आलें आहे, तेव्हां इजवर लोकांनीं अगदीं विश्वास ठेवूं नये, ही अगदीं खोटी आहे, अशी त्या कामगारांची लोकांस इशारत आहे; व आह्मी ही खुषीनें लोकांस या कामीं जागें करितों.

## श्रीमती ॲनी बेझंटबाई यांचे व्याख्यानाचे आधारें.

[ लेखक चिंतामण हरी मराठे सिताबर्डी नागपूर. ]

## हिंदुस्थानची जागृति.

मागील अंकावरून

राष्ट्रांत एक प्रकारची चळवळ सुरू झाली आहे परंतु त्यास चांगलें वळण न मिळाल्यास तिचा परिणाम सुखदायक होणार नाहीं. अगोदर मुलांचे शिक्षणाची सोय लावा, नंतर मुलाला हल्लीं जात असलेल्या शाळेंतून काढा. व नंतर तुह्मांस मिशनरी शाळांची जरूर राहणार नाहीं.

हल्लीं मुलांस विशेषेंकरून निरनराळे कलासंबंधीं व्यापारसंबंधीं व शेतकीसंबंधीं शिक्षण दिलें पाहिजे याची अत्यंत अवश्यकता आहे. हिंदुस्थानांत लोकांचा मुख्य धंदा शेतकी हा आहे. परंतु शेतकी सुधारणेकडे लोकांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं !

हिंदुस्थानांतील कला नाहींशा होत आहेत याचें कारण काय? हिंदुस्थानांतून कच्चा माल बाहेर देशांत जाऊन तेथें जिन्नस तयार होऊन येथें आल्यानंतर आह्मी त्याचा उपयोग करावा हें आश्चर्य नव्हे काय! कोष्टी वगैरे लोकांस आह्मी उत्तेजन दिलें पाहिजे. विलायती कपड्यापेक्षां येथें हातमागावर विणलेला कपडा जरी दिसण्यांत तितका सुबक व किंमतीचे मानानें स्वस्त नसतो तथापि तो टिकाऊ असतो हें कोणीही कबूल करील. बंगालची विभागणी हें कांहीं स्वदेशी माल वापरण्याचे कारण नाहीं. ही एक क्षणीक मनाची उसळ आहे. बंगालमध्यें एक गव्हरनर असला अगर दोन असले काय त्याचे इतर प्रांतांतील लोकास काय कर्तव्य आहे. विशेष कारणानें उत्पन्न झालेला राष्ट्राभिमान जितका लवकर उत्पन्न होतो तितकाच लवकर विलयास जातो. बंगालचे विभागणीनें स्वदेशीस एक प्रकारानें उत्तेजन मिळालें यांत कांहीं संशय नाहीं. मात्र प्रत्येकास मतस्वातंत्र्य असणें चांगलें. स्वदेशाचे कामीं कोणी कोणावर सक्ती करूं नये. स्वदेशीची योग्यता अगदीं अडाण्यास देखील अगदीं सहज समजावितां येण्यासारखी आहे. प्रत्येकानें आपआपल्या शहरांत अगदीं निमूटपणें स्वदेशीचें महत्व लोकांस समजाऊन देत जावें.

लोकांमध्यें दिसून येत असलेल्या उत्साहास चांगलें वळण द्या. युक्तीनें व नीतीनें आहे त्यामुळें तसें होणें साहजिक आहे. सरकार ह्मणजे कांहीं पूर्ण आहे असें नाहीं. व्यक्ती प्रमाणें त्यांचे मध्यें ही दोष असणारच. प्रजेचें जें कल्याण तेंच सरकारचें कल्याण असें जोंपावेतों आहे तोंपावेतों सरकारचा रोष कांहीं काळ लोटला ह्मणजे कमी झालाच पाहिजे. सरकारचा कारभार लोकांकडून वसूल होणाऱ्या करावर अवलंबून आहे व लोकस्थिति चांगली असेल तरच लोक तरी कर देतील. स्वदेशांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूस उत्तेजन देणें हें लोकस्थिति सुधारण्याचा मार्ग आहे अशा दृष्टीनें सरकार आजना उद्यां पूर्ववत् स्वदेशी चळवळीस उत्तेजन देणारच आहे.

हल्लीं कोठें गिरणीचे दिवे अथवा टॅम्स वगैरे सुरू करावयाचे झाल्यास तुह्मास परवयाच्या तोंडाकडे पहावें लागेत. तुमचे तुह्मी तयार व्हा. पाहिजे तो धंदा करण्यास हरकत नाहीं. धंदा चांगला अथवा वाईट हें धंदा करणाऱ्यावर अवलंबून आहे. ज्या धंद्यापासून राष्ट्रांतील संपत्ति वाढते राष्ट्रांतील लोकांस उत्तेजन मिळतें तोच धंदा श्रेष्ट होय.

लोकांमध्यें दिसून येणारा उत्साह हा दैवी प्रेरणेचा समजला पाहिजे व तदनुरोधानें शांत चित्तानें व दृढ निश्चयानें परिस्थिति लक्षांत घेऊन अंगीकृत कामें केलीं पाहिजेत. पूर्वजांना जेणेंकरून कीर्ति मिळविली तशी कृती तुह्मीही आपल्या पराक्रमानें मिळवा परंतु पूर्व वैभव प्राप्त करून घेण्याकरितां ते ज्या मार्गानें गेले असतील तो मार्ग तुह्मांस अनुकूल असेल असें मात्र नाहीं. त्यांचे ठिकाणीं असणारा अभिमान व उल्हास तुमचे ठिकाणीं असूं द्या परंतु परिस्थित्यनुरूप वागणूक ठेवा.

नवीन मार्गाचें अवलंबन करण्यास तुह्मास भीति काय ह्मणून वाटावी. प्रत्येक मार्गाचा प्रेरक अथवा प्रत्येक दृश्य वस्तूंचा पोषक आत्मा अथवा चित्शक्ती आहे. तर मग त्या ज्ञानकलेचें अवलंबन न करितां उपाधीचे मार्गे काय सबब दवडता. उपाधीची पर्वा न करिता ज्ञानाची कास धरण्यास तुह्मास काय भीति वाटत हेंच आश्चर्य आहे कीं लोक कोणत्या ही गोष्टीचा मूळ उद्देश लक्षांत न घेतां अगदीं शब्दशः तशीच गोष्ट करण्याचा प्रयत्न करितात ! जहाजाचे बुडाशीं वाढलेलें शेवाळें जहाजास धक्का न लावतां काढून टाकल्यास काय हरकत आहे ?

मुख्य गोष्ट कोणची व आगंतुक गोष्ट कोणची हें साधारणतः ओळखण्याचा एक मार्ग आहे. जी गोष्ट सर्वत्र मान्य आहे व जी शास्त्रानें आज्ञापित आहे तिचा स्वीकार केला पाहिजे परंतु ज्या गोष्टी विशिष्ट परिस्थितीनें उत्पन्न झाल्या आहेत, नवीन आहेत, त्यांस पूज्य मानलेल्या अशा शास्त्रग्रंथाचा आधार नाहीं अशा गोष्टी विशिष्ट काळीं किती जरी उपयुक्त असल्या तरी ती परिस्थिति बदलतांच त्यांचा त्याग करण्यास कांहीं हरकत नाहीं. कोणत्याही आचाराचे रहस्यावर नजर द्यावी. जगांतील प्रत्येक गोष्ट विशिष्ट अशा दैवी शक्तीनें प्रेरीत असते. त्या दैवी शक्तीवर श्रद्धा ठेवा. जेव्हां तुह्मास पूर्वी थोर वैभव प्राप्त झालें होतें तेव्हां तें केवळ मानुष प्रयत्नाचें फळ होतें काय? खचीत नाहीं. सर्व गोष्टी ईशसत्तेनें शक्तीपेक्षां निराळी आहे. त्या शक्तीचा किंचित अंश मनुष्याचे ठिकाणीं दृग्गोचर होतो. ईशसत्तेचा प्रभाव समजून घ्या व तदनुरोधानें वर्तन ठेवा. परिस्थिति तयार करण्या करितां मनुष्य ईशसत्तेला अनुसरून प्रयत्न करूं शकतो. जर त्याचे इच्छेनुरूप परिस्थिति घडली नाहीं तर त्यांत त्यास खेद मानण्याचें कारण नाहीं. कारण तसें झालें असता ईशसत्ताच तशी होती असें समजावें. ईशसत्तेचा प्रभाव बाह्योपाधिद्वारां बाहेर पडे पावेतों हजारों वेळां जरी उपाधीमध्यें कमी जास्त झालें तरी तें सर्व बऱ्याकरितांच आहे असें समजावें. याकरितां नित्य घडणाऱ्या गोष्टींचे बाह्यांगाकडे लक्ष न देता ईश इच्छा काय असावी याचा विचार करा. अखेरीस आपलें कल्याण जात आहे असेंच घडून येईल. तुह्मी आपली शांती व विश्वास सोडू नका. निराश होऊं नका. अंतःकरणांत पूर्ण धैर्य धरा.

तुह्मी ह्मणाल मनुष्य हा मर्त्य आहे, तर या सर्व प्रयत्नांचा उपयोग काय होणार. खरेंच जन्मास, आलेला प्राणी केव्हांना केव्हां तरी मरण पावलाच पाहिजे. परंतु हा मृत्यू देहास आहे. आत्मा अविनाशी व अमर आहे. स्थूल देहाचे हातून घडलेल्या चुका देहाबरोबर नाहिशा होतात परंतु आत्मसंबंधीं गोष्टी आत्म्याबरोबर असतात. त्या नाहींशा होत नाहींत.

---

# वऱ्हाडसमाचार.

कार्तिक वद्य ९ शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

---

## स्मारकस्तंभ.

पर० श्रीमती व्हिक्टोरिया राणीसाहेबांच्या कारकीर्दींत १८९८ सालीं वाचण्यांत आलेला जाहिरनामा ह्याला हिंदुस्थानचा म्याग्नाचार्टा अशी संज्ञा देतात, आणि ती संज्ञा त्याला अगदीं योग्य आहे; किंबहुना म्याग्नाचार्टापेक्षां ही या जाहिरनाम्याची योग्यता अधिक आहे. म्याग्नाचार्टाची सनद जॉन राजाच्या कारकीर्दींत इंग्लिश सरदारांनीं जबरदस्तीनें राजापासून काढली; राजानें ती आपल्या खुषीनें दिली नव्हती. आमच्या जाहिरनाम्याचा प्रकार तसा नाहीं. तो महाराणीसाहेबांनीं खऱ्या प्रेमभावानें आपण होऊन प्रजेस अर्पण केला होता; व त्यांतलीं वचनें पाळण्याविषयीं पर० सातवे एडवर्ड बादशहा यांची जशी उत्कट इच्छा होती, तशीच त्यांचे चिरंजीव प्रस्तुतचे बादशहा पांचवे जार्ज यांची ही आहे. ज्या जाहिरनाम्याची अशी ही सर्वांगसुंदर पूर्वपीठिका आहे, त्याचें चिरकालीन स्मारकस्तंभाच्या रूपानें करावें व त्याच्या भोंवतीं एक उद्यान करून सदर जाहिरनाम्यांतलीं वचनें खरीं करून दाखविण्याचें श्रेय ज्या महात्म्यानें घेतलें त्या मिंटो साहेबांचें नांव त्याला द्यावें ही कल्पना सर्वोत्कृष्ट होती व ती सर्वांना पसंत पडून तिला व्यावहारिक स्वरूप प्राप्त झालें हें पाहून कोणालाही आनंद वाटेल. या जाहिरनाम्याचें महत्व आह्मा प्रजेस जितकें भाषणावरून व्यक्त होत आहे. हा जाहिरनामा ह्मणजे एक अशक्य कोटींतली निरर्थक सनद आहे असें वाचाळ आणि बेजबाबदार अधिकारी किती ही बडबडले तरी लॉर्ड मिंटो सारखे वरिष्ठ व जबाबदारी ओळखून वागणारे अधिकारी त्याच्याकडे नेहमीं निराळ्या दृष्टीनेंच पाहत असतात, हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश राजनीतीचें तें भाण्डार समजतात ही गोष्ट खोटी नाहीं. आणि अशी जोंपर्यंत स्थिति आहे तोंपर्यंत हिंदुस्थानांतल्या ब्रिटिश राज्याच्या सुरक्षततेविषयीं काळजी करावयास नको. राणी सरकारच्या जाहिरनाम्यांतलीं वचनें जितकीं जास्त पाळण्यांत येतील तितका रयतेचा सरकारवर ज्यास्त भरंवसा बसेल व तितकें प्रेमबंधन अधिक दृढ होईल. उभारल्या जाणाऱ्या स्तंभापासून हा एक मोठा उपयोग भावी पिढ्यांना होणार आहे कीं या स्तंभामुळें जाहिरनाम्याला चिरस्थायित्व प्राप्त होईल, आणि नुसत्या शब्दरूपानें नव्हे तर मूर्तीच्या द्वारा तें भावी पिढ्यांच्या अंतःकरणांत प्रतिबिंबित होईल. अशा स्मारकस्तंभाच्या उभारणीस हिंदुस्थानांतले राजेरजवाडे, धनिक व्यापारी व सुखवस्तु लोक यांचेकडून थोडक्या वेळांत उत्तम प्रकारें मदत झाली आणि ती कोणत्याही प्रकारें सरकारी किंवा खाजगी दडपण न घालतां मिळाली यावरूनच हिंदुस्थानचे लोक ब्रिटिश राज्यांतल्या चांगुलपणाचे किती चाहते, राजनिष्ठ आणि प्रेमळ आहेत तें दिसून येतें. हिंदुस्थानांतल्या प्रजेची येवढीच इच्छा आहे कीं लार्ड मिंटो साहेबांच्या मागून जे अधिकारी येतील ते त्यांच्या सारखेच या जाहिरनाम्याला मान देणारे व त्यांतील अंगभूत राजनीतीच्या तत्वांचा आदर करणारे असेच यावेत; या जाहिरनाम्याला ‘ अशक्य सनद ’ ठरवून महाराणी साहेबांच्या वचनाला धाब्यावर बसवूं पाहणाऱ्या पापग्रहांची बाधा पुनः कधीं हिंदुस्थानाला होऊं नये अशीच सर्वांची ईश्वरास प्रार्थना आहे.

---

## बनारस हें निराळेंच संस्थान होणार.

लॉर्ड मिंटो यांची कारकीर्द आणखी एका गोष्टीनें संस्मरणीय होईल असा रंग आहे. व्हाइसराय साहेबांनीं अलाहाबादेस स्मारकस्तंभाच्या पायाचा दगड बसविते वेळीं असें जाहिर केलें कीं बनारसच्या महाराजांना राज्य करण्याचे अधिकार लवकरच देण्यांत येतील. ही बातमी अत्यंत समाधानकारक आहे. ब्रिटिशांनीं गिळलेलें माणिक परत दिल्याचें हें दुसरें उदाहरण होईल. पाहिलें उदाहरण ह्मणजे म्हैसूर संस्थानचें. हें संस्थान टिपूच्या मृत्यूपासून खालसा केलें होतें. तें लार्ड सॅलिसबरी स्टेट सेक्रेटरी व लार्ड रिपन व्हाइसराय होते तेव्हां परत मिळून हैदरच्या पूर्वीच्या हिंदुराजाच्या वंशजास परत देण्यांत आलें. त्याचच वंशज हल्लींचे म्हैसूरचे महाराज होत. बनारसचें संस्थान म्हैसूरच्याही अगोदर–वॉरन हास्टिंग्जच्या वेळेपासून–खालसा आहे. तें चेतसिंगाच्या वंशजास परत मिळणार हें ऐकून सर्वांना संतोष होईल. ब्रिटिश राज्याविषयींचीं प्रेमबंधनें वाढविणारीं अशीं कृत्यें सरकार जितकीं जास्त करील तितकें ब्रिटिशराज्य हिंदुस्थानांत चिरस्थायी होईल हें सांगावयास नकोच.

### कृषि प्रयोगालय

[ शेतकी सेवधानें आकोल्यास भरलेल्या आाइरसभेचा वृत्तान्त. ]

## मोरचुताचा जंतु मारण्याकडे उपयोग.

पेरण्याच्या पूर्वी ज्वारीच्या बियाला मोरचुताचा मसाला लाविला असतां किती फायदा होतो हें वऱ्हाडांतील कित्येक हुषार किरसान लोकांना हल्लीं माहीत झालेलें आहे. पेरण्याचे आधीं बियारी रसायन लावलेलें बीं पेरलें असतां त्यापासून जें उत्पन्न होतें त्यास कान्ही नांवाचा रोग कधींच होत नाहीं हें त्यांच्या अनुभवास येऊन चुकलेलें आहे. कान्ही रोगानें कणसांतील दाणे काजळासारखे होतात. किंवा सर्व कणसांसच काजळ लागल्यासारखें होतें. हा रोग आळव्याच्या रोग मुळें होतो हें थोडक्यांनाच माहीत आहे. आळवा हें एक लहानसें रोप आहे. तें ज्वारीच्या झाडांत वाढून त्यापासूनच आपलें पोषक द्रव्य घेतें. आणि म्हणून तें जमिनींत न उगवतां रोपावर उगवणाऱ्यां पैकीं आहे. ह्या आळव्याचे बियासच आपण काजळी समजतों. याचें बारीक बारीक बीं निरोगी जोंधळ्याच्या बियांत मिसळून जोंधळा पेरला म्हणजे त्या बरोबरच हें उपजतें. ह्याचा उगम जोंधळ्याचे धांड्यांत होऊन त्या धांड्यांतच तें वाढतें. व कणसें तयार झाल्यावर त्यांना झोंबतें व जोंधळ्याच्या दाण्याऐवजीं याचेच बारिक बारिक दाणे कणसांत होतात यावरून आपल्यास हें दिसून आलें आहे. कीं हा रोग लहान काजळी बियांच्या रूपानें जोंधळ्याच्या बियांत मिसळून ज्वारीच्या एका पिकांतून दुसऱ्या पिकांत जातो. याप्रमाणें साऱ्‍ दरसाल होत जातें. या रोगाचा नाश करण्याकरितां आपल्यास त्यापासून हें काजळी बीं उद्भवीं त्याचा नाश केला पाहिजे. ज्वारीस मोरचुताचा मसाला लावला असतां हें काम होऊं शकतें. मसाला लावण्याच्या रीतीचें वर्णन केलेलीं हस्तपत्रकें पुष्कळशीं वाटलीं गेलीं आहेत. दुसरी रीत ही आहे कीं एक शंभरांश भागाचें रसायन [ मसाला ] तयार करून त्यांत बीं दहा मिनिटें भिजत ठेवावें. दोन्ही रीतींचा एकसारखाच परिणाम होतो.

दोन वर्षांपूर्वी या रोगापासून होणारें नुकसान दर एकरीं ३ रुपये या प्रमाणें झाल्याचें दिसून आलें होतें. एक एकरांत लागणारे बियास मसाला देण्या करितां मोरचुताचा खर्च झाला म्हणजे एक पैशापेक्षां ही कमी येतो म्हणून ह्या जंतू नाशक रसायनाचा मसाल्याचा उपयोग केला असतां म्हणजे मोरचुताचें पाणी ज्वारीच्या बियास दिलें असतां किरसानास खर्चापेक्षां दोनशेंपट जास्त फायदा होतो. वऱ्हाडांतील पुष्कळसे किरसान अगोदर पासूनच तसें करीत आहेत. या खात्यानें फक्त याच विभागांत याच वर्षीं १९ हं० मोरचुत वाटला. तो ९६००० एकर क्षेत्रफळांत लागणाऱ्या बिया करितां पुरे होता. ह्या पैकीं पुष्कळसा मोरचूत रे. इन्स्पेक्टर व अॅग्रि. कल्चरल असि. यांच्या मार्फतीनें वाटला गेला आणि थोडासा कृषिकर्मसभेचे सभासद यांच्या मार्फतीनेंही वाटला गेला. हे सभासद पिंपळगांवराजा येथील रा. रा. गुलाम महमद, पिंपळगांव काळे येथील रा. येकोबा धनसींग व खोलापूरचे आनंदराव देशमुख, राजंद्याचे रा. पांडरंग बापजी व सरुळचे रा. मनोहरपंत

...च्या सभासदांना आमची अशी ...ती आहे कीं या जंतुनाशक मसाल्याचा पुढील वर्षी जास्त प्रसार करण्याचे कामांत ते आम्हास साह्य देतील. प्रत्येक सभासदानें आपापल्या जिल्ह्यांतील सभेकरितां एखादें तरी अशा प्रकारचें काम करण्यास तयार असलें पाहिजे. वऱ्हाडच्या सभात असे पुष्कळ सभासद आहेत कीं जे अगोदरपासूनच आमचे कामांत अगदीं कळकळीनें काम करीत आहेत. परंतु यापेक्षांही अधिक जास्त साह्यतेची आम्हांस अवश्यकता आहे. व ती ते मनापासून देतील अशी आम्ही उमेद करितों. हा मसाला वाटण्यास तयार असलेल्या उमेदवारांना चार चार तोळ्यांच्या पुड्या दिल्या जातील प्रत्येक पुडीची किंमत अर्धा आणा ठेविली आहे व ती मूळ किंमतीपेक्षां किंचित् जास्त आहे. तीन एकर जमीन लागणाऱ्या जोंधळ्याच्या बियाकरिता चार तोळ्याची एक पुडी बस्स आहे. मसाला लावण्याच्या रीतीचें वर्णन दिलेलीं हस्तपत्रकें फुकट दिलीं जातील. जे सभासद पुड्या वाटण्याचे काम करण्यास तयार असतील त्यांनीं किती किती मोरचूत पाहिजे याची माहिती ही सभा आटोपल्यानंतर येथील शेतीचे सुपरिन्टेंडेंट साहेब यांच्या कडे द्यावी म्हणजे त्या प्रमाणें मोरचूत पुढच्या एप्रिल किंवा मे महिन्यांत दिलें जाईल.

---

## वऱ्हाड शिक्षण समाज.

( ता. ३१ माहे आक्टोबरच्या अंका वरून पुढें चालू )

या सालीं बक्षिसां करितां नेमलेल्या तिन्ही विषयां वरील तिन्ही भाषेंतील निबंधांची संख्या २२ आहे. त्यां पैकीं हरबार्टियन पद्धती वरील २ शाळेंतील शिस्त या विषयावरील ३ व नीतिशिक्षणावरील ५ असे एकंदर १० निबंध कमेटीनें पसंत केले आहेत ते समाजा पुढें यथावकाश वाचले जातील. तसेंच शिक्षणा करितां नेमलेल्या चारी विषयांवरील पाठांची संख्या २९ आहे त्यां पैकीं कमेटीनें १९ पसंत केले आहेत. तेहि समाजापुढें शिकवून दाखविले जाणार आहेत.

गेल्या सालीं बक्षिसांची पद्धत अंमलांत आल्या पासून आपल्या समाजाच्या नेहमींच्या काम करण्याच्या पद्धतींमध्यें बराच फेरफार करावा लागत आहे. केवळ विद्वत्तेच्या लालसेनें जें काम समाजापुढें केलें जात असे तें बाजूला ठेवावें लागत असून बक्षिसां करितां पुढें येणाऱ्या करितां कार्यक्रमात जागा करावी लागत आहे. हें कितपत इष्ट आहे याचा विचार करून या बाबतीत समाजानें कांहीं तरी तोड काढिली पाहिजे.

या नंतर प्रान्तांतील पोट शिक्षक समाजांचा अहवाल सांगण्यात आला तो सारांशरूपानें येणें प्रमाणें आहे.

चालू सालांत पोटशिक्षक समाजांची संख्या २ नीं वाढून ती ७८ वरुन ८० वर गेली आहे. शिक्षकांच्या सोयी प्रमाणें पोटशिक्षक समाजांची संख्या कमिजास्ती होते. प्रत्येक पोटशिक्षक समाजाच्या एका वर्षांत ४ बैठकी होतात. बऱ्याच समाजाच्या या चारी बैठकी होऊन गेल्या आहेत व कांहींच्या ३ च झाल्या आहेत. यांचें

८० समाजात एकंदर शिक्षकांची संख्या २२१८ आहे व त्यांच्या हजीरीचें सरासरी प्रमाण ७९ पेक्षां थोडें जास्तच आहे. चालू सालांत या सर्व समाजांत झालेल्या व्याख्यानाची संख्या ७८ आहे. निबंधांची २३० व शिकविलेल्या पाठांची ४२९ आहे.

चालू सालांत या सर्व समाजांनीं मिळून वर्गणीच्या रूपानें सुमारें ९१० रुपये गोळा केले व त्यांपैकीं सुमारें १३० रुपये मुख्य शिक्षक समाजास पाठविले. सुमारें २४० रुपयांची आपापल्या सर्कल करितां पुस्तकें खरेदी केलीं. सुमारें ८९ रुपये किरकोळ खर्च झाला व बाकी सुमारें ४८० रुपये शिलकेंत आहेत. ही रक्कम शिल्लक न ठेवितां तिचा उपयोग शिक्षकांस उपयुक्त अशा पुस्तकांच्या खरेदीकडे केला जावा अशी सूचना मुख्य समाजाकडून दर वर्षी केली जात. तिजकडे पोटसमाजांनीं दुर्लक्ष करूं नये. पोटसमाजांस जीं पुस्तकें खरेदी कराविशी वाटतील त्यांची यादी त्यांनीं मंजुरीकरितां आपले जिल्ह्याचे डेप्युटि इन्स्पेक्टर यांजकडे पाठवावी व ते मंजूर करतील तितकींच पुस्तकें विकत घेतलीं जावीं. या पोटसमाजांच्या पुस्तकालयांत गेल्य सालीं २७३९ रुपये किंमतीचीं एकंदर ३१८९ पुस्तकें होतीं. त्यांत चालू सालांत २४७ रुपये किंमतीच्या २४० पुस्तकांची भर पडली आहे.

या सालीं निरनिराळ्या ३९ पोटसमाजांकडून एकंदर ८७ सूचना आल्या आहेत. त्यांपैकीं सब्जेक्ट कमिटि पसंत करील त्या योग्य विचारा करितां समाजापुढें मांडल्या जातील. दरसाल प्रमाणें बक्षिसांकरितां पुस्त्या मागविल्या होत्या. त्याप्रमाणें इंग्रजी १९२ मराठी १३२ व उर्दू ३९ पुस्त्या आल्या आहेत व शिवाय मुलींच्या ४ आल्या आहेत. तसेंच ड्राइंगचीं चित्रकामें मागविल्या प्रमाणें एकंदर ८९ आलीं आहेत. मेहेरबान स्लाय साहेब बहादुर यांनीं १०० रुपयांची उदार देणगी दिल्याचें माहित झाल्यावर शिक्षकिणींच्या व मुलींच्या शिवणकामास दहा दहा रुपयांची तीन बक्षिसें ठेवण्यांत आलीं होतीं. या बक्षिसां करितां आलेलें शिवणकाम मुलींच्या शाळेंत मांडलें जात आहे. व मोठ्या आनंदाची गोष्ट ही कीं आकोल्यांतील कुलीन स्त्रियांनीं मुलींच्या कामाची परीक्षा करून खासगी वर्गणीचे द्वारें मुलींना बक्षिसें देण्याचें ठरविलें आहे. या प्रमाणें त्यांनीं स्त्रीवर्गाच्या शिक्षणा पैकीं एक महत्वाचा भाग आपले हातीं घेतलासें होत आहे. ही गोष्ट त्यांस भूषणावह आहे. दुसरी स्तुत्य गोष्ट ही कीं त्यांनीं याच प्रसंगीं आकोल्यांतील कुलीन स्त्रियांच्या शिवणकामाचें तेथेंच लहानसें प्रदर्शन मांडण्याचा विचार आहे. या गोष्टींचा स्त्री समाजावर हितावह असा परिणाम होईल असा अंदाज आहे. या नंतर समाजाच्या कामाच्या सोयी करितां कांहीं सूचना केल्या नंतर सेक्रेटरीचा रिपोर्ट संपला.

## वऱ्हाडवृत्त.

---

**हवामान**—थंडीचे मान वाढत असून आरोग्यवृद्धीस हितकारक आहे. पीकें सुधरत चालली असून सर्वां डुड्यांच्या मैफली होत असतात.

**प्लेग**-उमरावतीला दररोज २०।२९ प्लेगाचे मृत्यु होत असतात. बाकीच्या उमरावती जिल्ह्यांत हें मृत्युंचें प्रमाण पुष्कळ मंदावलें आहे. बुलढाणा जिल्ह्यांतील रोजची सरासरी २९ मृत्यूंपेक्षां अधीक आहे. आकोला जिल्हा समाधानकारक स्थितींत आहे.

रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे एक्स्ट्रा असि. कमिशनर, बुलढाणा यांस तीन महिन्यांची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

**चंद्रग्रहण**—गेल्या गुरुवारीं पहाटेला ४ वाजून २० मिनटांनीं चंद्रबिम्बाची अग्नेय कोपऱ्याकडील कोर प्रथम कृष्णवर्ण दिसूं लागली. पुढें भगसंडीपाऊणतासानें बिम्बाच्या अर्धवर्तुळा पेक्षां अधीक भाग ग्रासला गेला. पंचांगांत वर्तविल्या प्रमाणें हें ग्रहण खग्रास नव्हतें. चंद्रबिम्बाची वायव्येकडील एक कला पृथ्वीच्छायेनें तशीच अस्पृष्ट राहिली होती कां कीं त्या पुढें तो अस्पृष्ट भाग उत्तरोत्तर अधिक शुभ्र होतांना दृष्टीस पडला. ग्रहण लागलेले बिम्बाचा कृष्णवर्ण पालटून पुढें तेथें फिकट काळा तांबूस असा रंग आला होता आणि त्या रंगामुळें चंद्रावर अमेरिका खंडाचें चित्र रेखाटल्या प्रमाणें आकृती दिसत होती. ग्रहणामुळें चंद्राचा प्रकाश जसजसा कमी कमी होत चालला तसतशी थंडी अधीक वाटूं लागली यावरून असें दिसतें कीं चंद्रकिरणांमध्यें बरीच उष्णता असली पाहिजे. या ग्रहणाचा सर्व देखावा मोठा प्रेक्षणीय होता पण ६॥ वाजतां असणाऱ्या प्रभमुळे चंद्र निस्तेज व अदृश्य झाला आणि त्यामुळें मोक्षकालाची मौज पाहण्यास मिळाली नाहीं.

**व्याख्यान षट्क**— पंडित भवानी शंकर गणेश, इनस्पेक्टर थिआसाफिकल सोसायटी, मद्रास, हे येथील शाखा पाहण्यास आले असून त्यांनीं भगवद्गीतेंतील 'पुरुषोत्तमयोगा' च्या पंचदश अध्यायावर दोन व्याख्यानें दिलीं. गुरुवार अखेर आणखी ४ प्रवचनें होणार आहेत. हीं व्याख्यानें फार चांगलीं होत असून मोठीं बोधपर आहेत. ब्रह्मविद्ये... शहरवासीयांनीं अवश्य लाभ करून घ्यावा.

**पाण्याचा पुरवठा**—अकोल्याला पाणी विपूल आणण्याचा प्रश्न मेजर ह्वैडन साहेब, डिपुटी कमिशनर यांनीं मोठ्या नेटानें हातीं घेतला हें कळविण्यास विशेष आनंद वाटतो. लोकांची सहानुभूती या कार्याला असावी म्हणून येत्या बुधवारीं येथील टाऊनहालांत सायंकाळीं ५ वाजतां जाहिर सभा भरणार असून तेथें पाण्याच्या भावी योजनांचा विचार व्हावयाचा आहे. वर्गणी जमविण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न चालू आहेत आणि या सार्वजनिक कार्याची पुण्याई लोकांस साहजिकच प्रोत्साहन देत आहे.

ॐ

## सत्यमेव जयते.

**सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )**

शास्त्री नारो बावाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकारितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, कावत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायश्चित्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ४ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडा, साहित्यविडा, जन्नाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्ण कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिती दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वस्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्योष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजानेक सत्यधर्मांचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधी ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशी-चळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजनिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र. व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारख आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरात छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागाविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

### सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्यास अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं अत्यंत उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या [illegible] वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीचे पदार्थ व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधांत विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेदविद्येचें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल

**सत्यशोधक समाज ऑफिस**

पोष्ट हिवरखेड रुपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७९ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

---

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार – ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार-खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात ह्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणें करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल आमचेकडे शालोपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. धारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

---

## विंनती पत्र.

सप्रेम वि. वि. अलीकडे या दोन वर्षांत आमच्या **सुधारलेल्या लोखंडी नागरांचा** खप फारच झपाट्यानें वाढल्याकारणानें व विशेषेकरून सातारा जिल्ह्यांत व कोल्हापूर, सांगली, मिरज, वगैरे संस्थानांत आमचीं **आउतें** फारच खपल्यामुळें आह्मी आमचा बेळगांव येथील **शेतकीचीं आउतें** करण्याचा कारखाना सदरहू प्रांताच्या मध्यभागीं ह्मणजे सातारा जिल्ह्यांत **कुंडलरोड** रेल्वे स्टेशनानजिक **किर्लोस्कर वाडीस** नेला आहे सबब आपल्यास येवढीच विनंती आहे कीं, या नंतर आपल्यास अगर आपल्या मित्र मंडळीस आमचीं जीं **आउतें** लागतील तीं खालीं लिहिलेल्या **पत्त्यावर** मागविण्याची मेहेरबानी करावी. लोभ असावा हे विनंती.

आपला आश्रय इच्छिणारे,

**किर्लोस्कर बंधु,**

किर्लोस्कर वाडी, पोष्ट कुंडल,

नो. नं. ड ९६ जिल्हा सातारा

---

**जेंव्हां डाक्टर व वैद्य यांची**

**हीं निराशा होत, तेंव्हां सुद्धा**

**सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या**

# सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षी पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटें दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधानें कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी (कालरा) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, मळमळ, हांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि खोकला सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाटलीस -॥- आणे. सर्व औषधें विकणारां जवळ मिळतें. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू [illegible] लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे

मांगविण्याचा पत्ताः—

**क्षेत्रपाल शर्मा मालक**

**सुख संचारक कंपनी मथुरा**

---

## जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्यांचीं यंत्रें, तेलाचे घाणे, कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणताही माहीती पाहिजे असल्यास खालील पत्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक.

मेसर्स डेकन स्टेट्न कंपनींतील ऑईल एंजिन एक्सपर्ट (फील्डींग),

नो. नं. ड ८० उमरावती.

---

### गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत !!

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐ नमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कप्पतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळींच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला कचित् कचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफळार्कमधु" यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड व सुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी कामस्थिती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्याचे अंशमानानें अधिक वाढते. शरीर मजबूत आणि कांतीयुक्त होतो रहे, ग[illegible] व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अ[illegible] कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेत[illegible] कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील [illegible] शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरते[illegible] शौचास साफ होऊन भूक चांगली ल[illegible] कडून लागते हा दाखला पहिले दिवशी पडतो. एका सप्ताहांतच शरिराचें व[illegible] वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषि[illegible] झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता ये[illegible] या औषधास पथ्य नाहीं कामविकार द्विगुणि[illegible] होतो. नवा रोग असल्यास १० दि[illegible] पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येते[illegible] १ बाटलीची किंमत १ रुपया. दो[illegible] बाटल्यांस १८१४, तीन बाटल्यांस २८१ दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सल[illegible] भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च ज[illegible] पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडे[illegible] कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी० पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स

एम्. जी. आ[illegible]

नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंप[illegible]

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळग[illegible]

सूचना—कोणताही माल गुणक[illegible] ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची न[illegible] सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास [illegible] होत नाहीं आमचे येथें नकली औषध[illegible] कारखानेदार नुकतेच डोकें वर कर[illegible] गले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आम[illegible] ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांजकडील आनररी असिस्टंट सर्जन यांनी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें वारिक हल्लीं वर्तमानपत्रांतून ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्याहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सार्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शेंमरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टिक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जो धातु तो शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें तो दोषी असेल तर शरीरांत नानप्रकारचे रागरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटीका प्रत्येक वर्षी पाहिजे या दिवसांत एकदा तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नगत व इतर धातुपात उन्हाळे इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधीं मुरलेले विकोप मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, कंठ पाय त्रमांग. व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडूरोग मुलाची सर, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जनाट परमा, मुष्ठीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व [illegible] भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्ध, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व जडान्न पचूं लागते ह्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिये, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च १ आणे पडेल अनुपानखर्डे सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दर:-एकदम ३१ गो० १ रु०, ७१ गो० २ रु० ११९ गो० ३ रु० १२९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें वडस. साहर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि नेत्राचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस अंजन खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः-कोणताही नवा जुना परमा व अनुपम दहा तिडीक मुत्राची लाली, संकोच पुस्राव, रक्तस्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ ॥ भार बाटलीस रु० २

४ दंतवज्रवर्धक पूडः-दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः-औषध लावतांच उतरतें पुड्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः-खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात ड. ६ आणे

७ सर्व हिवज्वरः-औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः-आजपर्यंत आमचे औषधांनें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गांठीस मलम, वात चढू नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा णाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा कॅटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म शाक, गुटीका, आसवे, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्डी सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाचो निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरू असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून ना तों पुढें येऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरू केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पाहिजे त्यानें करावा आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत ऊत आला असून आमच्या आंजिले वगैरे गावांतून तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधीनें कांत्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याणकारीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीनें यशहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूंस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्यास आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरावीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा मिळकूळ संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें ती खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य**

**पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.**

---

**ORIENTAL GOVERNMENT**

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

## FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur

---

हें पत्र आकोलें येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Berar Samachar.

वर्ष ४४ ] आकोला—सोमवार तारीख २८ माहे नोव्हेंबर सन १९१० इ० [ अंक ४४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातात. त्यापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल.

## जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविता जाईल

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्या पैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपये प्रमाणें दिलें जाईल. त्याबाबी आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारांवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } G. A. Phillips.
आकोला ९।९।०९ } एजंट
नं ७३

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ ३/४ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक } G. A. PHILLIPS.
आकोला २१९१० } एजंट.

## NOTICE.

D. Y. Phatak oil-engine expert for Fielding oil engines (as supplied by Messrs. Duncan Stratton and Co. of Bombay) can be consulted as to the purchase condition and value of new and second-hand oil-engines, pumps, oil mills, grinding machines and cotton gins.

Address:- C/o N. G. Ketkar Esq.

## त्वरा करा त्वरा करा.

अशी संधी पुन्हां येणार नाहीं.

सदा एकसा ईमानदार



एक घड्याळ बक्षीस.

दरएकची कि ३। रु.

पोष्ट खर्च माफ.

### उत्तम प्रकारचे इमिटेशन रास्कोप सिस्टिम

नांवचे खिशांत ठेवण्याचें घड्याळ दिसण्यांत फार सुरेख आहे. सर्व लोकांस ह्या घड्याळाचा लाभ मिळावा म्हणून मुद्दाम किंमत रुपये ३। ठेविली आहे; पोस्टेज खर्च माफ. घड्याळा सोबत कांच, कमान, पेटी, सांखळी, इतकें सामान फुकट मिळेल. ह्या घड्याळाचा खप फार जारीनें सुरू आहे जास्त तारीफ करण्यांत कांहीं हांशील नाहीं. एक वेळ मागवून खात्री करा. कारण कीं अशी अमुल्य संधी पुन्हां येणार नाहीं. व्ही. पी. मागवा.

मिळण्याचा पत्ता
खोजा वली भाई इस्माल
मुक्काम वर्धा. [ मध्यप्रांत ] WARDA.
नो नं ण ४१

## नोटीस.

रा. देवराव निंबाळकर मराठे कुणबी राहणार गोपाळखेड ता० आकोला यांसः—

बापुराव उत्तम जाधव राहणार लोणाग्रे ता० आकोला नोटीस देतों कीं तुमची मुलगी [ सरु ] माझी बायको असून तिला न्हाती धुती होण्यास अंदाजासें २ वर्षे झालीं. तिला दागदागीन्यांसह व कपड्यालत्त्यांसह दीपवाळी करितां नेली ती अद्याप पावेतों पाठविली नाहीं. माझ्या घरचीं माणसें घेण्यास आलीं असतां मला रोगराई झाल्याचा खोटा बहाणा करून तिला धाडिलें नाहीं. मजजवळ फारकत मागतां तुमच्या मनांतून माझा संसार बुडविण्याचा आहे. मी तिला दागाविण्यास राजी असल्यानें फारकत देऊं शकत नाहीं. व माहेरीं राहिल्या दिवसांचे खावटीचे पैसेही देणार नाहीं. माझ्या फारकती शिवाय तिचें गंधर्व लाविल्यास मी तुमच्यावर व पाटाचे नवऱ्यावर माझा दुसरा संसार करण्यास लागणारे खर्चासह दावा आणीन, तिचा ताबा मिळवीन व सर्व नुकसानी भरून घेईन. सबब तिला नोटीस प्रसिद्ध होतांच ८ दिवसांत माझ्या चीजवस्तासह पोंचतें करावें. कळावें ता० २१ माहे सप्टेंबर सन १९१०

सही
बापुराव उर्फ त्रिंबक वा॥ उत्तम
दस्तूर खुद

नो० न० ण ४९

## NOTICE.

The following extract from Government of India, Home Departmen Resolution No. 2831-42, dated the 8 th. December 1899, is published for gener information.

Sd/ B. P. Standen,
Nagpur, Chief Secretary to the Chief Commissione
The 22 nd. November 1910. Central Provinc

———o———

## Resolution.

The Secretary of State for India has brought to the notice of t Government of India that itnot in frequently happens that natives of Ind students or others who have proceeded to England, desire to obtain passports enable them to travel to foreign countries in which the possession of a passpo is necessary or desirable, and that difficulty often arises from want of eviden to show that the applicant is a British subject and therefore entitled to a passpo Appeals for assistance are also frequently addressed to his Lordship by destitu Indians who desire to return to their country and by students who, owing embarrassed circumstances, are unable to complete their course of education.

2. In order to enable the Secretary of State to deal with such ca satisfactorily, the Governor General in Council has decided that it is necess to press upon Indian students and others visiting England the desirability providing themselves, before their departure from India, with an authoritat certificate of identity. in the form appended to this Resolution, signed by t head of the district ( in a Presidency Town, the Commissioner of Police ) in the c of residents of British India and by the political Officer in that of residents of Nat States. For a student the certificate should be signed by the head of his school or college and countersigned by the District Officer ( in a Presiden Town, the Commissioner of Police ) or Political Officer as the case may be:—

### FORM OF CERTIFICATE OF IDENTITY.

1. Name of applicant....................................
2. Father's name and caste...............................
3. Residence.............................................................
4. Age of Applicant..............................................
5. Nationality of applicant ....X...........................
6. Social and pecuniary status of father ( or guardian )...........................
7. Date of probable departure of applicant from India...........................
8. Object of applicant's visit to England ( Europe ) ...........................

Signature of District Officer ( in a Preside Town, the Commissioner of Poli or Political Officer, or h of school or colle

Date..................................
..........................

X i. e. whether a British subject by birth or by naturalization ( or a subject of native state. )

No. N. N 46.

## नोटीस

तुळशी मर्द रामजी तेली रा. पंचगव्हाण ता. आकोट हिसः—

खालीं सही करणार रा. पंचगव्हाण ता. आकोट यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझी वडील भावाची बायको असून तुजला एक मुलगा नामें तुकाराम हा मैत झाला आहे. शेती सर्व एका ठिकाणीं आहे. हल्लीं तुझे मनांत मुलगा मेल्या पासून असें आलें आहे कीं, मौजे उमरखेड ता. आकोट एथील शेत सर्वे नं. ९७ चें शेत तूं आपले मर्जीस देण्याचे विचारांत आहेस तेव्हां त्या शेतावर तुझा कांहींच हक्क नाहीं. तूं फक्त खाण्याची मालकीण आहेस. तेव्हां वरील शेत कोणास गहाण, खरेदी, पट्यानें किंवा बक्षिस देऊं नये तूं विधवा स्त्री असल्यानें तुला देण्याचा हक्क नाहीं, दिल्यास रीतीप्रमाणें काम चालेल. करितां ही नोटीस दिली आहे कळावें. ता. २१-१०-१० इसवी

सही
सदु वलद चिमनाजी तेली हल्लीं
रा. आकोला नि. खु. रेघ

WANTED.— At once active ag everywhere to sell large consignm of American goods including watc &c. Salary Rs. 20 and 5 o/o commiss For particulars apply with one a stamp o—

Hardinge + Co
Merchants,
133. Canning street, Calcu

## आकोला बाजारभाव

| | | |
|---|---|---|
| हुंडी दर्शनी | | ९९॥= |
| मुंबई ब्यांकेची सोन्याची चीप दर तोळ | | २[illegible] |
| चांदी | | ७३ |
| जवारी नवी | ४९ | ९८ |
| गहूं | ४।= | ९= |
| गहूं बनशी | | ११० |
| चणे | | ३॥ |
| तेल | | ८ |
| सरकी | | ११ |
| तुप | ११ | १२ |
| कापूस | ८२ | ८९ |
| आकोला जीन | | १०९ |

# वर्तमानसार.

खालील पुस्तकें सरकारजमा करण्यांत याचें ता. २४ च्या मुंबई सरकारच्या कारी गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे:— [ १ ] बारिसालचा धामधूम व [ २ ] बंगभंग हीं नाटकें वासुदेव रोत्तम साठे यांनीं मराठींत लिहिलेलीं न तीं जे० व्ही० [ प्रेस बडोदा ] छापलेलीं आहेत. ( ३ ) मराठ्यांच्या हासांत नानांचें महत्व. हें पुस्तक मुंब- विश्वछापखान्यांत मराठींत छापिलेलें न तें गणेश नारायण जोशी यांनीं द्ध केलेलें आहे.

खाली या नांवाच्या एका मनुष्यास या नवेंबर महिन्यांत चीन सरकारा- द्ध झालेल्या बंडांत सामील असल्याच्या पावरून हद्दपार करण्यांत आलें होतें. मनुष्य हल्लीं ब्रह्मदेशांत आला आहे. तो स्थानिक सरकारच्या अटकेंत आहे.

शिराजी यांनीं लिहिलेलें राजद्रोही क ' अनलप्रभा ' हें आपल्या छापखान्यांत ल्याबद्दल देवी प्रसन्नराय चौधरी यांस ०० रु. दंड करण्यांत आला होता. वर त्यांनीं अपील केलें व तें न्या० बुड व शरफुद्दीन यांनीं मंजूर केलें आहे. नुहीराम मुन्सफ यांनीं दिल्लीच्या आ- श पत्राविरुद्ध मानहानीचा खटला केला ता. एडिटर व मुद्रक यांनीं माफी मा- तल्यामुळें ते सुटले. एका निंदाव्यंजक ख्रके कर्ते पं. उमादत्त यांस २५० दंड करण्यांत आला.

न्हाडा व्हॅलीमधील स्थिति फार भयंकर ली आहे. संपवाल्यांनीं आगगाड्यांना ग्नल देण्याची जागा छापा घालून पल्या ताब्यांत घेतली व संपांत सामील झालेले असे मजूर केले आहेत हें हण्या साठीं गाड्या शोधल्या व इतर कांवर हल्ला केला. काल ता. २१ व्याकाळीं टॉनीपॅंडी स्टेशनावर छापा घा- ण्याचा प्रयत्न करण्यांत आला, त्यामुळें न तास एकसारखी झटापट सुरू झाली हां पायदळाची पलटण मागविण्यांत ाली. परंतु पोलिसांनीं तो दंगा मोडून ार्थीच बंदोबस्त केला. पोलिसांपैकीं सहा णांना जखमा झाल्या.

गैरकायदा अटक केल्या बद्दल व रीतीनें वागविल्याबद्दल हशमद अली- ान पो. स. इन्स्पेक्टर यांस रावळपिं- ाच्या सेशन्समध्यें कमिट करण्यांत आलें ोतें. जजसाहेबांनीं त्यास निर्दोषी ह्मणून ाडून दिलें.

शिराजहून आलेल्या बातमीवरून कळतें ीं, शिराज येथें मोठी बंडाळी सुरू ाली आहे, लोक दारें बंद करून घरांत लपून राहिले आहेत, सशस्त्र बंडखोर स्त्यांवरून फिरत आहेत. ज्यू लोकांस यांनीं लुटलें असून कित्येकांस ठार केलें आहे. ज्यू लोकांची फार दैना उडाली आहे.

मिदनापुर येथील अनुकसानीच्या खटल्यांत ाजेंद्रनाथ बानर्जी मुखत्यार यांची साक्ष ाली. "आरोपीकडून लांच देववा असें ालवी मला ह्मणाला. लोकांस पोलिस कसा त्रास देतात हें मी एका वहींत लिहून ठेवीत असे." असें साक्षीदारानें सांगितलें व वही दाखविली त्यांत मैल- व्हीनें लांच घेतल्याचा उल्लेख होता.

पुस्तकाचे कर्ते सखाराम गणेश देउस्कर याच्या तर्फे पुस्तकावरील खटला स्पेशल बेंच पुढें चालावा असा अर्ज करण्यांत आला व मान्य झाला आहे.

' कर्मयोगिन ' च्या मुद्रकांस सोडून देण्याचा हुकूम प्रेसिडेन्सी जेल सुपरिंटेंडेंट यास पोंचला तो त्यांनीं न्यूसेन्ट्रल जेल- मध्यें पाठविला, परंतु तेथून तो हुकूम भोतीहारी जेलमध्यें पाठविण्यांत आला; कारण आतां कैद्यास तेथें ठेवण्यांत आलें होतें. अशामुळें व सुट्टीचे दिवस असल्यामुळें हुकूम पोंहोचण्यास उशीर होऊन मुद्रकाचे सुटकेस विलंब लागला. आतां त्याची सुटका झाली असून कल- कत्त्यास तो रवाना झाला आहे.

तेहरान येथील तारेवरून समजतें कीं बुशायर येथून आलेला सौदागरांचा एक तांडा शिराजजवळ कांहीं लुटारू लोकांनीं लुटला. त्यांत एका ब्रिटिश फर्मचे १०० गंठ्ठे चोरीस गेले आहेत.

अरविंद घोष याविरुद्ध असलेले सर्व आरोप काढून घेण्यास मला सरकारकडून सांगण्यांत आलें आहे असें कोर्टांत सरकारी वकीलांनीं बोलून दाखविलें. ' कर्मयोगिन् ' पत्र छापलें जात असे तो श्री नारायण छाप- खाना परत मिळण्या विषयीं अर्ज करण्यांत आला होता. छापखान्यावर कोणाची मा- लकी आहे या संबंधाची चौकशी आतां करण्यांत येणार नाहीं असें मॅजिस्ट्रेट साहेबांनीं सांगितलें.

ता. २२ नोव्हेंबर रोजीं म्हैसूर संस्था- नच्या कायदे कौन्सिलपुढें धूम्रपानप्रति- बंधक कायद्याचा मसुदा म्हैसूर दरबारा- कडून सादर करण्यांत आला. सोळा वर्षा- च्या आंतील वयाच्या मुलांस तंबाखू विकणें हा गुन्हा ठरवावा आणि अशा अल्पवयी मुलापाशीं तंबाखू आढळल्यास ती जप्त करण्याचा अधिकार पोलिसास द्यावा असा या कायद्याचा हेतु आहे. अशा प्रकारचा कायदा करण्यांत यावा अशी सूचना १९०० सालीं म्हैसूरच्या लोकप्रति- निधी सभेंत करण्यांत आली होती व लो- कांच्या या मागणीकडे लक्ष देऊन तंबाखू ओढण्याच्या व्यसनाच्या मोहास लहान मुलें बळी पडूं नयेत अशी तजवीज म्हैसूर दर- बार करीत आहे ही समाधनाची गोष्ट होय.

वर्तमानपत्रांस बंदी—सातारा येथील व्हिक्टो- रिया लायब्ररीचे प्रेसिडेंटकडे, खालील मराठी व इंग्रजी पत्रें लायब्ररींत घेऊं नयेत अशी सरकारची इच्छा आहे, अशा अर्थाचें पत्र विद्याखात्याच्या डायरेक्टरकडून आलें आहे:- केसरी, मराठा, काळ, अरुणोदय, धर्म, भगवा झेंडा, मुमुक्षु, राष्ट्रमत, श्रीशिवाजीविजय, सुधारक, प्रकाश व प्रतोद.

ना० मि. एस्. पी. सिंह यांनीं ता० २१ रोजीं हिंदुस्थान सरकारच्या कार्यकारी मंत्रीमंडळांतील आपल्या जागेचा राजी- नामा दिला व ना० मि. अली इमाम यांनीं सदरहू जागेचा चार्ज ता. २३ रोजीं घेतला असें इंडिया गॅझेटमध्यें सर- कारी रीतीनें प्रसिद्ध झालें आहे.

गेल्या आक्टोबर ता० १५ रोजीं बाद- शहा पांचवे जॉर्ज यांच्याकडून ना. सरदार अफ्सर, अमीर नुमान, शेख खाजलखान, इब्न हाजी जाबरखान, शेख ऑफ महमेरा यांना के. सी. आय. ई. हा किताब देण्यांत आला आहे.

## ...नाटक

[ मागील अंकावरून पुढें चालूं. ]

### अंक ३ रा.

#### प्रवेश तिसरा.

स्थळः– ( स्वार्थपरायणाची दुगे )

**नलिनी—** मजप्रमाणेंच यक्षिणी मृडानी वहिनीला भेटली असेल काय ? मृडानीलाहि मी साह्य करणार आहे असें ती ह्मणत होती खरी. तिजविषयीं गोष्ट स्वार्थपरायणा जवळ काढूंच आज ह्मणजे काय असेल तें कळेल. तो पहा आलाच मेला. मुनी ह्मणवितो आहे. आणि तिन्ही त्रिकाल निशेंत धुंद. हासांत मदिरेची बाटली आहेच आतांही. पण तें दुसरें काय हातांत.

**स्वार्थपराण—** सखे नलिनी तूं माझ्या मदिरेचा अव्हेर करतेस ह्मणून मुद्दाम तुझ्या करितां ही शंकराची बुट्टी तयार केली आहे. हं ही घे तर कशी.

**नलिनी—**हें काय बाई. असें भलतेंसलतें देण्यानें प्रेम कां व्यक्त होतें.

**स्वार्थपरायण—** तसें नव्हे ग पण ज्या आत्मसुखाचा मी अनुभव घेतों त्यांत तुला वांटेकरी करावें हाच माझा हेतु. पहा तर खरें.

पद

शांभवी भवीं भय नुरवी ॥ गे ॥
चित्सुखाची ही वाट दावी ॥ धृ० ॥
इला स्त्रीकारितां भदनारी ॥
झाला आत्मानंदीं मग्न भरी ॥
घेई घुटका ॥ पाहि चुटका ॥
ही लाविल मनाला चटका ॥ गे ॥
नित्य नवा नवा प्रेमरस वी ॥ १ ॥

**नलिनी—** अह्मां बायकांना तें आत्म- सुख काय करायचें. पुरुष सुखी असले ह्मणजे त्यांना सर्व सुखें मिळतात.

**स्वार्थपरायण—** छे. छे, स्त्रीपुरुषांचा आत्मा एकच आहे. प्रत्येकानें त्यांच्या सु- खाकरितां सारखा प्रयत्न केला पाहिजे.

**नलिनी—** काय मेल्याचा वेदांतपण. पशूंचाहि आत्मा एकच ह्मणून माणसांनींही पशुसारखेंच वर्तन करायचें काय ? ( उघड ) आपण मुनी वेदांत सांगतां नी अधर्मी वागतां हें कसें ?

**स्वार्थपरायण—** धर्म, अधर्म, पाप, पुण्य कांहींच नाहीं. देहाचे नैसर्गिक गुण हाच धर्म. खाणें, पिणें, चैन करणें हीच भक्ति आणि मरण हीच मुक्ति, या वित- रित कोणताहि सिद्धांत खरा नाहीं. वेडी कुठली हं घे. दारू, गांजा, अफू, सुंदर स्त्री वगैरे मानवाच्या उपभोगा करितां निर्माण झाल्या असून त्यांची निंदा करण्या करितां निंदा उत्पन्न झाली आहे. इतकें असून मूर्ख लोक जगांतील सर्व सुख नश्वर समजून.

पद

सुहृत्सुतदारा त्यागुनी ॥ वानी ॥ नटनी ॥
तप करिती वनीं ॥ धृ ॥
कनक भूषणें ॥ दूषण ह्मणुनी ॥ कविति
विभूती देहाते ॥ भजप्रति ॥ पशुमति ॥
हे ग-ती ॥ विडंबिती ॥ तनुप्रती ॥ खल अर्ती॥
निज मनिषा जिंकुनी ॥ १ ॥

एवढा अटाहास्य आत्मप्राप्तिकरितां पण मद नो आत्मा आपल्याला जन्मतांच प्राप्त पिंडाचें पोषण करून चैनीचा उपभोग घ्यावा लागतो. खाणें, पिणें, चैन करणें ही आत्म्याची भक्ति केली असतां अंतीं मुक्ति ठेवलेलीच आहे. हें जाणणाऱ्यांनींच मात्र जगाचा खरा उपभोग घेतला. बाकीचे भारवाही जसें आले, तसें गेले. हं आटप घे ( देऊं लागतो )

**नलिनी०—**मी तें मग घेईन. या शिशींतून मद्यरस देतें तो आपण प्रथम घ्यावा.

**स्वार्थपरायण०—**वा ठीक मदिराक्षीच्या हातूनच मदिरा पान करणें रास्त.

पद

धुंदी येते मदिरेस सेविल्यानें ॥
तशी मदिराक्षी वशनि जाहल्यानें ॥
भिन्न वस्तु परि एक वा गुणानें ॥
प्राप्त होती ज्या श्रेष्ठ तो सुखानें ॥१॥
( दारू पितो )

**नलिनी०—**( दारू देत ) मी वि... सांगायचें होईल कां पण ?

**स्वार्थपरायण०—**[ दारूचा पेला हातांत घेऊन ] हो हो अगदीं एका पायावर पण थोडें घे. ( पुढें करतो )

**नलिनी०—**( तोंड फिरवून ) इश. मला नको.

**स्वार्थपरायण०—**वारे सुरका. [ दारू पितो ] आणि हा मदिरेचा सुरका. हं दे आणखी. हें बघ आतां तुझ्या कराराचे दिवस फार थोडे राहिले. ( पेला देतें ) मग तूं अस्मादिकांची होणार. काय ? दे पाहूं थोडी.

**नलिनी—**पण मी काय ह्मणतें. (भरतें)

**स्वार्थपरायण—**ही मदिरा पिऊन, राक्ष- सांनीं एक वेळ इंद्रपद घेतलें आहे. "जय स्वानंदसुखाची जय" ( पितो )

**नलिनी—**पण मृडानीचें काय झालें तें सांगत नाहीं कां मला. मी नाहीं देत नाहीं तर आतां.

**स्वार्थपरायण—**( झिंगून ) तिचें नांव काढूं नको. चां-चां-डा-आ-ळीण विनापु- रास माझा द्वेष करीत होती. ह्मणून मीं ई-ई. तिला बं-दी-दी-त ठेविलें आहे. आज प-र-र-र-यंत मी तिकडें गेलोंही नाहीं. खिडकींतून ति-ति-ला अन्नपाणी मात्र टा-टाकीत अस-स-तों. हं भ-भ-भ-र आणखी.

**नलिनी—** आणि त्या स्थितींत ती मेली तर ( दारू देते. ) हें पहा मझ्याकरितां आज तिला पाहून या. [ मनांत ] हा अधम तिकडे जात नाहीं ह्मणून बहुत- करून यक्षिणीनें मृडानीची मोकळीक केली असेल. व कळूं देऊं नये ह्मणू लें मला हा मार्ग सांगितला असावा.

**स्वार्थपरायण—** तुझी आज्ञा शिरसा वंद- जातों आता तिकडे. आणि तिलाहि येथेंच घेऊन येतों. पण आणखी एक भरून दे पेला.

पद

मन झुरे आ. आनंदी पि हा सुरा ॥
पि-पि-ई टा सुरा ॥ धृ ॥
ब्रह्मानंदी ट-ट-टाळिन ॥
होउनि गणि टो किमपि ज-ज-गा ॥१॥
( जातो )

**नलिनी—**खूप झिंगून मेला मर्कटा सारखा उड्या मारीतच गेला. मेल्याच्या अंगावर अलीकडे थोडा रक्तपितीचाहि प्रादु- र्भाव दिसत आहे. कां नाहीं होणार आज- पर्यंत त्यानें कितीकांचे गळे कापून अनाथ अबलांचे बळी घेतले असतील.

पद

जें पेरावें तें उगवावें त्यापरि फल यावें ॥
प्रतिध्वनीनें तें उमटावें नेसें बोलावें ॥
जसें करावें तसें भरावें दिल्यापरी घ्यावें ॥
असें हरीचा न्याय असा हा स्व कृत भोगावें॥१॥

( जाते. )

प्रवेश समाप्त.

## श्रीमती ॲनी बेझंटबाई यांचे व्याख्यानाचे आधारें.

[ लेखक चिंतामण हरी गराठे सितावर्डी नागपूर. ]

## हिंदुस्थानची जागृति.

( मागील अंकावरून )

येथें नवीन परिस्थिति उत्पन्न करण आहे, की स्थिति पूर्वी कधींही नव्हती ती स्थिति- सर्व हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे- असें करणें आहे. मनोमय सृष्टींत हिंदुस्थानास एक राष्ट्रियत्व प्राप्त झालें आहे, परंतु तें या स्थूल भूमिकेवर कधीं प्राप्त झालें नाहीं परंतु एक राष्ट्रियत्वाचा जन्मदिवस फार जवळ आहे. आज पावेतों पुष्कळ संस्थानिकांनीं राजामहाराजांनीं सर्व हिंदुस्थानावर आपला बादशाही अम्मल चालविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आज पावेतों हिंदुस्थान दाक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम एक राष्ट्र असें कधीं झालें नाहीं. परंतु तशी स्थिति आतां येत आहे. जेव्हां हिंदुस्थानचें एक राष्ट्र होईल तेव्हां त्या राष्ट्ररूप देवतेचे शिरावर हिमालय हा मुकुटा सारखा शोभेल, तुतिकोरिनचे किनाऱ्यावर उसळणाऱ्या जलनिधीचे टदकानें तिचे चरण धुतले जातील, जिचा दक्षिणहस्त ब्रह्मदेश आणि आसाम व वामहस्त काठेवाड आणि बलुचिस्थान यावर राहील, अशा त्या हिंदुस्थानचा जन्म होणें आहे. तो कसा? एक तर तिजवर निःसीम प्रेम व विश्वास असला पाहिजे. कारण श्रद्धा अथवा विश्वास ही अमोघ अशी शक्ति आहे. तसेंच प्रत्येकाचें इष्ट तिला एक राष्ट्रियत्व देण्याचें असलें पाहिजे. कारण जसें चिंतन करावें तसें प्राप्त होत असतें. आजपर्यंत कोणतें ही राष्ट्र दृढ श्रद्धा व प्रेम या शिवाय उदयास आलें नाहीं. तें हिंदुस्थान जिचा पादस्पर्श ध्वनी ऊंच अशा पर्वतावर आहे आणि जिच्या मुखश्रीवर प्राच्यदिशेस उगविणाऱ्या बालरवीचीं किरणें लवकरच पडतील. जनतेचे मनो भूमिकेवर तिचा जन्म होऊन चुकला आहे.

परंतु तुमचा ऐक्यतेचा विचार दृढ व पक्का असूं दे. तुह्मी आपआपसांतील धर्मसंबंधीं तंटे विसरा, परस्परांस " मी मद्रासी, मी पंजाबी, मी बंगाली, मी हिंदुस्थानी, मी महाराष्ट्री " असें ह्मणण्याचे सोडून देऊन आपल्या मुलांस- आपण हिंदुस्थानचे नागरीक आहों असें शिकवा, अशा रीतीनें मुलें बोलूं लागलीं ह्मणजे त्यांतूनच 'एक राष्ट्राचा जन्म होईल. राष्ट्रांत अनेक धर्म, पंथ राहतील. मुसलमान, पार्शी, ख्रिश्चन या सर्वांची ऐक्यता झाली पाहिजे; कारण ते सर्व हिंदु अथवा इंडियन्स आहेत-हिंदुस्थानांत भविष्यकालीं सर्व धर्मांचे लोक एक झालेच पाहिजेत. भविष्यकालीं सर्वांस आत्मोन्नतिरूप प्रकाश देण्याचें अग्रस्थान हिंदुस्थानास घ्यावयाचें आहे त त्यानें प्रत्येक धर्मपंथतत्त्वप्रकाशाचें एकीकरण करून त्या सूर्यप्रकाशतेजानें सर्व जगास प्रकाशिलें पाहिजे. हीं सर्व एकत्र झालेलीं किरणें दैवी ज्ञानांत अंतरभाव पावतील हाच आपला मुख्य धर्म आहे. बांधवहो, या गोष्टी तुमच्या सांगण्याच्या अथवा ऐकण्याच्या नसून त्या प्रमाणें वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे. श्री. बेझांटबाई सरशेवटीं ह्मणतात-तुह्मांस उपदेश करीत आहे त्या प्रमाणें मी वागण्याचा प्रयत्न जर केला नसता तर मी तुह्मास तसा उपदेशही केला नसता. जेणें करून हिंदुस्थानची व ह्मणून सर्व सामवजातीची मजकडून सेवा घडावी ह्मणून मी दिवसांचे दिवस व महिने गणती आपले आयुष्यास वळण देत आहे. मानवजाति ही एका देशापेक्षां फार मोठी आहे व, तसेंच एका विशिष्ट जातीपेक्षां मानववंश फार मोठा आहे. त्या मानववंशाच्या निरनिराळ्या शाखा आहेत. आणि जर हिंदुस्थानास हें भावी ऐश्वर्य मिळावें ह्मणून आपण आशा करीत असूं तर तें इतक्याच करता कीं तिची राष्ट्रता जगास प्रकाशक होईल.

पुरातन कालीं एका विशिष्ट जातीचे कांहीं लोक होते, जे दुसऱ्या जाती कडून जिंकले गेले व बहुधा त्या नांवानें त्यांचें अस्तित्व ही राहिलें नाहीं त्यापैकीं एक गृहस्थ ह्मणाला " जर आमच्या नाशानें जगाचें कल्याण होणार असेल तर मृत शरीरास देऊन सजीव माणसें घेण्यासारखें होईल. " हिंदुस्थानच्या विपन्न स्थितींतून जगाचें वैभव वाढणें असेल तर ह्मणजे हिंदुस्थानचे हल्लीं असलेले अनेक जाती, अनेक पंथ अशा तऱ्हेचें स्वरूप बदलून दुसरें स्वरूप प्राप्त झाल्यास-जेणेंकरून हिंदुस्थानचे विचार सर्व जगभर पसरतील, उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिमेस जेथें जेथें मनुष्याची वसती आहे-हिंदुस्थान जर या नवीन वैभवानें जन्म घेईल तर एकंदर मानवजातीवर अशा तऱ्हेचे उपकार होणार आहेत. हिंदुस्थान- ज्या देशांत मोठमोठे ऋषींनीं जन्म घेतले, जेथें अशा धर्माची उत्पत्ति झाली कीं जो धर्म आत्मोन्नति करून, सर्व प्रकारचे उन्नतीस कारणभूत होत आहे, जेथील तत्त्वज्ञान व शास्त्र अंतःकरणास प्रकाशीत करून व्यवहारज्ञान देत आहेत. याच हिंदुस्थानांत मनुष्यांची अलौकिक अशी बुद्धि द्योतक न्यायाचीं षडदर्शनें निघालीं; हिंदुस्थान, जेथील लोक एका कालीं अनेक देशांतून जाऊन आले तेव्हां ज्यामुळें तेथें सर्व तऱ्हेची भरभराट झाली. तो हिंदुस्थान एका कालीं, बुद्धी व ज्ञानानें परिपूर्ण होता तोच हिंदुस्थान पूर्ववत फिरून सर्व तऱ्हेनें पूर्णत्वास आल्यास मृतास फिरून जन्म प्राप्त झाल्यासारखें होणार नाहीं काय ?

आह्मी जे ह्मटत आहोंत तें आमचें ध्येय तेंच आहे. आह्मास तीच आशा आहे, आह्मास श्रम करण्यास याचमुळें उत्तेजन येतें, आह्मास अति उच्च अशी इच्छा तीच आहे व आमची देवास नित्य प्रार्थना तीच आहे. कारण हिंदुस्थानची जागृति ह्मणजे मानवजातीची उन्नति होय. हिंदुस्थानचा विचार ह्मणजे एकंदर तत्त्वविचाराची उच्च भूमिकेवर होणारी क्रांती होय. हिंदुस्थानचा धर्म व तत्वविचार याचें योग्य बक्षीस हिंदुस्थानची सांपत्तिक भरभराट होय; कारण देशाची सुस्थिति ही एक राष्ट्राची शक्ति होय हिंदुस्थानची जागृति झाल्यानें एकंदर जग भौतीक बंधनापासून मुक्त होणार आहे.

---

## इतस्ततः संचार

नुकतेच निवर्तलेले सयामचे राजे महाराज चुलालंकरण यांना रिकाम्या झालेल्या आगपेट्यांचा संग्रह करण्याचा विलक्षण नाद असे. एकदां ते आपल्या लवाजम्यानिशीं लंडन शहरांतून जात असतां रस्त्यांत टाकलेली एक रिकामी आगपेटी त्यांच्या दृष्टीस पडली. तत्काळ आपला दर्जा विसरून त्यांनीं ती उचलून घेतली. इतक्यांत समोरून एक गाडी येत होती तिच्या खालीं ते सांपडत होते, पण थोडक्यांत वाचले.

यंदा अलहाबाद येथें भरणाऱ्या प्रदर्शनांत अत्यंत बारीक पण सुवाच्य अक्षरांचे नमुने ह्मणून तीन लिहिलेलीं कार्डें मांडण्यांत आलीं आहेत. एकात ३२० ओळी, दुसऱ्यांत २७९ व तिसऱ्यांत २४९ ओळी आहेत!

दक्षिणध्रुवाचा शोध लावण्यासाठीं जपानांतून लेफ० शिरासे हे जाण्यास निघाले आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं जपान टाइम्सनें एक लेख लिहिला आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं लेफ० शिरासे हे मृत्यूला आव्हानच करण्यास जात आहेत यांत शंका नाहीं. तेव्हां त्यांनीं आतां योजिल्याप्रमाणें शोध तरी लावावा. नाहींपेक्षां जपानला पुनः तोंड तरी दाखवूं नये.

---

## वऱ्हाडसमाचार.

कार्तिक वद्य १२ शके १८३२ दुर्मतिनामसंवत्सरे

---

## लेखणी आणि तलवार

पुण्यास भरलेल्या तिसऱ्या साहित्यसंमेलनाच्या प्रसंगीं एका वक्त्यानें लेखणी आणि तलवार यांच्या प्रभावाची तुलना करून लेखणीला अग्रेसरत्वाचा मान दिला होता. ती केवळ तात्विक दृष्टीची तुलना होती. पण व्यवहारांत या तुलनेचें मूर्तिमंत उदाहरण पाहणें असेल तर तें गेल्या आठवड्यांत मृत्यु पावलेल्या रशियन कौंट टॉलस्टॉय यांच्या चरित्रांत पाहण्यास मिळेल. त्यांचा नश्वर देह नाश पावला आहे, पण त्यांच्या विचाराचा प्रभाव व त्यांचा लोकांच्या मनावर घडणारा परिणाम कधीं नष्ट होणारा नाहीं. लोक मतलबीपणाच्या व्यवहारांत गुंतले आहेत, संपत्तिमानांच्या जुलमाखालीं स्वर्षानें हणा, नाखुषीनें हणा, माना देत आहेत; भूतदयेला विसरले आहेत; ईश्वराला, धर्माला, स्वाभिमानाला पारखे झाले आहेत; अशा वाङमय स्थितींत सुद्धां मनुष्याच्या मनाला शांति, सरलता, आणि उच्च प्रतीच्या सुखाची कल्पना याचा खरोखर कांहीं लाभ झाला असेल तर तो कौंट टॉलस्टॉय याच्या लेखणीचा प्रभाव होय असें निदान युरोपियन खेडा विषयीं तरी ह्मणण्यास हरकत नाहीं. टॉलस्टाय हे रशियन खरे, पण त्यांच्या लेखणीचा प्रभाव रशियापुरताच- मर्यादित- नव्हता. रशिया हा देश एका व्यक्तीच्या लहरीच्या ताब्यांत असल्यानें त्या देशांतल्या लोकांचें स्वातंत्र्य इतरांपेक्षां मर्यादित आहे. अशा ठिकाणीं अमर्यादित अशा विचरस्वातंत्र्याचा जन्म व्हावा व तेथें तेजापुढें तलवारीचें तेज फिकें पडावें असा ईश्वरी संकेत होता, त्याप्रमाणें टॉलस्टॉय हे रशियांत जन्मले व रशियतांच त्यांच्या आयुष्यांतला सगळा काळ गेला; हा काळ अत्यंत महत्वाचा आणि सगळ्या जगाला विचारणीय झाला. रशियाचे झार ह्मणजे कर्तुमकर्तुं अन्यथाकर्तुं शक्तीचा उद्गम असें समजतात. पौराणिक काळांत लंकेचा रावण चार चौकड्यांचें राज्य करीत होता, व देव सुद्धां त्याला चळचळ कांपत असत अशी कथा आहे. नुसत्या बळापुरता विचार केला तर रशियांच्या झारला अर्वाचीन काळच्या रावणाची किंवा 'सप्तद्वीपसमुद्रवडी' पर्यंत राज्य करणाऱ्या मागधराज जरासंधाची उपमा गैरवाजवी होणार नाहीं पण अशा बलिष्ठ सम्राटाला सुद्धां नर करण्याची शक्ति कोणाचे अगांत असलं तर ती कौंट टॉलस्टॉय यांचे ठायीं होती हा जो त्यांच्या लेखणीचा येवढा प्रचंड प्रभाव दिसून आला यांतलें रहस्य तरं काय होतें ? तें रहस्य हें कीं टॉलस्टॉ हे नुसते कवि नव्हते, लेखक नव्हते कादंबरीकार नव्हते, चळवळे नव्हते; त ऋषि, भविष्यज्ञानी, गुरु, दीनांचे साह्यकर्ते सत्याचे अभिमानी, व खरे ख्रिस्ती होते युरोपांतले सगळे मूर्धाभिषिक्त राजे त्यांच शद्ब झेलण्यास तयार असत. त्यांच्या वि चारांनीं वश झालेले कोट्यावधि भक्त त्यांचे एकेक शद्ब बहुमोलाचें मुक्ताफळ समज असे. इतकी विलक्षण छाप जनतेवर अ सतां त्यांची स्वतःची राहणी अगदीं साधी अंतःकरण अत्यंत कोमल, आणि आचर अत्यंत शुद्ध होतें. आत्मप्रत्ययाचा अतिरे त्यांच्या ठायीं होता, यामुळें व निःस्पृहतेमु त्यांच्या शद्बाचा प्रभाव शतगुणित अ ईश्वराचे ठायीं अढळ श्रद्धा, विश्व कुटुंबिक दृढ कल्पना, कर्तव्या विषयींची पूर्ण जागृ भूतदयेनें आर्द्र होणारें अंतःकरण आ कळकळीच्या प्रयत्नाची पराकाष्ठा ह्या स ळ्या गुणांचा समुच्चयनें होणारा व त्याच्या चरित्रांत दिसून येतो. अर्वाची काळचे हेच ऋषि होत. आजपर्यंत अ झार झाले व पुढेंही होतील; पण पु एखादा टॉलस्टॉय निर्माण होण्यास पर श्वराची कृपाच व्हावयास पाहिजे.

---

## लढाईचें शिंग वाजलें !

इंग्लंडांतल्या लिबरल व कान्सर्वेटिव्ह दोन राजकीय पक्षांत उत्पन्न झाले मतभेदामुळें लवकरच पार्लमेंटची निवडणू होण्याचें नक्की ठरलें आहे. लार्डस स राहूं द्यावी कीं काढून टाकावी हा मु प्रश्न होता, आणि या प्रश्नाचा निव आपआपसांत चर्चा करून कांहीं तडजोडी उपायांनीं झाला असता तर एका व दोन वेळां निवडणूक करण्याची दग बाचली असती. पण आपसांत तोड होत नाहीं हें आतां स्पष्ट जाहिर करण आलें आहे. व्हेटोकान्फरन्समध्यें दोन्ही पक्ष प्रतिनिधि जमून काय चर्चा झाली, कोणाच्या दुराग्रहामुळें कान्फरन्स यश झाली नाहीं हें कळण्याला आज क मार्ग नाहीं. तथापि लवकरच या का रन्सचा रिपोर्ट बाहेर पडेल तर व प्रश्नाचा समाधानकारक खुलासा त्यांत ण्यास मिळेल अशी आशा करण्यास ज आहे. लार्ड ल्यान्सडाउन यांनीं लॉ सभेंत केलेल्या भाषणावरून बहुधा

पक्षाच्या बाजूला दुराग्रहाचें कां दर्गे
असें अनुमान करितां येतें.
न्ही पक्षांत टाइमें.ड करण्यासाठीं
रस नेमण्याची कल्पना यांहीं नवी
एकोणिसाव्या शतकांत पार्लमेंटासंबं
कार्ड्कानू करण्ड्व.तिं
एक कान्फरन्स १८८० च्या
स भरलें होतें. मात्र त्या वेळीं
दर त्या विषयाची पार्लमेंटांत चर्चा झा
र गर्मेद्चे तेढे प्रश्न कान्फरन्सपुढें
यांत आले होते. यंदाच्या कान्फरन्सची
अरदीच निराळी होती. त्यांच्यापुढें
दाचा प्रश्न--लॉर्डस सभेच्या अधिकारा
चा हा केवळ नामधारी होता. वस्तुत:
प्रश्नाच्या नांवाखालीं आयर्लंडचें स्व-
, स्कॉटलंडचें स्वराज्य, वेल्सचें स्वराज्य,
अनेक महत्वाचे आणि नाजुक प्रश्न
न गर्तानें आले होते. निवाय तोड
करण्यासाठीं नेमलेले प्रतिनिधि आरं-
पूनच तोडजोडीच्या विरुद्ध उघडपणें
े विचार प्रकट करीत होते. मजुरांच्या
े प्रतिनिधि हा कान्फरन्सचा फार्स
गालांतल्या गालांत हंसत होते. सा
आरंभापासूनच कान्फरन्सला अपेश कुन
होते; आणि त्याला यश आलें नाहीं
ळ कोणालाही खेद वाटला नाहीं.

कान्फरन्सचा यत्न निष्फळ झाल्याबरोबर
पक्ष वाग्युद्धाला तयार होऊन रण-
र येऊन उतरले आहेत. लॉर्डस सभा
करील तेंच धोरण लोकांनीं स्वी-
वयाचें कीं स्वत:ला योग्य दिसेल तो
धगवयाचा हा प्रश्न आहे. पहिला
अर्थातच परावलंबनाचा व दुसरा
ाचा आहे. लिबरल पक्ष प्रतिपदर
, इतकेंच नाहीं तर लोकमत उघड-
त्यांच्या बाजूचें आहे. अशा स्थितींत
रलपक्षाशीं झगडण्यापासून फायदा नाहीं
लॉर्ड ल्यान्सडाऊन सारख्यांना उघड
त आहेत. म्हणून ते आपला दुराग्रह
सा सोडून लॉर्डस सभेची सुधारणा
यास आह्मी तयार आहों, मात्र त्या
ाच्या बिलावर चर्चा करण्याची संधी
ांला द्या येवढें म्हणत आहेत. लॉर्ड
ूति लिबरलांचें म्हणणें कीं लॉर्डस
ी सुधारणा तुह्मी आपल्या मर्जीप्रमाणें
ार ती तशी नको, तर लोकांना
रीतीची हवी आहे त्या रीतीनें केली
े. येथपर्यंत आतां या प्रकरणाची
आली आहे; आणि आतां निव-
ी खेरीज दुसरा मार्ग राहिला नाहीं,
आतां लिबरलांच्या विरुद्ध लोकमत
करण्याच्या नव्या नव्या युक्त्या
न काढण्यांत कान्सर्वेटिव्ह गर्क झाले
त. लिबरल लोकांना मि॰ रेडमंड
सध्या नचवून राहिले आहेत; आणि
ंड आता स्वराज्याचे हक्क सहज
पाहत आहे. ही लढाई लढण्यासाठीं
रेडमंड हे अमेरिकेंतून पैसा आणीत
त. मि॰ रेडमंड हे कायते सर्वांत
आहेत, आणि लिबरल पुढारी
ुत्री भावल्या बनले आहेत वगैरे वगैरे
नें लिबरलांच्या विरुद्ध लोकमत क्षुब्ध
याच्या बुद्धीनें हल्लीं करण्यांत
आहेत. सारांश, इंग्लंडच्या
कीय वातावरणांत सध्या बरीच चलबि-
झालेली आहे या अशांततेच्या हिंदु
च्या राजकीय स्थितीवर कांहीं परिणाम
याचा रंग दिसत नाहीं; तरी व्हाइस-
आणि स्टेट सेक्रेटरी दोघेही मुख्य
ी अर्थीं नवे, व अननुभवी रुस-

त्यामुळें तसाच भानगडीचा कांहीं प्रश्न उद्भवल्यास कशा प्रकारें निर्णय होईल तें आताच सांगतां यावयाचें नाहीं

## जगाची शांतता

रशियाच्या झारनें जर्मनीचा जी सफर नुकतीच केली तिचा समाधानकारक परिणाम झाला अशी खबर वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. या बातमींत तथ्य असल्यास साऱ्या जगांत शांतता नांदूं लागण्याचा काळ फारसा दूर नाहीं असें म्हटलें पाहिजे. कारण इंग्लंड आणि रशिया, किंवा जर्मनी आणि रशिया यांचें आपापसांत जसें वैर आहे तसें जगातल्या दुसऱ्या कोणत्याही दोन राष्ट्रांत नाहीं ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. अहिनकुलवैर म्हणून जें वैर आमच्या संस्कृत ग्रंथकारांनीं मानलें आहे तें या राष्ट्रांत असून जर एका भेटींत त्यांच्यांतले भेदभाव पार वितळून जातात तर जगांत शांतता नांदण्यास आतां दुसरा प्रत्यवाय कांहींच उरला नाहीं. इंग्लंड, रशिया आणि जर्मनी यांचे त्रिकूटांत फ्रान्स लवकरच सामील होईल जपान इंग्लंडच्या पोटांत आलाच आहे. आतां राहिली अमेरिका. अमेरिकन लोक दुसऱ्याचे अंकित होऊन राहणारे नाहींत ही गोष्ट जितकी खरी आहे तितकीच ते मुद्दाम दुसऱ्याच्या कुरापती काढून आपल्या राष्ट्रावर संकट ओढवून आणणारे ही पण नाहींत. तेव्हां युरोपांतली पांच चार प्रबळ राष्ट्रें एका बाजूस आहेत असें पाहिल्यावर अमेरिका त्यांच्या विरुद्ध कारस्थान करील किंवा तिनें केलें तरी त्यांत तिला यश येईल हा संभव फार कमी आहे. राष्ट्राराष्ट्रांत शांतता व स्नेहभाव ठेवण्याची हीं सध्या सर्वत्र दिसून येणारी इच्छा मूळची आमचे परमप्रिय परलोकवासी बादशहा सातवे एडवर्ड यांचे ठायीं अंतीनत होती. सध्यां युरोपांतच नव्हे तर साऱ्या जगांत नांदणारी शांतता त्यांच्या त्या इच्छेचा व प्रयत्नाचा परिणाम आहे. इंग्लंड व रशिया यांच्यामध्यें पूर्णपणें सलोखा ठेवण्याबद्दलचें सगळें श्रेय त्यांचें आहे इंग्लंड व रशिया किंवा जर्मनी आणि रशिया यांच्यामध्यें जर सलोखा होणें ही शक्य गोष्ट आहे तर बाकीच्या राष्ट्रांत तो घडून येऊन सर्वत्र शांततेचें साम्राज्य होणें ही अशक्य कोटींतली गोष्ट नाहीं हें दिवसें दिवस ज्यास्त स्पष्टपणें दिसून येईल.

## राज्याभिषेकाचा दरबार.

आपले नवे बादशहा पांचवे जार्ज हे स॰ १९१२ च्या जानेवारी महिन्यांत राज्याभिषेकाचा दरबार भरविण्यासाठीं हिंदुस्थानांत येणार आहेत ही बातमी ऐकून सर्वांना आनंद झाला आहे आणि हा दरबार दिल्लीस भरवायचा कीं कलकत्तास या संबंधानें कित्येक वर्तमानपत्रांत जोराचा वाद सुरू आहे. दरबार कोठेंही भरला तरी प्रस्तुतच्या बादशहा विषयीं हिंदी प्रजेचें जें उत्कट प्रेम आहे, व सहानभुतीच्या मंत्रानें त्या प्रजेचीं मनें बादशहानें वश करून घेतलीं आहेत त्यांत तिळमात्र फरक होणार नाहीं. पण त्यावरून दरबारच्या स्थलाची निवड करण्यांत मतभेद नसावा असें मात्र नाहीं. कित्येक अंग्लोइंडियन पत्रें दिल्लीची निवड पसंत करित आहेत. शहाजहान व औरंगजेब या सारखे वैभवशाली मोगल राजे ज्या ठिकाणाहून राज्यसूत्रें चालवितां चालवितां आपल्या प्रभावानें प्रजेचे डोळे दिपवीत असत, तेंच ठिकाण ब्रिटिश बादशहानें आपल्या वैभवाच्या व तेजाच्या प्रदर्शनास पसंत करावें. असें त्यांचें म्हणणें आहे. उलटपक्षीं बंगाली व इतर पत्रकर्ते यांचें म्हणणें असें आहे कीं मोगल बादशहाचें वैभव व प्रभाव यांच्यापेक्षां ब्रिटिश राज्याचें वैभव व प्रभाव हीं यत्किंचितही न्यून नसलीं तरी त्यांच्या स्वरूपांत आकाश पाताळा इतका फरक आहे, मोगल बादशहाचें राज्य म्हणजे एका माणसाच्या लहरीचें राज्य होतें. शिवाय धामधूम, अशांतता आणि अज्ञान यांचा तो काळ होता. सध्याचा मनू अगदींच निराळा आहे. सध्यां जगांत अत्यंत सौख्यकर व सर्वमान्य अशी राज्यप्रजासत्तात्मक राज्यपद्धति ज्या इंग्लंड देशांत आहे त्या देशाच्या स्वाधीन हिंदुस्थानचीं राज्यसूत्रें असल्यामुळें आज नाहीं उद्यां तरी पद्धति इकडे ही सुरू होण्याची आशा आहे. हा यूग शांततेचें, ज्ञानाचें व प्रगतीचें आहे. पूर्वीच्या मोगल बादशहाच्या वेळच्या स्थितींत व हल्लींच्या स्थितींत कोठेंच कांहीं साम्य नाहीं; शिवाय दिल्ली हें ठिकाण जुलमी बादशाही अंमलाचें व उद्दाम कर्झनी अंमलाचें स्मरण ताजें करून देणारें आहे अशा ठिकाणापेक्षां ज्ञानप्रसार, शांततेचें वैभव व सुधारणा यांचें आगर असलेलें कलकत्ता शहर च पांचव्या जार्ज बादशहाच्या राज्याभिषेक दरबारास योग्य आहे या विषयीं विचारी लोकांत मतभेद होईल असें आह्मांस वाटत नाहीं.

## इतिहासाची पुनरावृत्ति

लॉर्ड डलहौसी यांच्याशीं लॉर्ड कर्झन यांची तुलना नेहमीं करित असतात. ही तुलना त्यांच्या व्यक्तिगत गुणासंबंधानेंच नव्हे तर तत्कालीन स्थिती संबधानेंही सार्थ होती, असें डलहौसी साहेबांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कागदपत्रावरून दिसून येतें. लॉर्ड कर्झन व लॉर्ड किचनेर यांचें कांहीं बाबतींत न पटल्यामुळें प्रकर्ण त्रिकोणास जाऊन लॉर्ड कर्झन साहेबांस आपल्या कारकीर्दीची मुदत संपण्या पूर्वीच रामराम ठोकावा लागला. लॉर्ड डलहौसी यांचें व त्या वेळचे कमान्डर इन चीफ सर चार्लस् नेपियर यांचें पटत नसे. त्यामुळें तेथेंही एकाला माघार घेऊन स्वदेशीं प्रयाण करावें लागलें फरक इतकाच कीं पूर्वी व्हाइसराय साहेबांनीं सेनापतीस खो दिला होता तर अलिकडच्या काळांत सेनापतींनीं व्हाइसरायास खो देऊन बरोबरी केली. लॉर्ड कर्झन साहेबांनीं देशी संस्थानिकांच्या युवराजांस आपला बॉडीगार्ड बनविण्याचा मान घेतला तसा सर चार्लस् नेपियर यांनीं बड्या बड्या लष्करी अधिकाऱ्यास आपल्या पत्राच्या नकला करण्याचें हलकें काम सांगून हुकुमाची अमान्यता केल्याबद्दल कोर्ट मार्शल मार्फत त्यांना शिक्षा केल्या दोन्ही उदाहरणांत उद्दामपणाचा गुण सामान्य आहे दोघांस त्याबद्दल मिळालेलें बक्षि ही सारखेंच होतें. ही गोष्ट इतिहासाची पुनरावृत्ति होत असते या तत्वाचें उदाहरण म्हणून लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

## शिवणकामाचें प्रदर्शन.

गेल्या शिक्षकसमानाच्या वेळीं प्रदर्शनाची एक उत्कृष्ट टूम निघाली येथील मुलींच्या शाळेवरील शिक्षकीण श्री. द्वारकाबाई वैद्य यांनीं मोठ्या परिश्रमानें वऱ्हाडांतील मुलींच्या शाळेंतील उत्तम उत्तम शिवणकामें, कशिद्याचीं कामें व तसलींच चांगल्या हुनराचीं कामें एकत्र केलीं आहे. आणि त्यांच्या भरीला निरनिराळ्या शिक्षकिणींच्या स्वतांच्या कामाचे नमुने व आकोलें शहरांतील सुगृण सभ्य स्त्रियांच्या कामाचे नमुने हे एके ठिकाणीं शालागृहांत मांडून एक रम्य व आल्हादकारक प्रदर्शन उभारलें. या प्रदर्शना पासून कोणालाहि आनंद वाटल्यावांचून राहिला नाहीं. या प्रदर्शनांत उत्तम ठरलेल्या कामाबद्दल बक्षीस देण्याचा समारंभ गेल्या गुरुवारीं येथील टौनहालांत झाला अध्यक्षस्थानीं येथील लोकप्रिय डिस्ट्रिक्ट जज्ज राव बहादूर बेळकर यांच्या पत्नी सौभाग्यवती सरस्वती बाई बेळकर यांनीं सुशोभित केलें होतें. सुमारें दोनशे वर स्त्रिया जमल्या होत्या पारशी व हिंदु कुलीन स्त्रियांनीं या दिवाणखान्याला चिरस्मरणीय शोभा आणिली होती. असा हा समारंभ अपूर्व होता. ईश स्तवनाचीं पदें झाल्यानंतर श्री. द्वारकाबाई वैद्य यांनीं या समारंभाचा पूर्व इतिहास सांगून सर्वांचें स्वागत प्रेमभरानें केलें. त्या नंतर

| श्री. सौ. | विषय |
|---|---|
| सरस्वतीबाई पंडित | प्रदर्शनाची आवश्यकता. |
| शारदाबाई परांजपे | मनाचा मोठेपणा. |
| सुंदराबाई खरे | एकीचे फायदे. |
| गोदुबाई मणेरीकर | प्रदर्शनाचे फायदे. |
| दुर्गाबाई जोशी | सदर. |

ह्या पांच जणींनीं आपापले निबंध वाचले. हे निबंध चांगले प्रशंसनीय असून त्यांची गुणदृष्टीनें क्रमवारी वरील नामनिर्देशा प्रमाणेंच होईल. श्री. मनुबाई बापट यांनीं वरील निबंधांचें समालोचन करून आपले सुंदर विचार फार गोड रीतीनें कळविले. अध्यक्षांनीं सर्वांचें आभार मानून बक्षीसें वांटलीं आणि हळदकुंकू, अत्तरगुलाब, पानसुपारी इत्यादि मंगल द्रव्यानीं सर्वांनीं परस्परांचा निरोप घेतला. या प्रदर्शनाला आह्मी विशेष अग्रस्थान देतों कांकीं अशाच रीतीनें स्त्रियांच्या हातून भावी उन्नतीचें बीज पेरलें जातें. आणि असे मंगल समाज येत्या हळदी कुंकवाच्या मोसमांत भरतील व स्त्रियाच आपलीं कामें अशा नेटानें चालवितांना दृष्टीस पडतील तेव्हां कोणीही कबूल करील कीं सुधारणेचीं जीं अंगें पुरुषांना अद्याप साधलीं नाहींत तीं आपोआप सुलभ व दर्शनीय होतील.

---

# वऱ्हाडवृत्त.

हवामान--थंडीचें मान विशेष वाढलें तथापि पहाटेस दंव कमी पडतें व हवेंत रुक्षपणा अधीक आहे. खरिपाचीं पिकें मध्यम आलीं.

मेजर फ्रेडन साहेब डिपुटी कमिशनर हे उद्यांपासून दोन महिन्यांच्या फिरतीवर दौऱ्यांत कोर्ट भरवितील.

वऱ्हाड महम्मदीय विद्या परिषद् या संस्थेची वार्षिक सभा येत्या 'इस्टर' च्या सुटींत आकोलें येथें भरणार असल्या कारणानें त्या संबंधाची पहिली सभा मे. महमद बशिरुद्दीन मौलवी महमद अबदुल कादर यांच्या दिवाणखान्यांत भरली होती. आणि व्यवस्थापक कामिटी नेमण्यांत येऊन ग. रा. महमद मालेखान बी. ए. एल एल. बी. व सय्यद अबदूल रझाक यांस सेक्रेटरी नेमण्यांत आले या दोघां गृहस्थांच्या पुढाकारानें आतां यंदाची सभा चांगली यशस्वी होईल असा आह्मांस भरंवसा आहे.

साताऱ्याकडील प्रोफेसर शी. ए. इनामदार हे जादूचे खेळ चांगले करितात. शब्दवेध मत्स्यभेद, इत्यादि बंदुकीचे प्रयोग, आणि मोहनी विद्येचे प्रयोग हेही पाहण्या लायक आहेत. यांचे खेळ 'श्रीराम नाटकगृहांत' होत असतात.

—:०:—

ॐ

## सत्यमेव जयते.

( सत्यशोधक समाजाचे पुस्तकांची जाहिरात )

शास्त्री नारो बाबाजी महाघट सत्यशोधक समाजाचे प्रसिद्ध उपदेशक क्षत्रीय मराठे ह्यांनीं वेदाचे व शास्त्राचे व पुराणाचे व अनेक ग्रंथांचे आधारें लोकांचे कल्याणाकारितां हा ग्रंथ व पुस्तकें तयार केलीं आहेत.

वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धति भाग १० ग्रंथ एकच. पहिल्या भागांत सर्व पूजेचे मंत्र व दुसऱ्या भागांत वटसावित्रीचें व्रत, हरतालि, कावत, शमिपूजन, तुलसीविवाह, होळीपूजा, सोमवतीपूजा, शनिपूजेचा विधि, तीर्थप्रायाश्चित्ताचा विधि, दिपवाळीचें लक्ष्मीपूजन, सर्वत्र देवाचे अभिषेक, सत्यनारायणाचे पूजेची माहिती, गंगापूजन वगैरे अनेक किरकोळ विधिची माहिती मंत्रासह दिली आहे. भाग ३ ऋतुशांती, उपनयन संस्कार (मुंजी) ची माहिती मंत्रासह भाग ५ यांत लग्नसंबंधीं ह्मणजे साक्षगंध, साखरपुडा, शालमुदि, देवकुंडी, साहित्यविडा, अन्नाका, मंगलाष्टकें, सुलग्न, सतवर्णे कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, प्रतिज्ञामंत्र, फळ (तांबूल) किंवा साडे, वगैरे प्रकारचे विधीची तपशीलवार वेदोक्तमंत्रासह माहिति दिली आहे. भाग ५ देवपूजेचे वेदोक्तमंत्र, पुरुषसुक्त, ब्रह्मयज्ञ (संध्या) नित्यकर्माकरितां अग्निहोत्र. भाग ६ यांत यज्ञविधीची संपूर्ण माहिती, वास्तुशांति, ईश्वरप्रार्थना, स्वास्तिवाचन, शान्तिपाठ, वगैरे वेदोक्त मंत्रासहित विधी दर्शविला आहे. भाग ७ यांत अंत्येष्टिकर्म (मृतसंस्कार), श्राद्ध दशक्रिया दाहा दिवसांच्या दाहा क्रिया, अकरा व तेरा दिवसाची क्रिया ह्या सर्वत्र कर्मांची मंत्रासह तपशीलवार माहिती दिली आहे. भाग ८ यांत जोतिषासंबंधीं संपूर्ण माहिती उदाहरणासह दिली आहे. भाग ९ यांत सर्व देवांच्या आरत्या व समाजीयन मंडळींनीं केलेलीं पदें. भाग १० सार्वजानिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें, समाजाचे नियम. पुस्तकांची जाहिरात. अत्यंत महत्वाची दुसरी जाहिरात, ईश्वरप्रार्थनापर पदें. आरत्या व पदें याप्रमाणें एकंदर माहिती देऊन दहा भाग पुरे केले आहेत. हा ग्रंथ प्रत्येकानें संग्रहीं ठेविला असतां हव्यकव्य कर्म करण्यासंबंधी ब्राह्मणेतर वर्गास कोणत्याही पुस्तकांची जरूर पडणार नाहीं. वेदोक्त व पुराणोक्त पूजापद्धती भाग दहा व हिंदुधर्माचें खरें ज्ञान, ब्राह्मणांचा हक्क कांहीं नाहीं अशा बद्दल हायकोर्टांत झालेले ठराव, वादीचे अर्जाचे नकलेसह, इशारा श्रीजोती गोविंदराव फुलेकृत, ब्राह्मणेतर बंधूस प्रार्थना, मराठा शिक्षण परिषदेचा पोंवाडा, देशीचळवळीचा पोंवाडा, श्री० सयाजीराव महाराजांचा पोंवाडा, राष्ट्रीय सभेचा पोंवाडा, भीमराव महामुनिकृत सार्वजानिक सत्यधर्माचीं दहा लक्षणें व सत्यशोधक समाजाचे नियम, व प्रतिज्ञापत्र, व उत्तम ग्लेझ कार्डावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र, हीं सर्व रंगीबेरंगी छापलेलीं असून प्रत्येकानें आरशांत जडून लावण्यासारखीं आहेत. व संग्रहीं कायमचीं ठेवण्यासारखीं आहेत' अशीं एकंदर सात पुस्तकें व तीन रंगीबेरंगी फार्म, व उत्तम कागदावर सोनेरी अक्षरांत छापलेला गायत्रीमंत्र; अशीं एकंदर तीन रुपये किंमतीस मिळतील. रोख पैसे पाठविले असतां किंवा व्ही. पी. नें मागविली असतां खालीं लिहिलेल्या पत्यावर मिळतील. पोष्ट खर्च निराळा पडेल.

### सुगंधित धूप

नित्य संध्या समयीं होम, हवन करण्या अथवा पूजा, पाठ करण्याचे वेळीं उपयोगी ज्यामध्यें नानाप्रकारच्या वस्तु, केशर, कस्तुरी, इ० किंमतीच [illegible] व हरतऱ्हेचीं औषधें मिश्र केलेलीं असून तो थोडा विस्तवावर टाकिला ह्मणजे उत्तम प्रकारचा सुगंध सुटतो. यामुळें दुर्गंधीने विषारी हवेचा नाश होऊन उत्तम हवा प्राप्त होते. ज्या घरामध्यें ईश्वरीय वेद विधीनें नियमानें नित्य जपहोमादी पठण होतें त्या ठिकाणीं कलह, वैर, प्लेग, व्याधीरोग, अकालमृत्यू इत्यादी आपत्ती येऊं शकत नाहींत. हा धूप दर शेरास दीड रुपाया प्रमाणें मिळेल.

सत्यशोधक समाज ऑफिस

पोष्ट हिवरखेड रुपरावाचे ता० आकोट

नो. नं. ड ७२ जि० आकोला प्रांत वऱ्हाड

---

## विलक्षण नयन रुक्कुठार.

विलक्षण नयन रुक्कुठार — ह्या अप्रतिम औषधापासून डोळ्याचे साधारण विकार—खुपऱ्या, लाली, ठणका, पाणी गळणें, कंडू, भूर, फुल इ० जोरदार व जुनाट रोग त्वरित बरे होतात. दृष्टी तीव्र होऊन शांत रहाते; शिवाय जागरणानें, उन्हांत फिरल्यानें अग्नितापानें, उपदंशाविकारानें, अतिवाचनानें, कडकीनें इ. अनेक कारणानें डोळे बिघडतात त्यावरही हें अप्रतिम गुणकारी असून लहान मुलांसही हें अत्यंत उपयोगी आहे. हें डोळ्यांत घातल्यानें ठणका वगैरे न लागतां डोळ्यांस थंडावा येऊन मस्तकासही शांतता येते. सदर औषधाचे सकाळीं पांच व सायंकाळीं पांच प्रमाणें थेंब घालणें. साधारण विकारास एक कुपी पुरेल. बरेच दिवसांचा विकार असल्यास तीन कुप्या लागतील; सोबत औषध घालणे करितां कांचेची नळी फुकट मिळेल, एक कुपीची किं. १ एक रुपया. तीन कुप्या एकदम घेणारास टपाल व व्ही. पी. खर्च माफ. एकदम १२ कुप्या घेणारास टपाल खर्च न पडतां दहा रुपयांत मिळतील.

जी. पी. कंपनीची उत्तम निळिकाळी शाई ८६ आण्याची घेणारास पुढील सालची डायरी बक्षीस मिळेल आमचेकडे शालेपयोगी मराठी व इंग्रजी पुस्तकें व हरएक प्रकारचा स्टेशनरी माल फारच माफक दरानें मिळेल. विशेष माहिती खालील पत्त्यावर,

जी. एन. घारपुरे. पोष्ट- अलिबाग. मुंबई.

---

## ब्रह्मसिद्धांतमाला

अथवा

### वेदांताचें युक्लीड.

रा. खंडो कृष्ण ऊर्फ बाबा गर्देकृत हा अपूर्व ग्रंथ अगदीं सरळ सोप्या मराठी भाषेत युक्लीड धर्तीवर लिहिला आहे या ग्रंथाचा लक्ष्यपूर्वक अभ्यास केला असतां ब्रह्मविद्येचीं तत्त्वें मनामध्यें चांगलीं बिंबून वेदांतावरील कोणत्याही पुस्तकाचें मर्म तेव्हांच समजेल. प्रकरणें १२, पृष्ठसंख्या ३४३, स्वदेशी मोहरदार कागद, टाइप मोठा व ठळक. छपाई व बांधणी सुबक. किंमत १॥ टपाल हांसल निराळें. पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१ किर्लोस्करबंधु, किर्लोस्करवाडी, पो० कुंडल.

२ म्यानेजर, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव.

नो० नं० ण २९

.ar Esq.
Pleader
Amraoti.

---

## जेव्हां डाक्टर व वैद्य यांची हीनिराशाहोत, तेव्हां सुद्धा

### सुख संचारक कंपनी मथुरा यांच्या

# सुधासिन्धु

पासून गुण येण्याची आशा राहतेच. कारण २० वर्षी पासून, लाखों मनुष्या कडून याची परिक्षा झाली आहे. बऱ्याच वर्तमान पत्राच्यां संपादकांनी व डाक्टरांनी, या बद्दल सार्टीफिकिटे दिलीं आहेत. सरकारांतून ही या औषधाची रजिष्टरी झाली आहे. या औषधाने कफ, खोकला, दम, हींवताप, पटकी ( काळरा ) शूल, संग्रहणी, आंव, अतीसार, पोट दुखी, वात्या, भळभळ, दांत पाय व कंबर दुखणें, संधिवात लहान मुलांचे हिरवे पिवळे जुलाब, आणि खोकळा सर्वांस गुण येतो किंमत प्रत्येक बाटलीस -॥- आणे. सर्व औषधे विकणारां जवळ मिळते. बहुत करून प्रत्येक शहरांत आमचे एजंट आहेत च; प्रथम तेथें च शोध करावे जर न मिळेल तर आमचे कडून मागवावे. चालू वर्षाचे पंचांग सर्वांस फुकट मिळेल लहान गावात ही एजंट पाहिजेत; नियम मागवून पहावे

मांगविण्याचा पत्ताः—

क्षेत्रपाल शर्मा मालक

सुख संचारक कंपनी मथुरा

---

## जाहिरात

ऑईल एंजीन. पंप, दळण्याचीं यंत्रें, तेलाचे घाणे. कापूस वटवण्याचे रेचे ह्मणजे जिन, इत्यादि संबंधीं कोणतीही माहिती पाहिजे असल्यास खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

दिवाकर यशवंत फाटक.

मेसर्स डंकन स्टेट्न कंपनींतील ऑईल एंजिन एक्स्पर्ट (फाउंडींग),

नो. नं. ढ ८० उमरावती.

---

### गुण न आल्यास पैसे परत !

ठिकठिकाणीं एजंट पाहिजेत ! !

इच्छितांनीं पत्रव्यवहार करावा.

॥ ॐनमो श्रीवीतरागाय ॥

## स्वदेशी अमृताचा नवीन शोध.

# जायफळार्कमधु.

प्राचीनकाळच्या एका जुन्या लेखावरून वरील औषधाचा शोध अत्यंत कष्टानें लागला आहे. कर्नाटक प्रांतांतील कणतगुड्ड नांवाच्या वनस्पतीप्रसिद्ध पर्वतांत कांहीं वैद्यमंडळीच्या शोधानें ही वनस्पती ह्मणजे झाडपाला क्वचित् क्वचित् मिळाली आहे या वनस्पतींच्या रसांत जायफळाचा रसार्क मिश्र करून हा "जायफळार्कमधु" यंत्र साह्यानें तयार केला आहे. हा मधु किंचित् पातळ असून खाण्यास अमृताप्रमाणें गोड वसुवासिक आहे. हा मधु खात गेल्यास प्राप्त होणारे गुण सदरहू जुन्या ग्रंथांत लिहिले आहेत ते फार वेळ टिकणारी काम स्थिती अनुभवास येते. हा मधु खाल्यानंतर एक दोन दिवसांतच गुणांश समजं लागतो. जननेंद्रियांतील गेलेली शक्ती पहिल्यापेक्षां अंशमानानें अधिक वाढते. शरीरपिंड मजबूत आणि कांतीयुक्त होतो रहे, गाल व शरीरावयव मांसल होतात. क्षयानें अगर कोणत्याही रोगानें मनुष्यास आलेली प्रेतवत् कळा तीस दिवसांत जाऊन अंगावरील सर्व शिरा भरतात व मनुष्य रक्तमांसानें भरतो, शौचास साफ होऊन भूक चांगली कडकडून लागते हा दाखला पहिले दिवशींच पडतो. एका सप्तकांतच शरिराचें वजन वाढूं लागतें. पर्मा व गर्मी यांनीं दूषित झालेलें शरीर निर्दोष होतें. मदोन्मत्तता येते. या औषधास पथ्य नाहीं कामाविकार द्विगुणित होतो. नवा रोग असल्यास १० दिवस, पुरणाऱ्या एका बाटलीनें गुण येतो. व जुना रोग असल्यास ३ बाटल्यांनीं गुण येतो. १ बाटलीची किंमत १ रुपया. दोन बाटल्यांस १८१४, तीन बाटल्यांस २८१० दोन अगर तीन बाटल्या एकाच पार्सलांत भरून पाठवूं; ह्मणजे टपालखर्च जास्त पडणार नाहीं. टपाल खर्च वेगळा पडेल. कार्ड पाठवून आर्डर दिल्यास व्ही० पी०नें पाठवूं.

पत्ताः—सेक्रेटरी मेसर्स.

एम्. जी. आर.

नो. नं. ड ९३. श्रीजिनेंद्रप्रासादिक कंपनी,

हेड ऑफिस पोष्ट निपाणी. जि. बेळगांव

---

सूचना —कोणताही माल गुणकारी ठरला ह्मणजे जिकडे तिकडे त्याची नक्कल सुरू होते. परंतु नांवाप्रमाणें गुणास पात्र होत नाहीं. असेच येथें नकली औषधाचे कारखानेदार नुकतेच डोकें वर करूं लागले आहेत तरी आमच्या ग्राहकांनीं आमचा ट्रेडमार्क व सीलबंद तपासून घेणें.

## आर्यवनौषधालय मुर्डी

व्हाइसराय व हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल याजकडील आनररी असिस्टंट सर्जन माजी अ. स. डॉ. विश्राम रामजी घोले यांनीं आमचीं औषधें वारंवार हल्लीं वर्तमानपत्रांतुन ज्या कांहीं नव्या जुन्या जाहिराती प्रसिद्ध होत आहेत त्यांहून आमचीं औषधें त्या त्या रोगावर अत्यंत गुणकारी असल्याचें सर्टिफिकेट आह्मास दिलें आहे. हें अवश्य लक्षांत ठेवावें.

आमच्या अत्यंत खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित आला नाहीं तर पैसे परत देऊनही त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें औषध द्यावें लागल्यास तें फुकटही देऊं परंतु रोग्यास पूर्णपणें बरा करूं अशी प्रतिज्ञा आहे.

## मदनामृत संजविनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक, व पौष्टीक, वीर्यस्तंभक,
रक्तशोधक; मनोत्साहक कांति व बुद्धीवर्धक सुवर्ण माक्षीक
मौक्तिक कस्तुरी व अनेक वनस्पती मिश्र

## अद्भुत गुटिका.

शरीरांतील मुख्य राजा जी धातु ती शुद्ध असेल तरच शरीर निरोगी राहून सर्व सौख्य प्राप्त होतें ती दोषी असेल तर शरीरांत नानाप्रकारचे रोगरूपी शत्रू उत्पन्न होऊन शारीरिक सौख्याचा खरा लाभ मुळींच मिळणार नाहीं. करितां धातू शुद्ध व पुष्ट होण्यास या गुटिका प्रत्येक वर्षी पाहिजे त्या दिवसांत एकदां तरी अवश्य सेवन केल्यानें शरीर रोगरहित होऊन सौख्य प्राप्त होतें. हें अवश्य लक्षांत ठेवावें याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य इतर धातुपात उष्णतेमुळें इंद्रियशिथिलता, कडकी. गर्मीसंबंधी मुरलेले विकार मुत्रसंकोच, धातुचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, धातुगतरोग, संग्रहणी, कंबर, पाय, डोळे व नेत्र यांचा दाह, क्षय, पंडुरोग मुलांचा खार, जीर्णज्वर, अग्निमांद्य मस्तकशूळ, मुळव्याधी. वातरोग, निद्रानाश पित्तावर. बाळंतरोग, मधुमेह जनाट परमा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी मजबूत व सतेज बनतें. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातु रक्त याची शुद्ध वृद्धी, वीर्यस्तंभ व भरपूर कामोद्दिपक होते व मनास उत्साह देतात. दुध व नडान्न पचूं लागते त्यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण गुणकारक आहेत करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळालीं आहेत आणि मिळतात. पथ्य सेवनाची मुळींच गरज नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम ४ रुपयांच्यावर कितीही घेणारास टपालखर्च माफ आहे ४ रुपयांचे आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल अनूपानखर्च सोबत किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील.

दरः—एकदम ३५ गो० १ रु०, ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १२५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० ९ रु०

२ अपूर्व नेत्रांजनः-यानें जळस. साइर, फुल, खुपऱ्या. बिंदु, कांच इत्यादि डोळ्यांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टी तीव्र व थंडगार राहते. या रोगांस केवळ खरें रामबाण आहे. १॥ तोळ्याच्या डबीस १ रु०

३ परम्यावर अपूर्व मिश्रणः—कोणताही नवा जुना परमा व अनुपद दहा तिडीक मुत्राची चाळी, संकोच पुस्त्राव, रक्तस्त्राव, इत्यादि विकार पथ्य नसता सात दिवसांत जातात तिडिक एका घटकेंत जाते असें रामबाण औषध कोठें दिसत नाहीं. बा० किं० १ ।। भार बाटलीस रु० २

३ दंतबलवर्धक चूर्णः—दंत संबंधीं सर्व विकार उत्तम बरे होतात.

५ विंचूचें विषः—औषध लावतांच उतरतें पुड्या ३ तो० ८ आणे

६ गजकर्णः—खरूज, नायटे वगैरे सर्व विकार ३ दिवसांत जातात रु. ६ आणे

७ सर्व हिमज्वरः—औषध घेतांच कशाहि प्रकारचे ज्वर असले तरी ते औषध घेतांच जाऊन पुनः उलटत नाहींत. १२ पुड्या १ रु०

८ प्लेगावर रामबाण औषधः--आजपर्यंत आमचे औषधानें हजारो लोक बरे झाले आहेत करितां प्लेग सुरूं होतांच सर्वांनीं संग्रहीं तापावर गोळ्या, गाठीस मलम, वात चढूं नये ह्मणून वातावर मात्रा ठेवून याचा एकवार अनुभव पहावा णाबद्दल खात्री पटेलच, परोपकारार्थ माफक किं० २ आणे ख० शि०

९ सामानाचा मोठा क्याटलाग मागवा तो फुकट पाठवूं औषधांत अपाय-कारक पदार्थ अगदीं नसून पूर्ण खात्रीचे असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय मोठमोठ्या रोगांवर अनेक औषध ग्रंथोक्त रसायनें, भस्म खाक, गुटीका, आसवें, तेलें, सुगंधी अत्तरें माफक दरानें मिळतात. अनुपान खर्च सोबत टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीचें मान कळविल्यास रोगाची निदान चिकीत्सा कळवूं.

## अत्यंत आगत्याची सुचना.

हल्लीं वर्तमान पत्रांतून औषधांच्या अनेक जाहिराती सुरूं असून प्रत्येक जाहिरात सुशोभित करून जो तो पुढें येऊं पहात आहे.

आपला समाज निरुद्योगी व आळशी बनल्यामुळें एकानें जो धंदा सुरूं केला त्याचेंच अनुकरण हुबेहुब नक्कल करून पहिजे त्यानें करावा आमचे जाहितीस कोकण, वऱ्हाड, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतांत-ऊत आला असून आमच्या आंजिले वगैरे गावांतुन तो पुर्णावस्थेंत येऊन आणखीही नवीन जाहिराती सुरू होत आहेत. अशा जाहिराती किंवा ते लोक याची आह्मास निंदा किंवा स्तुती मुळींच करणें नाहीं. इंग्रजी राज्यांत आपली थोरवी गाण्यास ज्याची तो स्वतंत्र आहे आह्मास ग्राहकांस सुचविणें हेंच कीं ज्यांचा कारखाना आज सतत १९।२० वर्षें अव्याहत सुरूं असून ज्यांच्या औषधास झाले डाक्टरांनीं सर्टिफिकीट दिलें, ज्यांच्या औषधांनें कोट्यावधी ग्राहक रोग मुक्त झाले व नित्य होत आहेत त्यांचींच औषधीं नेहमीं उपयोगांत आणणें अत्यंत हितकारक आहे. यापुढें जरी हजारों जाहिराती प्रसिद्ध झाल्या तरी आमची जाहिरात न बदलतां व कोणाचीही निंदा न करता अशाच रीतीनें कायम राहून हा सार्वजनिक व कल्याण करीत असलेला व्यवसाय नवीन नवीन उपयुक्त सुधारणा करून उर्जितावस्थेस आणण्याची खटपट करूं. आज पर्यंत आमचे खटाटीनें यशाहि बरेंच आलें आहे, करितां सकल आर्यबंधूस व ग्राहकांस इतकीच प्रार्थना आहे कीं, रोगमुक्त होण्याच आमचींच औषधें अत्यंत गुणकारक आहेत. तींच सर्वांनीं वापरवीं, एकवार अनुभवानेंच खात्री होईल इतर जाहिरातींशीं आमचा बिलकूल संबंध नाहीं, हें लक्षांत ठेऊन औषधें मागणें तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावी ह्मणजे खरीं गुणकारक औषधें मिळून हटकून व त्वरित आरोग्य येईल- नं. १

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य

पत्ता:—मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

---

**ORIENTAL GOVERNMENT**

## LIFE ASSURANCE COMPANY

LIMITED

ESTABLISHED IN 1874.

HEAD OFFICE—BOMBAY

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH

Head—Quarters—Nagpur C. P.

**FUNDS EXCEED THREE CRORES AND FORTY SEVEN LAKHS**

CLAIMS PAID FOR OVER TWO CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating heir clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount a given sum, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay and terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising, through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, professional men, Tradesmen and others employing portion of their annual income or profits in effecting life policies create fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he dies early, before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is not over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application—

M. DESOUZA.

CHIEF AGENT.

Nagpur

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.